# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## ३२वा वार्षिक अहवाल

## २०१६-२०१७



# Yashwantrao Chavan Pratishthan,Mumbai

## 32nd Annual Report

## 2016 - 2017



'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१६' चे विजेते श्री. नंदन निलेकणी यांना प्रतिष्ठानच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. सोबत यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, सरचिटणीस मा. श्री. शरद काळे.




'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१६' चे विजेते श्री. नंदन निलेकणी सत्काराला उत्तर देताना. सोबत प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार राष्ट्रीय पुरस्कार समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर व सरचिटणीस मा. श्री. शरद काळे.

# ३२वा वार्षिक अहवाल २०१६ - २०१७

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२

**Email: ybchavan100@gmail.com**
**Visit us: ybchavanpratishthan.org**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## वार्षिक अहवाल २०१६-२०१७

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, प्रतिष्ठानचे विभाग प्रमुख, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापन | ३-५ |
| २ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम | ५-७ |
| ३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम | ७ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर उपक्रम | ७-८ |
| ५ | विशेष कार्यक्रम | ८-१७ |
| ६ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | १७-१८ |
| ७ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम | १८-१९ |
| ८ | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली व मिळालेली अनुदाने | १९ |
| ९ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम | २०-४५ |
| १० | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे | ४५-८९ |
| ११ | प्रतिष्ठानची प्रकाशने व सीडी व डीव्हिडी कॅसेटस् | ९०-९१ |
| १२ | प्रतिष्ठानच्या वैधानिक लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र | ९३ |
| १३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ९४-१०६ |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/बी.ओएम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१

## विश्वस्त मंडळ सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १०. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| ११. | मा. श्री बी. के. अग्रवाल | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. ना. धो. महानोर | |
| १५. | मा. श्रीमती प्रभा कुलकर्णी | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

१७. मा. श्री. एन. जे. जमादार,
सचिव, वरिष्ठ विधी सल्लागार,
विधी व न्याय विभाग

## कार्यकारिणी मंडळ सदस्य

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धो. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव पाटील
१७. मा. श्री. राजेश टोपे
१८. मा. श्री. शामराव पा. पाटील
१९. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख - पाटील
२१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिध्द)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## कार्यकारी समिति

१ मा. श्री. शरदराव पवार
२ मा. श्री. अरुण गुजराथी
३ मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
४ मा. श्री. श. गं. काळे
५ मा. श्री. हेमंत टकले
६ मा. श्री. अजित निंबाळकर
७ मा. श्री. जीवनराव गोरे
८ मा. श्री. यशवंतराव गडाख - पाटील

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**प्रतिष्ठानचे विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| २. वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) निमंत्रक | | सौ. सुप्रिया सुळे |
| ३. कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. अजित निंबाळकर |
| ४. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| ५. यशवंतराव चव्हाण माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |
| ६. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री दत्ता बाळसराफ |
| ७. महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| ८. नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ९. सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| १०. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| ११. यशवंतराव चव्हाण केंद्र सभागृहे | सरव्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| १२. वार्तापत्र मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ | |
| १३. शिक्षण विकास मंच | प्रमुख संयोजक | श्री. वसंत काळपांडे |
| १४. अपंग हक्क अभियान | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| १५. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| १६. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | आस्थापना व्यवस्थापक | श्री. संजय बनसोडे |

**प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे अध्यक्ष :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विभागीय केंद्र कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील |
| २) | विभागीय केंद्र पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ३) | विभागीय केंद्र नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| ४) | विभागीय केंद्र नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| ५) | विभागीय केंद्र औरंगाबाद | अध्यक्ष | श्री.नंदकिशोर कागलीवाल |
| ६) | विभागीय केंद्र लातूर | अध्यक्ष | श्री. जनार्दन वाघमारे |
| ७) | विभागीय केंद्र कोंकण | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| ८) | विभागीय केंद्र अमरावती | अध्यक्ष | रिक्त |
| ९) | विभागीय केंद्र अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख |
| १०) | विभागीय केंद्र बीड (अंबाजोगाई) | अध्यक्ष | डॉ. द्वारकादास लोहिया |
| ११) | विभागीय केंद्र सोलापूर | अध्यक्ष | डॉ. गो. मा. पवार |
| १२) | विभागीय केंद्र ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभु अँड असोशिएटस् |
| २) | सांविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. अँड असोशिएटस् |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | मे. मार्क ॲन्ड असोसिएटस् |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २०१६-२०१७ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

१. **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापन :**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या ११ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपाग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या प्रत्येकी पुढीलप्रमाणे ३ बैठका झाल्या. दिनांक २० सप्टेंबर २०१६, दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ व दिनांक १२ मार्च २०१७. तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक २ एप्रिल २०१६, ७ मे २०१६, ४ जून, २०१६, २ जुलै २०१६, ६ ऑगस्ट २०१६, ३ सप्टेंबर २०१६, १ ऑक्टोबर २०१६, ५ नोव्हेंबर २०१६, ३ डिसेंबर २०१६, ७ जानेवारी २०१७, ४ फेब्रुवारी २०१७ व ४ मार्च २०१७ अशा एकूण १२ बैठका झाल्या.

प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मे. संजय राणे ॲन्ड असोसिएटस्, यांचेमार्फत करण्यात आली व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवण्यात आले. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी.व्ही.के. असोसिएटस्, चार्टर्ड अकाउटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavanpratishthan.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच प्रतिष्ठानचा ई-मेल ybchavan100@gmail.com हा आहे.

**सभासद संख्या** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची निरनिराळया प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१. संस्थापक सदस्य - ३५
२. आजीव सदस्य - २६५
३. संस्था सदस्य - २८

महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी मा. श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ती केलेली आहे.

## २. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम :

### २.१ सभागृहे

१.१ **मुख्य सभागृह :** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीत, सभा आदि कार्यक्रमही झाले.

१.२ **सांस्कृतिक व रंगस्वर सभागृह :** सांस्कृतिक सभागृह व रंगस्वर सभागृह या दोन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. प्रतिष्ठानच्या रंगस्वर मार्फत प्रत्येक महिन्याला किमान ४ ते ५ सांस्कृतिक

कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच दिवाळी पहाट हा अतिशय दर्जेदार कार्यक्रम संपन्न होतो. वरील दोन्ही सभागृहे सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत.

## २.२ यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :-

**ग्रंथालयाविषयी माहिती** :- ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश, गॅझीटीयर, ॲटलास, इअरबुक डिक्शनरी, निरनिराळया कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरुन नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. ग्रंथालयीन नियमानुसार ग्रंथालयाची मांडणी केली आहे. ग्रंथालयाचा वाचकांकरिता जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच पुस्तके शोधण्याकरिता मशीन कॅटलॉगच्या सहाय्याने वाचकांना मदत होते. डिडिसी-२३ (ड्युई डेसिमल क्लासिफिकेशन) नुसार ग्रंथाचे वर्गीकरण केले आहे. मुख्य वर्गांक आणि त्याचे उपवर्ग यानुसार ग्रंथांची मांडणी केलेली आहे. सर्व ग्रंथ याच पध्दतीप्रमाणे कपाटात ठेवण्यात आले असून त्यामुळे संगणकीय सहाय्याने साहित्य शोध जलद गतीने व अचूक घेता येतो.

**ग्रंथालयीन सभासद** :- यशवंतराव चव्हाण ग्रंथालय संदर्भ ग्रंथालय असून ग्रंथ ग्रंथालयात वाचण्याची किंवा घरी घेऊन जाण्याची सुविधा आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु.५००/- व अनामत रक्कम रु.५००/- आहे. सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात यईल. ते पंधरा दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल. महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी / संशोधक यांच्याकरिता सवलतीची वार्षिक वर्गणी रु.५०/- व अनामत रक्कम रु.१००/- आकारण्यात येते. या सभासदांना ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन संगणकीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात प्रसिध्द होणा-या महत्वाच्या घडामोडींची कात्रणे ठेवण्यात आली आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रु.१,४४,०००/- इतके अनुदान मिळाले आहे. सन २०१६-२०१७ वर्षाकरिता रु.३,००,०००/- इतकी मंजूर केली होती व प्रत्यक्ष ग्रंथ खरेदीचा खर्च रु.३,८८,७१५/- इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यात आले. त्यामध्ये ६२५ ग्रंथ / पुस्तके खरेदीचा समावेश आहे.

दि. ३१.३.२०१७ रोजी ग्रंथालयाची सभासद फी व सभासदाची एकूण संख्या पुढीलप्रमाणे :- महाविद्यालयीन विद्यार्थी वार्षिक फी रु.५०/- अनामत रु.१००/-, सर्वसामान्य सभासद फी रु.५००/- अनामत रक्कम रु.५००/-, विद्यार्थी रेफरन्स वार्षिक फी रु.५००/-, विद्यार्थ्यांना महिन्यापर्यंतची फी रु.५०/- प्रमाणे आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी / संशोधन / सभासद, सर्वसामान्य यांची एकूण संख्या ३६१, एकूण वर्गणी रु.६८,०००/- व अनामत रक्कम रु.३२,०००/- इतकी रक्कम जमा झाली आहे. तसेच सन २०१६-२०१७ या वर्षामध्ये प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची विक्री करुन एकूण रु.४१,३६२/- प्राप्त झाली आहे.

२.३ **मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या नावाने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक'** : भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड परितोषिक' प्रत्येक वर्षी देण्याचे मान्य झाले. त्यानुसार मुंबई विद्यापीठाच्या मार्चच्या एल.एल.एम.च्या अंतिम परीक्षेत विद्यापीठात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस देण्यात येतो. त्यामुळे सन २०१६ या वर्षाचे पारितोषिके विद्यापीठाने कळविल्यानुसार श्रीमती नेहा भंडारी, मुंबई

यांना मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी मा. अध्यक्षांच्या हस्ते देण्यात आले. रु.१०,०००/- रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

## ३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम :

३.१ **मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती :** मा. चव्हाणसाहेबांच्या ३१ व्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६' श्री. प्रतापशेठ साळुंखे, सांगली यांना प्रदान करण्यात आले व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१६' आधार कार्डाचे प्रणेते श्री. नंदन निलेकणी यांना देण्याचे जाहीर करण्यात आले.

३.२ मा. यशवंतराव चव्हाण यांचा १०४ वा जयंती समारंभ दिनांक १२ मार्च २०१७ रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे मा. अध्यक्ष श्री. शरदराव पवार हे होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१६' आधार कार्डचे प्रणेते श्री. नंदन निलेकणी यांनी स्वीकारला. समारंभाच्या पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन मा. सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी केले. तसेच राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष मा. डॉ. अनिल काकोडकर यांनी पुरस्कारासंबंधी मनोगत व्यक्त केले.

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम :

४.१ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक :** प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१) यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक

२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता/विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक

३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक

४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती/कला व क्रीडा पारितोषिक

सन २०१६ यावर्षीच्या पारितोषिकासाठी वर्तमानपत्रात प्रगटन करण्यात आले होते. या क्षेत्रामध्ये भरीव पथदर्शी कार्य करणा-या व्यक्ती अगर संस्था यांना शिफारस करण्याचे आव्हान करण्यात आले होते. त्या आव्हानाला प्रतिसाद देऊन अनेक प्रस्ताव प्राप्त झाले होते. या प्रस्तावावर निवड समितीत विचार होऊन असाधारण धैर्याचे अष्टपैलू उद्योजक व समाजधुरीण श्री. प्रतापशेठ साळुंखे यांना देण्याचे जाहीर करण्यात येऊन सदर पारितोषिक दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते देण्यात आले. पारितोषिकाचे स्वरुप रु.२ लाख रोख, शाल, मानपत्र व श्रीफळ असे आहे.

४.२ **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार :** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मानपत्र' देण्यात येते. रक्कम रुपये ५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. डॉ. आरमायटी देसाई, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, (२) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिदेशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, (३) मा. डॉ. रुपा शहा, माजी कुलगुरु, एस.एन.डी.टी. विद्यापीठ (४) मा. डॉ. संजय देशमुख, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (५) मा. डॉ. नरेंद्र जाधव, माजी सदस्य, योजना आयोग, (६) मा. श्री. आय. एम. काद्री, प्रख्यात वास्तुविशारद यांचा समावेश आहे.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी दिनी दि. २५ नोव्हेंबर २०१६ मध्ये जाहीर करण्यात आलेला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार आधार कार्डाचे प्रणेते श्री. नंदन निलेकणी यांना मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते मा. चव्हाणसाहेबांच्या जयंती दिनी दि. १२ मार्च २०१७ रोजी सन्मानपूर्वक देण्यात आला. या समारंभास प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :

५.१ **'यशवंत' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - दिनांक २० ते २६ जानेवारी २०१७ :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व पुणे फिल्म फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने दि. २० जानेवारी ते २६ जानेवारी २०१७ या दरम्यान चव्हाण सेंटर, मुंबई येथे 'सातवा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित केलेला होता. या महोत्सवाचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते व हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ कलाकार श्री. पंकज कपूर व मा. सरचिटणीस श्री. शरळ काळे चित्रपट महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी श्री. पंकज कपूर यांना हिंदी चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या चित्रपट महोत्सवात विविध देशातील सुमारे ७५ निवडक चित्रपट दाखविण्यात आले. या चित्रपट महोत्सवात केंद्रातील मुख्य सभागृह, रंगस्वर सभागृह व सांस्कृतिक सभागृहात डीसीपी, ब्ल्यू रे, डीव्हीडी व डीजीबीटा याद्वारे दिवसाला प्रत्येकी ५ चित्रपट दाखविण्यात आले. महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी पुणे फिल्म फेस्टीव्हलमध्ये प्रथम क्रमाकांने आलेली फिल्म दाखविण्यात आली. चित्रपट महोत्सवात ग्लोबल सिनेमा ४०, रिट्रॉस्पेक्टिव्ह ५, कंट्री फोकस ७, इंडियन सिनेमा ५, मराठी सिनेमा ५, स्टुडंट कॉम्पिटीशन १० दाखविण्यात आले. तसेच चिली देशाचे प्रसिध्द संगीत दिग्दर्शक श्री जॉर्ज असेगडा यांचे ध्वनी आणि संगीतही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्याचप्रमाणे स्मिता पाटील मेमोरिअल लेक्चरमध्ये ज्येष्ठे दिग्दर्शक श्री. आशुतोष गोवारीकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

५.२ २.१ **मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर स्मारक देवराष्ट्रे, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली :-**
प्रतिष्ठानमार्फत देवराष्ट्रे तसेच देवराष्ट्रे पंचक्रोशीतील मुलांसाठी आणि शेतक-यांसाठी देवराष्ट्रे केंद्रामध्ये विविध कार्यक्रम घेण्यात येतात. दि. १८.४.२०१६ रोजी मा. चव्हाणसाहेबांच्या जन्मघर स्मारकास मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री सौ. अलका कुबल यांनी धावती भेट दिली. त्यांचे सागरेश्वर येथे एका मालिकेचे चित्रीकरण चालू असताना त्या जन्मघर स्मारकामध्ये आल्या होत्या. जन्मघर स्मारकाच्या आतील मोकळया जागेत श्री. संजय बनसोडे यांच्या सांगण्यावरुन तारेचे कुंपण करुन घेतले आहे.

२.२ विठामाता स्मृती दिनानिमित्त दि. १८.८.२०१६ रोजी यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारकामध्ये विठामाता चव्हाण यांच्या स्मृती दिनानिमित्त महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या वेळी देवराष्ट्रे गावच्या महिला सरपंच सौ. कल्पना मोरे यांच्या हस्ते विठामाताच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या महिला मेळावा कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी देवराष्ट्रे गावातील ग्रामस्था व महिला यांना श्री. बी. के. शिंदे यांनी सर्वांना प्रबोधन केले. तसेच गावातील हनुमान भजनी मंडळाने सायंकाळी ४ ते ७.३० पर्यंत भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

२.३ **श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, सांगली यांची स्मारकास भेट** :- दि. १८.१०.२०१६ रोजी सांगली जिल्याचे पोलीस अधीक्षक श्री. दत्तात्रय शिंदे यांनी 'निर्भय सायकल रॅली' चे आयोजन केले होते. त्या निमित्ताने ते सागरेश्वर येथे आले असता त्यांनी यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जन्मघर स्मारकास भेट दिली. त्यावेळी जन्मघराच्या पश्चिम बाजूस चालू असलेल्या बांधकामाबाबत त्यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी ते

बांधकाम बंद करण्यास सांगितले. अन्यथा कडक कार्यवाही केली जाईल. तसेच सांगली जिल्हयाचे जिल्हा प्रमुख श्री. शेखर गायकवाड यांच्याशी या विषयावरती चर्चा करतो असे त्यांनी सांगितले.

२.४ **मा. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी दि. २५ नोव्हेंबर २०१६** :- दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. मा. चव्हाणसाहेबांच्या प्रतिमेस सांगली सातारा विधानपरिषदेचे विद्यमान आ. श्री. मोहनराव कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सर्जेराव यादव, तसेच कडेगाव तालुक्याच्या तहसिलदार सौ. अर्चना शेटे यावेळी उपस्थित होत्या. मा. आ. मोहनराव कदम यांचा सत्कार श्री. बी. के. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाच्या वेळी बोलताना कदम यांनी गावास राजकारण, समाजकारण, दुष्मनी इत्यादी बाजूला ठेवून मा. चव्हाणसाहेबांच्या कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित राहिले पाहिजे. चव्हाणसाहेबांचे राहणीमान हे सर्वसाधारण माणसाप्रमाणे होते. ते कोणत्या एका राजकीय पक्षाचे नव्हते, त्यामुळे जन्मघरात सर्वांनी उपस्थित राहिले पाहिजे असे ते म्हणाले. तसेच या दिवशी सकाळी ८ ते १०.३० पर्यंत कुंडल येथील भजनी मंडलाने भजनाचा कार्यक्रम पार पाडला आणि सायंकाळी देवराष्ट्रे येथील हनुमान भजनी मंडळाने ४ ते ७.३० पर्यंत भजन गायले.

२.५ **परीक्षेला सामोरे कसे जावे** :- दि. १०.१.२०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने देवराष्ट्रे येथील यशवंतराव चव्हाण हायस्कूलमध्ये इयत्ता १० व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी एक कार्यक्रम आयोजित केला होता. दहावी व बारावी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा आहे. ही संधी एकदाच येते त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे त्यासाठी त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी 'परीक्षेला सामोरे कसे जावे' या विषयावरती तासगाव तालुक्याचे शिक्षणाधिकारी श्री. प्रदीपकुमार कुडाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. कुडाळकर म्हणाले की दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष महत्वाचे आहे. परंतु शिक्षण हा अव्यतपणे चालू असणारा प्रवास आहे हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावे. मुख्य परीक्षा अगदी तोंडावरती आल्या आहेत. उरलेल्या दिवसांचे वेळापत्रक तयार करुन जास्तीत जास्त वेळेचा उपयोग करावा. 'चिंतेपेक्षा चिंतन करा आणि काळजीपेक्षा काळजी घ्या'. आत्मविश्वासने परीक्षेला सामोरे जावा यश तुम्हाला निश्चित मिळेल असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

२.६ **मा. यशवंतराव चव्हाण जयंती दि. १२ मार्च २०१७ : कवी संमेलन** :- दि. १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारकामध्ये कवी संमेलन पार पडले. 'चल उठ आता बंदुकीच्या नळीखाली गीत समतेचे गाऊ, लावावाच लागेल सूर नाही लागला तर हा देश सोडून जाऊ' अशी कवित करत श्री. सर्जेराव खरात यांनी कवी संमेलनास सुरुवात केली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्रे देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने कवी संमेलनाचे आयोजन केले होते. कवी संमेलनाचे हे तिसरे वर्ष होते. या कवी संमेलनात स्त्री वेदनेचा हुंकार उमटला. यासह नोट बंदी, वाढता दहशतवाद, क्षणोक्षणी बदलती राजकीय परिस्थिती, शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्या यासह विविध विषयांना स्पर्श करणा-या कविता सादर करण्यात आल्या. कवी नारायण सुमंत यांच्या अध्यक्षतेखाली हे कवी संमेलन पार पडले. बीडचे अतुल कुलकर्णी यांनी बाळया या कवितेतून शिक्षणाच्या बदलत्या परिस्थितीवर नेमकेपणाने बोट ठेवले. सत्याप्रेम लगड यांनी वात्रठीकेतून राजकारणाचे बदलते प्रवाह यावर भाष्य केले. कवी नारायण सुमंत यांनी तर नोट बंदी वरती जबरदस्त अशी टीका करत कवी संमेलनास रंगत वाढवली.

मा. चव्हाणसाहेबांच्या प्रतिमेस राष्ट्रवादी युवकचे जिल्हा अध्यक्ष व सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य श्री. शरद लाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा अध्यक्ष श्री. पृथ्वीराज देशमुख यांनी देखील मा. चव्हाणसाहेबांच्या जन्मघरास भेट दिली. कडेगाव तालुका तहसिलदार

तसेच उपविभागीय अधिकारी यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी गेलो असता त्यांनी सांगली येथे १२ मार्च रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा असल्यामुळे आम्हाला या कार्यक्रमास येता येणार नाही असे सांगितले. तसेच सांगली सातारा विधान परिषदेचे विद्यमान मा. आ. मोहनराव कदम यांना देखील या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले होते परंतु ते काही कारणामुळे येऊ शकले नाहीत.

२.७ **मा. यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारकास मार्च २०१७ पर्यंत पर्यटकांच्या भेटी** :- मा. यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारक देवराष्ट्रे येथे २६ जून २०१४ पासून येणा-या सर्व पर्यटकांची रजिस्टर नोंद ठेवण्यात आली आहे. रजिस्टरमध्ये प्रत्येक दिवसाची नोंद वेगळी घेतली आहे. पर्यटकांचे नाव, फोन नंबर, गाव, अभिप्राय, सही इत्यादीप्रमाणे. मा. चव्हाणसाहेबांचे जन्मघर पाहण्यासाठी (१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७) विविध ठिकाणच्या १८१३ पर्यटकांनी भेट दिली आहे. त्यांचे अभिप्राय देखील चांगले आहेत. काही प्रमाणात सुधारणा करावयास सांगितल्या आहेत. काहीनी त्यांच्या वापरातील वस्तू ठेवण्यास सांगितल्या आहेत. याच कालावधीत जन्मघर स्मारकास विविध ठिकाणच्या १३ जिल्हा परिषद शाळेच्या ८७० विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण हे पुस्तकात माहिती होते. परंतु जन्मघर स्मारकात आल्यानंतर मा. चव्हाणसाहेबांचे काम, व किर्ती त्यांना माहित झाली. संपूर्ण इतिहास त्यांना पहावयास मिळाला. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या विचाराने व प्रेरणेने येणा-या पर्यटकांचे मन हेलावले जाते. त्यांच्याकडून जन्मघरातील माती कपाळी लावून नमस्कार केला जातो. या पर्यटकांना मा. चव्हाणसाहेबांची भाषणे ऐकवली जातात व एक लहान चित्रफित देखील दाखवली जाते. चव्हाणसाहेबांची जडण घडण पाहून एका साध्या कुटुंबातील सर्वसामान्य माणूस एवढया मोठया पदावरती जातो याचे उदा. म्हणजे यशवंतराव चव्हाण असे उद्‌गार देखील पर्यटक काढत असतात. त्यांचा आदर्श भावी पिढीने घ्यावा. तसेच आताच्या सर्व राजकीय नेत्यांनी ही घ्यावा. निस्वार्थीपणाने समाजकार्य करावे असे जर राजकारण्यांनी केले तर महाराष्ट्र अजून किती पुढे जाईल असे उद्‌गार काढले जातात.

हे सर्व कार्यक्रम पार पाडत असताना श्री. संजय बनसोडे, आस्थापना व्यवस्थापक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

२.८ **मा. यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारकातील ग्रंथालयाचा वापर** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्याकडून देवराष्ट्रे केंद्राला स्पर्धा परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय चालू केले आहे. प्रतिष्ठानकडून या चालविल्या जाणा-या उपक्रमास चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. देवराष्ट्रे व देवराष्ट्रे पंचक्रोशीतील या ग्रंथालयाचा लाभ घेणा-या सभासदांची यादी पुढीलप्रमाणेः

| अ. क्र. | सभासद | सभासद संख्या |
|---|---|---|
| १ | स्पर्धा परीक्षा अंतर्गत सभासद | ४९ |
| २ | सर्वसाधारण सभासद | १४७ |

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांसाठी प्रतिष्ठानने उपलब्ध करुन दिलेल्या पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणेः

| अ. क्र. | तपशील | पुस्तके |
|---|---|---|
| १ | कथा / कादंबरी | २६ |
| २ | स्पर्धा परीक्षा - मराठी | २८३ |
| ३ | स्पर्धा परीक्षा - इंग्रजी | ४५ |
| ४ | ग्रंथ तुमच्या दारी योजनेंतर्गत पुस्तके | २०० |

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम देखील राबविले जातात. या विद्यार्थ्यांकडून रु.२००/- अनामत रक्कम स्वीकारली जाते. तसेच त्या विद्यार्थ्याने ग्रंथालयाचा सभासद राजीनामा लिहून दिल्यानंतर त्याची अनामत रक्कम परत दिली जाते. जागेचा अभाव असल्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तके वाचनासाठी घरी दिली जातात.

या व्यतिरिक्त प्रतिष्ठानने कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्या अंतर्गत चालवली जाणारी योजना 'ग्रंथ तुमच्या दारी' या योजनेतून दोन पेटया उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदर पेटीतील पुस्तके ही सांगली येथून प्रति चार महिन्यांनी बदलून आणली जातात. त्यामुळे वाचकांना नवनवीन पुस्तकाचा आनंद मिळतो. ग्रंथालयाचे सर्वसाधारण व स्पर्धा परीक्षा असे दोन भाग पाडले आहेत. सर्वसाधारण सभासद होण्यासाठी केवळ ओळखपत्र व एक फोटो घेतला जातो. त्यांच्याकडून कोणतीही अनामत रक्कम स्वीकारली जात नाही. मोफत वाचनालय असल्यामुळे वाचकांचा प्रतिसाद चांगला आहे. ग्रंथालयात दररोज पाच पेपर येतात (सकाळ, पुढारी, लोकमत, पुण्यनगरी, अॅग्रो अॅग्रोवन). पेपर वाचनासाठी दररोज लोक येत असतात.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने देवराष्ट्रे केंद्रामध्ये दोन संगणक दिले आहेत. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांसाठी तसेच इतर शालेय विद्यार्थ्यांना त्या संगणकावरती इंटरनेटच्या माध्यमातून सर्व परीक्षांची माहिती तसेच अभ्यासक्रम देखील पहावयास मिळतो. देवराष्ट्रे केंद्रामध्ये इंटरनेट सुविधा असल्यामुळे विद्यार्थी त्याचा वापर करत असतात. विद्यार्थ्यांकडून यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. विद्यार्थ्यांना शैक्षणिक माहिती, परीक्षेचे फॉर्म किंवा इतर माहिती यांच्या व्यतिरिक्त फेसबुक वगैरेंसाठी मज्जाव घालण्यात आला आहे. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत जवळपास ४० विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला आहे.

२.९ **मा. यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारकातील फोटो** :- यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारक देवराष्ट्रे येथे त्यांच्या जन्मघरी त्यांचे लहानपणापासून ते संरक्षणमंत्री पदापर्यंतचे फोटो लावण्यात आले आहेत. देवराष्ट्रे केंद्रामध्ये सहा खोल्यांमध्ये विविध प्रसंगाचे, कार्यक्रमाचे, भेटीचे व व्यक्तिगत चव्हाणसाहेबांचे, त्यांच्या कुटुंबाचे असे एकूण १४७ फोटो लावण्यात आले आहेत. तसेच त्या फोटोच्या खाली त्या फोटोमधील मजकूर, संदर्भ व फोटोमधील व्यक्तींची नांवे लिहिण्यात आली आहेत. त्यामुळे जन्मघर पहावयास येणा-या पर्यटकांना प्रत्येक व्यक्तीची ओळख होते व त्यांचे कार्य पहावयास मिळते. जन्मघर स्मारकामध्ये सहा खोल्यांमध्ये असलेल्या फोटोची यादी पुढीलप्रमाणेः

| अ. क्र. | खोली क्र. | फोटो |
|---|---|---|
| १ | खोली क्र. १ | १ |
| २ | खोली क्र. २ | ४५ |
| ३ | खोली क्र. ३ | ३० |
| ४ | खोली क्र. ४ | २५ |
| ५ | खोली क्र. ५ | २५ |
| ६ | खोली क्र. ६ | १२ |

मा. चव्हाणसाहेबांच्या जन्मघरामध्ये एकूण दहा सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत. हे कॅमेरे २४ तास चालू असतात त्यामुळे येणा-या पर्यटकांवरती लक्ष ठेवण्यास मदत होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या मुख्यालयामध्ये हे सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहण्यासाठी इंटरनेटचा वापर केला जातो. त्यामुळे मुंबई मुख्यालयाकडून देवराष्ट्रे केंद्रामधील कर्मचा-यांवर लक्ष देखील ठेवण्यात येते. तसेच जन्मघर स्मारकामध्ये एकूण तीन अग्निरोधक उपकरणे ठेवण्यात आली आहेत.

देवराष्ट्रे केंद्रामध्ये मा. चव्हाणसाहेबांची पुस्तके विक्रीसाठी ठेवलेली आहेत. या वर्षात देवराष्ट्रे केंद्राची पुस्तक विक्री ही जवळ पास रु.२,१००/- ची झाली. जन्मघर स्मारक हे महिन्यातून एकदा सारवून घेतले जाते. प्रशासकीय कामे व सुरक्षा व्यवस्था वेळापत्रकाप्रमाणे सुरु आहे.

५.३ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०१६ :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यातर्फे दरवर्षी ऑक्टोबरमध्ये एका विशिष्ट क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या व फेस्कॉमच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहामध्ये आयोजित केला जातो. त्या मेळाव्यामध्ये दोन पुरुष व दोन महिला ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येतो. सत्काराचे स्वरुप शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व गौरव पत्र असे असते. तसेच प्रवासासाठी रु.१५००/- दिले जातात. सत्कार समारंभाच्या आधी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रम सर्वसाधारणपणे सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत चालतो. त्यानुसार यावर्षी रविवार दि. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी चव्हाण केंद्रामध्ये बांद्रा ते दहिसर या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटनांचा मेळावा भरविण्यात आला. मेळाव्याचे अध्यक्ष श्री. शरद काळे हे होते व प्रमुख पाहुणे सुप्रसिध्द दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल उपस्थित होते. अंदाजे ४०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक मेळाव्याला उपस्थित होते. मेळाव्याच्या सुरुवातीला श्री. सुरेश चांदवणकर यांनी तयार केलेल्या मराठी व हिंदी जुन्या गाण्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

सत्कारासाठी महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिकांनी आपले अर्ज पाठविले होते. सरचिटणीस श्री. शरद काळे व विश्वस्त श्री. बी. के. अग्रवाल यांच्या समितीने सत्कारासाठी खालील दोन पुरुष ज्येष्ठ नागरिक व दोन महिला ज्येष्ठ नागरिक यांची निवड केली. तसेच या वर्षांपासून वरील कार्यक्षेत्रात ज्येष्ठांसाठी काम करणा-या ज्येष्ठ नागरिक संघटनेचाही सत्कार करण्याचे ठरले. त्यानुसार त्या ज्येष्ठ नागरिकांचा व संघटनेचा समारंभामध्ये सत्कार करण्यात आला.

१) **पुरुष ज्येष्ठ नागरिक**

१. श्री. पांडुरंग विठ्ठल म्हापसेकर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई

२. श्री. मनोहर विनायक जोगळेकर, बोरीवली (पश्चिम) मुंबई

२) **महिला ज्येष्ठ नागरिक**

१. श्रीमती हिरा दया पवार, बोरीवली (पश्चिम) मुंबई

२. सौ. वर्षा मधुकर रेगे, गोरेगाव (पश्चिम) मुंबई

३) **ज्येष्ठ नागरिक संघटना**

१. ज्येष्ठ नागरिक संघ, बेस्ट नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई

अर्ज केलेल्या अनेक महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिकांचे तसेच ज्येष्ठ नागरिक संघटनेचे काम चांगले होते. परंतु वयाची ज्येष्ठता व कामाची व्यापकता आणि सातत्य लक्षात घेऊन नावांची निवड करण्यात आली होती. सत्कार हा समाजातर्फे ज्येष्ठ नागरिकांचा केलेला कृतज्ञतेचा नमस्कार आहे. अनेक लोक चांगले काम करतात त्यातूनच निवड करावी लागते. निवड करणे म्हणजे इतरांना नाकारणे नव्हे, त्या नावांचा विचार पुढील वेळीही केला जाऊ शकतोच अशी प्रतिष्ठानची धारणा आहे.

## ५.४ विज्ञानगंगा :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्याला 'विज्ञानगंगा' या नावाने वेगवेगळी वैज्ञानिक व्याख्याने प्रतिष्ठानमध्ये आयोजित करण्यात आली. त्यामध्ये खालील व्याख्यानांचा समावेश आहे.

४.१ **गुरुत्व लहरी -** दि. १४.३.२०१६ :- प्रा. संजीव धुरंधर - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानगंगा कार्यक्रमांतर्गत 'आयुका' चे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ मा. प्रा. संजीव धुरंधर यांचे

'गुरुत्व लहरी' या विषयावर व्याख्यान सोमवार दि. १४ मार्च २०१६ रोजी आयोजित करण्यात आले होते. अंतराळातील कृष्णविवरांच्या टकरीमुळे नुकत्याच शोध लागलेल्या गुरुत्वीय लहरींच्या संशोधनाचा आजवरचा प्रवास, त्यातले अडथळे आणि या शोधात जगभरच्या शास्त्रज्ञांनी उपसलेले अविश्रांत कष्ट, भारतीय शास्त्रज्ञांचे त्यातील योगदान आणि या शोधामुळे विश्वनिर्मितीचे रहस्य उलगडण्यात मिळू शकणारी दिशा यावर आयुकाचे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ मा. प्रा. संजीव धुरंधर यांचे 'गरुत्व लहरी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

४.२ **टेक्नोव्हिजन-२०३५** - दि. २०.४.२०१६ :- मा. डॉ. अनिल काकोडकर - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या विद्यमाने विज्ञानगंगा या कार्यक्रमात 'टेक्नोव्हिजन-२०३५' या विषयावर ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ मा. डॉ. अनिल काकोडकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. सदर कार्यक्रमात भारतासमोरील पुढील प्रश्नांवर विवेचन झाले. त्यामध्ये स्वच्छ हवा आणि पाणी, अन्न आणि आहार सुरक्षा, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, २४ तास मिळणारी ऊर्जा, निवारा, रोजगाराच्या संधी, दळणवळण, राष्ट्रीय सुरक्षा, सांस्कृतिक विविधता, प्रशासन, पर्यावरण अशा भारतासमोर असणा-या विविध प्रमुख समस्या आणि २०३५ साली त्यांचे स्वरुप कसे असेल याचा अहवाल डॉ. अनिल काकोडकर यांनी यावेळी मांडला. श्रोत्यांचा यास उत्स्फूर्त सहभाग लाभला होता.

४.३ **आगामी पावसाळा** - दि. १८.५.२०१६ :- डॉ. रंजन केळकर - भारतात दर तीन ते चार वर्षांने दुष्काळ पडतो ही गोष्ट फार जुनी आहे. महाराष्ट्रात तर असा दुष्काळ तीन वर्षातून कधी कधी सलगही पडत आला आहे आणि यंदाचा दुष्काळ तर अधिक कडक होता. त्याचे चटके लातूरच्या निमित्ताने आपण रोज वाचत आहोत. त्यामुळे दरवर्षीच्या मे महिन्यात आगामी पावसाळा कसा असेल याची उत्सुकता सर्व जनतेला असते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांनी संयुक्तपणे सुरु केलेल्या विज्ञानगंगा या मासिक व्याख्यानमालेतील तिसरे व्याख्यान 'आगामी पावसाळा' या विषयावर प्रसिध्द हवामानतज्ञ डॉ. रंजन केळकर यांनी दिले. मान्सून म्हणजे पाऊस नाही तर मान्सून म्हणजे विशिष्ट प्रसिध्द मोसमामध्ये वाहणारे नैऋत्य मोसमी वारे, जे येताना पावसाचे ढग घेऊन येतात. भारतातला मान्सून हा एक अद्‌भूत फेनोमिना आहे. भारताचे आणि मान्सूनचे फार जुने नाते आहे. इतर युरोपीय देशांमध्ये मान्सून नाही. अद्ययावत असणा-या भारतीय हवामान खात्याकडे भारताच्या गेल्या १५० वर्षांच्या पावसाच्या नोंदी आहेत. ज्या या मान्सूनची विविध वैशिष्टये सांगतात. जागतिक घडामोडीमध्ये हवामान बदलावर सतत बोललं जातं. परंतु हवामान बदल सगळीकडे लागू होत नाही. वैश्चिक पातळीवर वेगळा बदल होतो आणि स्थानिक पातळीवर त्याचा परिणाम असतो. मराठवाडयातील दुष्काळ हा तिथल्या भौगोलिक परिस्थितीमुळे उद्‌भवतो. नैऋत्य मोसमी वारे तिथून वाहत नाहीत. तसेच बंगालच्या उपसागरातून पाऊस घेऊन वाहणारे वारे तिथपर्यंत पोहोचत नाहीत म्हणून आपली भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळाकडे नियोजनाचा अभाव म्हणून बघितले पाहिजे. आपला मान्सून आपल्याला दरवर्षी चार महिने भेटायला येत असतो. त्याला जपूया, त्यावर प्रेम करुया, साठवू या, त्याचे जतन करु या आणि दुष्काळाशी सामना करु या असा संदेश डॉ. केळकर यांनी यावेळी दिला.

४.४ **भौगोलिक स्थलदर्शक प्रणाली (जी.पी.एस.)** - दि. २४.६.२०१६ :- डॉ. आर. आर. नवलगुंड - मानवी आयुष्य समृध्द करण्यासाठी काय करता येईल हे देखील उपग्रहांच्या निर्मितीचे प्रयोजन होते असे प्रतिपादन इस्त्रोच्या 'स्पेस ॲप्लिकेशन सेंटर' चे माजी संचालक डॉ. आर. आर. नवलगुंड यांनी केले. ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व मराठी विज्ञान परिषदेतर्फे आयोजित विज्ञानगंगा या व्याख्यानमालेत 'भौगोलिक भूदर्शक प्रणाली' या विषयावर व्याख्यान देताना बोलत होते. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे व कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ व मराठी विज्ञान परिषदेचे अ. पां. देशपांडे आदी उपस्थित होते.

अन्य ग्रहांवरील जीवसृष्टी तसेच तिथले नैसर्गिक स्त्रोत, अवकाशस्थ घटक आदींच्या अभ्यासासाठीच उपग्रह अंतराळात सोडले गेले. तसेच आपण कुठे आहोत, आपले अक्षांक्ष-रेखांश यालाच दिशादर्शन म्हणत असून प्राचीन भारतातही भौगोलिक खुणांवरुन दिशादर्शन केले जात असे असे सांगून १९५७ साली रशियाने 'स्पुटनिक' उपग्रह अवकाशात सोडल्यावर अशा दिशादर्शनाची गरज जगाला भासू लागली. यानंतर उपग्रहांच्या निर्मितीवर गांभीर्याने विचार करण्यात आला. 'ग्लोनास' ही रशियाची तर 'गॉलिलिओ' ही युरोपाची अशा दिशादर्शन प्रणाली नंतरच्या

काळात निर्माण झाल्या. मात्र 'जीपीएस' या अमेरिकी प्रणालीचा त्यांच्या लष्करासाठी वापर होत असल्याने भारताला स्वतःच्या लष्करासाठी ही प्रणाली वापरण्यासाठी मर्यादा आल्या म्हणूनच भारताने स्वतःची दिशादर्शन प्रणाली निर्माण करण्याचा ध्यास घेतला. यातूनच 'इंडियन रिजनल नॅव्हीगेशनल सिस्टिम' (आयआरएनएसएस) म्हणजेच 'नाविक' या भारतीय प्रणालीचा उदय झाला. या भारतीय प्रणालीद्वारे भारतीयांना उपयुक्त असा माहितीचा खजिना 'भुवन' या पोर्टलवर उपलब्ध आहे असेही त्यांनी स्पष्ट केले. भारतात सध्या 'एज्युसॅट' मार्फत वैश्विक शाळेच्या संकल्पनेचा महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी स्वीकार केला असून 'टेलिमेडीसीन' या ग्रामीण भागातील नागरिकांवर देशातील चांगल्या डॉक्टरांमार्फत उपचार करण्याच्या संकल्पनेचा प्रसारही देशात झाला आहे. तसेच भारतातील कृषी व्यवस्थेला महत्त्वाचा हातभार सध्या इस्त्रोने सोडलेले उपग्रह करत असून याचबरोबरीने भूजल पातळी, सागरी अभ्यास, माशांची उपलब्धता, नद्यांची परिस्थिती आदी अनेक मुद्दयांवर भारतीय उपग्रह चांगली कामगिरी बजावत असल्याचे नवलगुंड यांनी सांगितले.

४.५ **घनकच-यापासून वीज आणि मिथेनची निर्मिती** - दि. ३०.७.२०१६ :- डॉ. ए. बी. पंडीत - सध्या सगळया भारतभर भस्मासूर झाला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि बदलत्या राहणीमानामुळे निर्माण होणा-या कच-याचे प्रमाण वाढत चालले आहे आणि कचरा साठवण्याच्या जागा संपत चालल्या आहेत. त्यामुळे 'इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी' या माटुंग्याच्या संस्थेतील प्रा. अनिरुध्द पंडित यांनी घनकच-यापासून मिथेन हा जळाऊ वायू आणि पुढे या वायूपासून वीज बनवण्याचे तंत्र विकसित केले आहे. आता हाच मार्ग भारतभरच्या सर्व नगरपालिकांना अवलंबावा लागणार आहे. केवळ हाच पर्याय शिल्लक राहणार आहे म्हणून हा विषय अतिशय महत्वाचा असल्यामुळे त्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे असे मत प्रा. अनिरुध्द पंडित यांनी यावेळी मांडले. दि. ३० जुलै रोजी चव्हाण केंद्र या ठिकाणी व्याख्यानाचे आयोजन केले होते. या व्याख्यानास श्रोत्यांचा उत्तम सहभाग होता.

४.६ **डावे-उजवे (अणु रेणूंची संरचना)** - दि. २६.८.२०१६ :- डॉ. मानसी राजाध्यक्ष - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद हया दोन संस्थांच्या वतीने 'डावे-उजवे' अर्थात अणु-रेणूंची संरचना ही संकल्पना जनसामान्यांसमोर सोप्या भाषेत स्पष्ट करणारे व्याख्यान शुक्रकार दि. २६ ऑगस्ट २०१६ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान ऐकण्यासाठी उपस्थित श्रोत्यांमध्ये शाळकरी विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती. व्याख्यानानंतर वक्त्यांशी झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात मोठयांबरोबरच या विद्यार्थ्यांनीही अतिशय उत्साहाने भाग घेतला. दिसायला सारखे असणे वा वाटणे, आणि प्रत्यक्ष सारखे असणे यात खूप मोठा फरक असतो हे अणु-रेणूंच्या संरचनेमध्ये काळजीपूर्वक लक्षात घ्यावे लागते हा मुद्दा डॉ. मानसी राजाध्यक्ष यांनी प्रश्नोत्तरा दरम्यान अधिक स्पष्ट केला. डॉ. राजाध्यक्ष यांचे व्याख्यान पडद्यावर बदलणा-या अनेक स्लाईडसच्या मदतीने होत असल्याने श्रोत्यांपर्यंत ते उत्तमरित्या पोहोचले व अतिशय रंगले.

४.७ **विज्ञान ऑलिंपियाड** - दि. २१.९.२०१६ :- प्रा. विजय सिंग - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानगंगा कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या व्याख्यानमालेतील सातवे पुष्प २१ सप्टेंबर २०१६ रोजी चव्हाण केंद्र येथे पार पडले. या कार्यक्रमाला शालेय विद्यार्थ्यांची व पालकांची लक्षणीय उपस्थिती होती. विज्ञान ऑलिंपियाड म्हणजे काय व त्यासाठी करावयाची तयारी याची माहिती विद्यार्थी व पालकांना समजेल अशा सोप्या भाषेत प्रा. विजय सिंग यांनी अगदी खेळीमेळीच्या वातावरणातून दिली. राष्ट्रीय शैक्षणिक, अनुसंधान व प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) (NCERT) शैक्षणिक विकासाला गुणात्मक दृष्टिने पाठिंबा देतात आणि असमानता दूर करण्यासाठी व सर्व विद्यार्थ्यांना एकस्वरुपाचे शिक्षण मिळण्याबाबत विशेष प्रयत्नशील असतात. एनसीईआरटी विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता मान्य करतात व त्यांच्यातील प्रतिभेला राष्ट्रीय प्रतिभा शोध योजनेंतर्गत प्रोत्साहन देतात. या योजनेचा उद्देश प्रतिभावन विद्यार्थी ओळखणे व त्यांच्या प्रतिभेचे संवर्धन करणे असा होता म्हणून या योजनेच्या अंतर्गत विज्ञान, सामाजिक विज्ञान, इंजिनिअरिंग, चिकित्सा, प्रबंधन आणि कायदा अशा वेगवेगळया क्षेत्रांचा समावेश करण्यात येतो. यात गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान व मासिक शिष्यवृत्तीमार्फत आर्थिक मदत दिली जाते. ऑलिंपियाड हे फक्त शालेय विद्यार्थ्यांसाठीच आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही यात भाग घेता येत नाही.

**ऑलिंपियाडमधील भारताचा सहभाग** : भारताचा आंतरराष्ट्रीय सहभाग तसा अलिकडचा आहे. गणित ऑलिंपियाडमध्ये १९८९ मध्ये भारत प्रथमच सहभागी झाला. पुढे पदार्थविज्ञान (सन १९९८), रसायनशास्त्र (१९९९), जैविकशास्त्र (२०००), खगोलशास्त्र (२००४) आणि बालविज्ञान (२००७) असा भारताचा सहभाग वाढत गेला. दरवर्षी सुमारे १५,००० ते ५०,००० मुले ऑलिंपियाडसाठीच्या स्पर्धेत सहभागी होतात. ऑलिंपियाडसाठी भारत सरकार संपूर्ण आर्थिक सहाय्य करते व पुरेपूर प्रोत्साहन देते. भारतीय ऑलिंपियाडचे मुख्य केंद्र म्हणजे मुंबईतील होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन (HBCSE) हे होय. HBCSE हे टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्चच्या अंतर्गत कार्यरत आहे. ऑलिंपियाड आणि ऑलिंपिक खेळ यांच्यातले मुख्य साम्य म्हणजे दोन्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर होतात. मात्र, ऑलिंपिक हे दरवर्षी आयोजित होते. विविध विषयांतील ऑलिंपियाड ही वेगवेगळया वेळी व वेगवेगळया ठिकाणी आयोजित होत असतात. प्रत्येक देशाला त्यात सहा विद्यार्थी पाठवता येतात. हे सहा विद्यार्थी निवडण्यासाठी इतर देशांप्रमाणेच भारततही स्पर्धा परीक्षा होतात. त्यातील सर्वोत्तम मुले आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाडमध्ये गेली व त्यातील ९९ टक्के मुलांनी पदके व प्रमाणपत्रे मिळवली आहेत. ऑलिंपियाडमध्ये अधिकाधिक शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा व आपल्या गुणवंत व चमकदार मुलांची त्यातून निवड व्हावी यासाठी अधिकाधिक शाळांनी त्यात सहभागी व्हावे असा भारत सरकारचा प्रयत्न असतो. या प्रयत्नांना साथ देण्यासाठीच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे मराठी विज्ञान परिषदेच्या सहयोगाने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.

४.८ **पाचवी शक्ती** - दि. २२.१०.२०१६ :- प्रा. एन. कृष्णन - विज्ञानगंगा उपक्रमांतर्गत होणा-या कार्यक्रमाचे आठवे पुष्प दि. २२ ऑक्टोबर २०१६ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडले. हया आठव्या मार्गदर्शन कार्यक्रमाचा विषय होता The Fifth Force (पाचवी शक्ती) हा होता. आतापर्यंत आपल्याला गुरुत्वाकर्षण शक्ती, चुंबकीय शक्ती, तीव्र अणुशक्ती आणि सौम्य अणुशक्ती हया चार प्रकारच्या शक्ती माहित आहेत. तथापि, पाचवी शक्ती अस्तित्वात असल्याचे पुरावे हाती येत आहेत. याची माहिती प्रा. एन. कृष्णन यांनी दिली. यासाठी केलेले मार्गदर्शन लक्षपूर्वक ऐकून कार्यक्रमाच्या शेवटी शंकासमाधानासाठी अनेक प्रश्न विचारले गेले.

४.९ **कृष्ण विवर** - दि. १६.११.२०१६ :- प्रा. जे. एस. यादव - विज्ञानगंगा उपक्रमांतर्गत होणा-या कार्यक्रमाचे नववे पुष्प दि. १६ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडले. विश्वाच्या उत्पत्तीचे कुतूहल आपल्या सर्वांनाच आहे. जगातील कित्येक शोधसंस्था या विषयावर काम करत आहेत. परंतु आजही या कुतूहलाचे निरसन झालेले नाही. त्याविषयी अनेक प्रयोग सतत होत असतात. कृष्णविवर तो भाग आहे, जिथे गुरुत्वाकर्षण इतके प्रबळ असते की तिथून काहीही बाहेर जाऊ शकत नाही अगदी विद्युत चुंबकीय तरंगसुध्दा (उदा. प्रकाश) बाहेर येऊ शकत नाहीत. जेव्हा एखाद्या ता-यामधील संपूर्ण इंधन जळून जाते आणि त्याचा विस्फोट होतो, हा स्फोट झाल्यानंतर ते हळूहळू आकुंचन पावते, गडद व दाट होते, त्याचे न्यूट्रोन ता-यात रुपांतर हाते. जर हा तारा अगदी विशाल असेल तर तो गुरुत्वाकर्षणाच्या दबावाने आकुंचन पावेल व एका काळया रंगात बदलत जाईल त्याला आपण कृष्णविवर असे म्हणतो. तो इतका गर्द असतो की, तो दिसतही नाही. मग तो असल्याचे सिध्द कसे होते ते इतर पदार्थांच्या परस्पर झालेल्या क्रिया प्रतिक्रियांवरुन सिध्द होते.

४.१० **आशिया खंडातील मानव मुळात आफ्रिकन आहेत का ?** - दि. ८.१२.२०१६ :- डॉ. सुभाष वाळिंबे - विज्ञानगंगा उपक्रमांतर्गत होणा-या कार्यक्रमाचे दहावे पुष्प दि. ८ डिसेंबर २०१६ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडले. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधील मानववंश शास्त्राचे निवृत्त प्राध्यापक डॉ. सुभाष वाळिंबे यांचे ‘आशिया खंडातील मानव मुळात आफ्रिकन आहेत का ?’ या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानात प्रा. सुभाष वाळिंबे यांनी मानववंश शास्त्रासंबंधित अतिशय रोमांचकारक खुलासे केले. भारतातील जैविक ॲन्थ्रोपोलिक इतिहासाचे वर्णन केले. त्यांना मानववंश शास्त्र या संशोधनात येणा-या अडचणी व प्रमुख आव्हानांना कसे सामोरे जावे लागले व त्या आव्हानातून त्यांना नवीन शोध कसे मिळत गेले याबद्दल त्यांनी त्यांचे अनुभव सांगितले. जैविक पुरातत्व शास्त्राच्या उत्क्रांतीवर एक उत्कृष्ठ विहंगावलोकन प्रा. वाळिंबे यांनी केले.

४.११ **हल्लीच्या फुलांना वास का येत नाही ?** - दि. १६.१.२०१७ :- प्रा. नागेश टेकाळे - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञानगंगा उपक्रमांतर्गत होणा-या कार्यक्रमाचे अकरावे पुष्प दि. १६ जानेवारी २०१६७ रोजी 'हल्लीच्या फुलांना वास का येत नाही ?' या विषयावरील भाषण नुकतेच पार पडले. विशेष म्हणजे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. नागेश टेकाळे यांनी उत्कष्ट उदाहरणे देऊन उपस्थितांची मने जिंकली. आपल्या आयुष्यात घडणारी प्रत्येक गोष्ट सुवासाशी कशी निगडित आहे याची उदाहरणेही त्यांनी दिली. सुरुवातीला टेकाळे यांनी पर्यावरणाची व्याख्या स्पष्ट केली. ती अशी जैविक आणि अजैविक घटकांचा एकमेकांस पूरक असा एकत्रित मिलाप, त्याला संतुलित पर्यावरण असे म्हणतात. त्यानंतर सुंदर फुलांचे आकर्षण दोन प्रकारचे असते. एक रंग आणि दुसरा सुवास. रंगाचे सौंदर्य दुरुन न्याहाळता येते पण त्याचा सुवास आपल्याला जवळ खेचून आणतो हे विशेष आहे असेही त्यांनी सांगितले. सुवास निर्मिती करणारी उदाहरणे यामध्ये फूल, देशी गुलाब, सोनचाफा, फळ-पिकलेला आंबा, बी-जीरे, पाने-तुळस, कढीपत्ता, गवती चहा तसेच सर्वात जास्त सुगंध हा तुळसीपासून मिळतो अशी माहिती त्यांनी दिली.

शाळेतील उदाहरण देताना त्यांनी शाळेत केलेला प्रयोग एका वर्गात गणित अभ्यास करत असलेल्या विद्यार्थ्यांना तुळशीच्या झाडाच्या बाजूला बसून अभ्यास करावयास सांगितले. त्यानंतर त्यांच्यामध्ये प्रगती झाल्याचे आढळले. सुगंधी फुलाचे फायदे - यांनी बरेचसे रोग नाहीसे होतात, रोगजंतू नष्ट होतात आणि प्रतिकार शक्ती वाढवतात. तसेच त्यांनी सुगंध हरवलेली फुले यांची माहिती दिली. उदाहरणार्थ सुलतान चंपा, ऑर्किड, पाटल, अतसी, जपाकुसूम, बंधूक, कंदाचे फूल, लाल कमळ, श्वेत कमळ, कडक चंपा, बकुळ, माधवी आणि माधवीलता जंगलतोड, रसायनांचा वापर, वातावरणातील बदल या प्रमुख कारणांमुळे फुलांचा सुगंध हरवतो आहे असे त्यांनी नमूद केले.

४.१२ **Understanding Our Universe : Status & Prospects** - दि. १०.२.२०१७ :- प्रा. टी. पद्मनाभन - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञानगंगा चे बारावे पुष्प दि. १० फेब्रुवारी २०१७ रोजी आयुकाचे खगोलशास्त्रज्ञ मा. प्रा. टी. पद्मनाभन यांचे Understanding Our Universe : Status & Prospects या विषयावरील व्याख्यान पार पडले. या व्याख्यानामध्ये त्यांनी ब्रम्हांडाची निर्मिती होण्यामागचे भौतिकशास्त्राच्या दृष्टीने काय कारण असावे ? ते कशा प्रकारे विकसित झाले ? तसेच या संशोधनामागे भारताचे योगदान काय ? या सर्वांबद्दलची माहिती अतिशय सोप्या भाषेत सांगितली. त्यांनी सांगितले की, विज्ञानात सर्वात आधी जी घटना घडली असेल ती फक्त आणि फक्त विश्वनिर्मितीची. विश्वनिर्मिती कशी झाली हे हे शोधून काढण्यासाठी शास्त्रज्ञांची लॅबोरेटरी म्हणजे संपूर्ण ब्रम्हांड सूर्य, ग्रह, तारे यांचे त्यांना सतत निरीक्षण करावे लागते.

विश्वनिर्मिती या बद्दलच्या शोधाची सुरुवात १९९० पासून झाली. शास्त्रज्ञ भौतिक नियमांची संरचना आणि विश्वाची संरचना यांची सांगड कशा प्रकारे जुळवतात. हे सर्व सोप्या पध्दतीने समजणसाठी न्युटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियम, आईनस्टाइनची विशेष सापेक्षता शाखा, क्वांटम थेअरी या सर्वांचा ब्रम्हांड काय आहे हे समजण्यास काय सहभाग आहे हे सांगितले. न्युटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियम, आईनस्टाईनची विशेष सापेक्षता शाखा या दोन्ही थेअरी मिळून सामान्य सापेक्षता ही थेअरी तयार होते. सामान्य सापेक्षता कशा प्रकारे करते हे ही त्यांनी अतिशय रोचक पध्दतीने सांगितले.

४.१३ **लाईटर साईड ऑफ ग्रॅव्हीटी** - दि. १४.३.२०१७ :- प्रा. जयंत नारळीकर - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोति विज्ञानगंगाचे प्रा. जयंत नारळीकर यांचे तेरावे पुष्प दिनांक १४ मार्च २०१७ रोजी पार पडले. आयुकाचे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर यांचे 'लाईटर साईड ऑफ ग्रॅव्हीटी' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी अतिशय खेळकरपणे आपल्या व्याख्यानाची सुरुवात केली. त्यांनी सांगितले की एके दिवशी ते केंब्रीज विद्यापीठामध्ये याच संदर्भात भाषण देत होते आणि तिथल्या एका

विद्यार्थ्यांने त्यांना सांगितले की, या भाषणाचा विषय ‘लाईटर साईड ऑफ ग्रॅव्हीटी’ असा ठेवायला हवा होता. त्यांनी आपल्या व्याख्यानाची सुरुवात भागवत गीतेतील एका सुंदर गोष्टीने केली. एक मोठा राजा होता. ककुद्मी त्याची एक सुंदर मुलगी होती. तिचे नाव रेवती. ककुद्मीला ब-याच तरुण राजेरजवाडयांच्या त्याच्या मुलीशी लग्न करण्याच्या विनंत्या येत होत्या. त्याला समजेना की, आपल्या मुलीसाठी योग्य तरुण कोण ? त्याने ठरवले की, आपण एखाद्या हुशार व्यक्तीकडून याबद्दल मत घेऊया. तो आपल्या मुलीला घेऊन ब्रम्हदेवाकडे गेला. त्यावेळी ब्रम्हदेव काही कामात होते तर ते म्हणाले की एक मिनिटे थांब. त्यांनी एक मिनिटे प्रतिक्षा केली. ब्रम्हदेवानी त्यांचे काम संपवले आणि विचारले, की कोणत्या कामानिमित्त तुम्ही मला भेटण्यासाठी आलात ? ककुद्मीने त्याची व्यथा सांगितले. तर ब्रम्हदेव हसले आणि म्हणाले तुम्ही खूप उशीरा आलात कारण माझ्या घरी एक मिनिटे म्हणजे पृथ्वीवरील बरीच हजार वर्षे उलटली असतील तरी तुम्ही जी नावे तुमच्या मुलीसाठी सुचवली आहेत ती तुम्ही पृथ्वीवर जाईपर्यंत अस्तित्वातही नसतील. परंतु आता तुम्ही पृथ्वीवर गेलात तर बलराम नामक तरुण तुमच्या मुलीसाठी योग्य असेल, तर अशा प्रकारे ब्रम्हदेव हे कृष्ण विवराच्या ठिकाणीच राहत असतील असे माझे अनुमान आहे. त्यांनी न्युटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियम व त्यातील कमतरता समजाऊन सांगितल्या. अशाच रोचक पध्दतीने त्यांनी कृष्ण विवर, सुपरनोवा स्टार, एडींगटन आणि चंद्रशेखर यांच्यातील संशोधनाबद्दलचे वादविवाद, प्रकाशाबद्दलची माहिती इ. माहिती अतिशय खेळकर पध्दतीने दिली. शेवटी त्यांनी सांगितले गुरुत्वाकर्षण कितीही स्पष्ट केले तरी शेवटी गुरुत्वाकर्षण हे काय आहे ती अजूनही एक मोठी पहेलीच आहे, त्याचे संशोधन चालूच राहील.

## ६. यशवंतराव चव्हाण माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी :-

प्रबोधिनीमध्ये सी-डॅक (C-DAC) पुणे व महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (MKCL) चे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम चालतात. सालाबादप्रमाणे अॅकडमीने विद्यार्थ्यांच्या पसंतीचे आणि आवडीचे उपक्रम हाती घेतले. अॅकडमीने नवीन सुरु केलेल्या कोर्सेसचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी खास उन्हाळी सुट्टीचे वर्ग आयोजित करण्यात आले. उन्हाळी सुट्टीच्या हया वर्गाना विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. ब-याच विद्यार्थ्यांनी मुलभूत संगणक आणि मुलभूत मल्टिमिडिया कोर्सेसमध्ये भाग घेतला. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार काही खास Advanced MS. Excel आणि Advanced Power Point चे वर्ग भरविण्यात आले. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी बेसिक कॉम्प्युटिंगचे वर्ग भरविण्यात आले.

यशवंतराव चव्हाण माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीने (MKCL) चे कोर्स घेण्यासाठी अधिकृत केंद्र म्हणून जानेवारी २०१६ आणि २०१७ मध्ये मान्यता मिळविली. (MKCL) चे MS-CIT आणि KLiC Certificate कोर्स घेण्यात आले. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या कोर्सेसला चांगलाच प्रतिसाद दिला.

(MKCL) च्या मदतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी फॉर्म्युला पुस्तिका आणि Send off KIT चे वितरण केले. त्याचबरोबर परीक्षेत यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या. हा उपक्रम साधारण फेब्रुवारी २०१७ दरम्यान संपन्न झाला. वेगवेगळया विषयावर सेमिनार व कार्यशाळा घेऊन प्रतिष्ठानने (MKCL) नेटवर्कमध्ये नाव उज्ज्वल केले.

PG-DAC कोर्सची फेब्रुवारी २०१६ ची बॅच १७ फेब्रुवारीला सुरु झाली आणि ३० जुलै २०१७ ला संपली. फेब्रुवारी २०१६ च्या डॅक कोर्सच्या विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट प्रोग्राम सुरु करण्यात आला. त्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती वेगवेगळया कंपनीमध्ये नियोजित केल्या गेल्या. ब-याच विद्यार्थ्यांना हया प्रक्रियेद्वारे नोकरी प्राप्त झाली.

डॅक कोर्समध्ये अॅडमिशन मिळविण्याकरिता प्रवेश परीक्षा देणे आवश्यक असते. ही प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होता यावी म्हणून माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीतर्फे प्री-डॅक कोर्स चालविला जातो. सी-कॅट (डॅक पूर्व परीक्षा) आपल्या केंद्रात ऑगस्ट २०१६ व फेब्रुवारी २०१७ करिता अनुक्रमे दि. १९ जून २०१६ आणि २६ जून २०१६ तसेच

दि. ६ डिसेंबर व १३ डिसेंबर २०१६ रोजी घेतली गेली. साधारण अनुक्रमे २४० विद्यार्थी हया परीक्षेला उपस्थित होते. यातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना डॅक ऑगस्ट २०१६ तसेच फेब्रुवारी २०१७ बॅचमध्ये प्रवेश मिळाला.

दि. १२ एप्रिल २०१६ रोजी दहावी व बारावीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मोफत सल्ला व व्याख्यान आयोजित केले होते. वाघे हायस्कूल, सेंट जोसेफ हायस्कूल, बीएमसी माध्यमिक हायस्कूल, सिध्दार्थ कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज हया शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी हया व्याख्यानाला उपस्थिती लावली. १६ जुलै २०१६ रोजी दहावी, बारावी त्याचप्रमाणे पदवीधर विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र रोजगार तर्फे व्याख्यान आयोजित केले.

डॅक ऑगस्ट २०१६ च्या विद्यार्थ्यांसाठी Princeton Blue, Pisight आणि Kotak Mahindra Company च्या Vice President यांच्या तर्फे जानेवारी २०१७ मध्ये व्याख्यान आयोजित केले.

काही कौतुकास्पद उल्लेख खालीलप्रमाणे :-

१. विजय कंसरा, ऑगस्ट २०१६ बॅचचा विद्यार्थी (C-DAC) च्या अंतिम परीक्षेत मुंबई विभागात दुस-या क्रमांकावर आला.
२. सचिन शेवरी, ऑगस्ट २०१६ बॅचचा विद्यार्थी (C-DAC) च्या अंतिम परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर Aglorithm & Data Structure या विषयावर पहिल्या क्रमांकावर आला.
३. त्याचप्रमाणे प्रतीक शिवडे ऑगस्ट २०१६ च्या बॅचच्या विद्यार्थ्याला मुंबई विभागातील सर्वोच्च रु.७ लाख प्रतिवर्षचे पॅकेज मिळाले.

डॅक बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा म्हणून एक निरोप समारंभ व स्नेहभोजन ठेवण्यात आले होते.

गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करुन देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेसमध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT(YCP) तर्फे लष्कर आणि पोलीस खात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फी मध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणा-या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते.

**ए.आय.टी. विशेष :**

आपल्या प्रबोधिनीमधून प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी सर्वोत्तम Salary package मिळविण्यात सतत पुढे दिसून येत आहेत याचा आम्हाला आनंद आणि अभिमान आहे.

वेगवेगळया कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणवर्ग चालविणे हेच AIT चे उद्दिष्ट आहे.

## ७. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम :

७.१ **प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम :** मुंबईत शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाडया चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक - शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम मार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास प्रतिष्ठानकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेस प्रतिष्ठाने केंद्र इमारतीच्या चौथ्या मजल्यावर जागा दिली आहे.

७.२ **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स :** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प

उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, याची माहिती प्रसिध्द केली जाते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

७.३ **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळः** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणा-या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पध्दतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७.४ **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट) :** बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. संस्थेचा वाढता व्याप लक्षांत घेऊन प्रतिष्ठानने या संस्थेला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

## ८. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत देण्यात आलेले अनुदान :-

८.१ **सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली :-** सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली ही संस्था मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक वर्षी नवी दिल्ली येथे यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह कार्यक्रम आयोजित करीत आहे. यावर्षी मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे रु.१,७५,०००/- इतके अनुदान दिलेले आहे.

८.२ किसानशक्ती प्रकाशनाचे लेखक श्री. बाळ पोतदार, कोल्हापूर यांना 'गांधीजी होते म्हणून' या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी आर्थिक सहाय्य - भारतीय लोक आंदोलन या मुक्त व्यासपीठाचे मुख्य प्रवर्तक हे गेली ४०-५० वर्षे पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करीत आहेत. अलीकडच्या २०१५-१६ वर्षामध्ये त्यांनी शेती आणि समाजाच्या उपयोगासाठी 'किसानशक्ती' या मासिकाचे संपादन केलेले आहे. त्यांनी 'शाश्वत ऊस शेतीचे आधुनिक तंत्र - एकरी १०० टन ऊस उत्पादन' हे प्रकाशित केले. त्या पुस्तकाच्या दहा प्रती राज्यभरातील शेतक-यांपर्यंत पोहोचविण्याचे त्यांनी कळविले होते. श्री. पोतदार यांनी गेल्या दोन वर्षातील देशातील बदललेल्या राजकीय परिस्थितीवर प्रदीर्घ अभ्यासातून 'गांधीजी होते म्हणून' हा २८४ पानांचा ग्रंथ लिहून तयार केला आहे. या पुस्तकाच्या २००० प्रतींच्या प्रकाशनासाठी आर्थिक मदत म्हणून प्रतिष्ठानने रु.५०,०००/- इतकी देणगी दिलेली आहे.

८.३ इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई शाखा यांच्या मार्फत दरवर्षी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान आयोजित केले जाते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनातील उच्च अधिकारी तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित असतात. यासाठी प्रतिष्ठानने रु.२०,०००/- इतकी आर्थिक मदत केली आहे.

## ९. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम :-

## ९.१ कृषी व सहकार व्यासपीठ पुणे :-

१.१ **व्याख्याने :-** दरमहा पहिल्या शनिवारी 'बळीराजा' मासिका समवेत कृषी संबंधित महत्वाच्या विषयांवर एक व्याख्यान आयोजित करण्यात येते. त्याप्रमाणे एकूण १० व्याख्याने आयोजित करण्यात आली. त्यातील विषय खालीलप्रमाणे.
१. शाश्वत शेतीसाठी पाणी व्यवस्थापन, २. तरुणांपुढील कृषी मधील संधी, ३. राष्ट्रीय अडी समन्वय समिती कार्य, ४. कृषीमधील अनुभव, ५. ग्रामिण ग्रंथालये स्थापना व उपयोग, ६. ऊस व साखर उद्योगाचे भविष्य, ७. ग्रामिण भागातील शैक्षणिक प्रयोग, ८. शेतीसाठी शासनाच्या विविध योजना, ९. विक्रमी तुर उत्पादन, १०. जैविक कचरा आणि भविष्यातील इंधन या विषयांवर अनुक्रमे सर्वश्री डॉ. दत्तात्रय, डॉ. मुकुंदराव गायकवाड, विश्वास भोसले, प्र. भ. भोसले, प्रदीप लोखंडे, प्रकाश नाईकनवरे, प्रा. व्यास, श्रीकांत ताम्हणकर, दिलीप पेंडसे आणि प्रियदर्शन कर्वे यांनी व्याख्याने दिली आणि श्रोत्यांच्या शंकांचे निरसन केले.

१.२ **गृहनिर्माण संस्था उपविधी** :- मा. सहकार आयुक्तांनी गृहनिर्माण संस्थाबाबतचे आदर्श उपविधी प्रस्तृत केले होते. त्यावर दि. १९.४.२०१६ रोजी सखोल चर्चा करुन अनेक महत्वाच्या शिफारशी करण्यात आल्या. त्यानंतर दि. ४.७.२०१६ रोजी मा. अजित निंबाळकर व श्री. भिडे यांनी सहकार आयुक्तांशी वरील विषयांवर चर्चा केली. त्यात मा. आयुक्तांनी लक्ष घालण्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे सहकार खात्यातील एखादा चांगला निवृत्त अधिकारी, प्रतिष्ठानचे कामासाठी सुचविण्याचे सांगितले असता श्री. धरणीधर पाटील हे पुणे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हे लवकरच निवृत्त होणार असल्याने त्यांचे नाव मा. आयुक्तांनी सुचविले. त्याप्रमाणे श्री. भिडे यांनी श्री. पाटील यांचेकडे पाठपुरावा केला असता त्यांनी मे १७ पासून वेळ मिळेल त्याप्रमाणे प्रतिष्ठानमध्ये येण्याचे मान्य केले आहे. २० मे २०१७ रोजी आयोजित नागरी बँकांचे कार्यक्रमासाठी बँकांचे मुद्दे आपण ई-मेल वर घेवून त्याबाबतचे टिपण करण्याचे मान्य केले आहे.

१.३ **मानीव हस्तांतरण** :- गृहनिर्माण संस्थांचे मानीव हस्तांतरणावर दि. २०.५.२०१६ रोजी सखोल चर्चा करण्यात आली. त्याबाबत आयुक्तांशी चर्चाही करण्यात आली. आता शासनाने मानीव हस्तांतरणासाठीच्या अटी कमी केल्याचे समजते.

१.४ **विद्यार्थी गुणवर्धन** :- दरवर्षीप्रमाणे एखाद्या महान व्यक्तीचे जीवन व कार्य या विषयावर डॉ. गरुड यांचेकडून राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वर ८० पानी आत्मचरित्र तयार करण्यात आले. त्याच्या २०० प्रती भिडे परिवार (मंगेशी) यांचेतर्फे शिक्षक व विद्यार्थ्यांना वाटण्यात आल्या. त्याचप्रमाणे प्रतिष्ठाननेही प्रत्येक शाळेसाठी ५ पुस्तके याप्रमाणे ३२५ पुस्तके वाटली. यावर प्रश्नमंजुषा ही स्पर्धा इयत्ता ७ वी, ८ वी व ९ वी या विद्यार्थ्यांसाठी घेतली. त्यामध्ये ३३३८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. श्री. भिडे यांनी पेपर तपासून २०० विद्यार्थी द्वितीय स्तरपरिक्षेसाठी निवडले. शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांसाठी दि. २४.९.२०१७ रोजी डॉ. वसंतदादा पाटील विद्या निकेतन या ठिकाणी एका कार्यशाळेचे आयोजन केले. त्यात २०० निवडक विद्यार्थ्यांची परीक्षा घेवून इयत्तावर प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक व उत्तेजनार्थ ५ बक्षिसे म्हणून अनुक्रमे रु.५००/-, रु.४००/-, रु.३०० व रु.२००/- हुशार विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सर्वश्री वर्तक, चंदेल, डांगे, कुलकर्णी, शाळीग्राम, वाडेकर व शिंदे यांचे सहकार्य लाभले. त्याशिवाय मनशक्ती लोणावळा यांचेतर्फे विद्यार्थ्यांसाठी आरोग्यवर्धन, बुध्दिवर्धन व यशप्राप्ती यावर सौ. गावडे, सौ. अग्निहोत्री व सौ. मेधा राजणेकर यांची व्याख्याने आयोजित केली. फर्ग्युसन कॉलेजचे प्राध्यापक वेदांत कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुणवर्णन करणारे व्याख्यान दिले.

१.५ **सहकारी संस्था निवडणुका** :- मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्रस्तुत केलेल्या दि. १८.६.२०१६ रोजीचे पत्रावर झालेल्या चर्चेनुसार मा. आयुक्ताना चर्चेतील सूचना सादर करण्यात आल्या आहेत.

१.६ **रिअल इस्टेट कायदा २०१६** :- केंद्राने रिअल इस्टेट (रेग्युलेशन व डेव्हलपमेंट) कायदा २०१६ पारित केला असून राज्य शासनाने त्याबाबत नियम केल्यानंतर सदर कायदा अंमलात यावयाचा आहे. त्या नियमाबाबत

दि. १७.७.२०१६ व दि. १५.९.२०१६ रोजी चर्चा झाली. शासनास नियमावली प्रारुप सादर करण्यासाठी श्री. बी. एम. देशपांडे यांचेकडे नियमावली तयार करण्याचे काम सोपविले आहे. आता शासनाने दुरुस्त नियम प्रस्तुत केले असून सदर कायदा १.५.२०१७ पासून महाराष्ट्रात अस्तित्वात आला आहे.

१.७ **राज्यस्तरीय शिक्षक विद्यार्थी निबंध स्पर्धा** :- राष्ट्रहितेषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व अन्य कर्मचारी यांचेकडून २००० शब्दांपर्यंत निबंधस्पर्धा आयोजित केली होती. त्याला राज्यातून १३३ स्पर्धकांनी प्रतिसाद दिला. त्यातील निवडक गुणवत्तापूर्ण निबंध प्राचार्य डॉ. न. म. जोशी या साहित्यिकाकडून तपासून घेवून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी अनुक्रमे रु.१०००/-, रु.८००/-, रु.५००/- व उत्तेजनार्थ रु.३००/- (सात पारितोषिके) वाटण्यात आली. त्याप्रमाणे निवडक ९६ विद्यार्थ्यांपैकी प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिके अनुक्रमे रु.५००/- रु.४००/- व रु.३००/- देण्यात आली. उत्तेजनार्थ रु.२००/- ची सात पारितोषिके देण्यात आली. विद्यार्थ्यांचे निबंध तपासून गुणानुक्रमे नंबर काढण्याचे काम श्रीमती रेखा रमेश शाळीग्राम यांनी केले.

१.८ **जिल्हा मध्यवर्ती बँका व नोटबंदी** :- दि. २४ जानेवारी २०१७ रोजी नोटबंदी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या विषयांवर प्रतिष्ठानतर्फे एक चर्चासत्र आयोजण्यात आले होते. मुख्य वक्ते म्हणून डॉ. संजय भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे यांनी आपले विचार मांडले. उपस्थित सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे योग्य ते निरसन त्यांनी केले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी सर्व ठेवीदारानी के.वाय.सी. (know your customer) बाबतची अपूर्ण कारवाई, त्याचप्रमाणे वेळोवेळी बँकांनी कॉम्प्युटरायझशनचे कामात या ना त्या कारणाने केलेली दिरंगाई अपूर्णता यामुळे काही प्रमाणात तरी नोटाबंदीचा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनाही बसलेल्या झटक्यास बँका जबाबदार आहेत. मात्र त्यामुळे अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत व बँकाही अडचणीत आहेत हे त्यांनी स्पष्ट केले. आता राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने या बँकांतील १०० टक्के ठेवीदारांची के.वाय.सी. तपासणी पूर्ण करुन अहवाल दिल्याचे समजते. त्यामध्ये जुन्या नोटांमध्ये अंदाजे अडकलेले रु.४०००/- हजार कोटी महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मिळणेचा मार्ग मोकळा झाला असे दिसते.

१.९ **सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी कायद्यात तरतूद** :- शासनाने सहनिबंधक सहकारी संस्था (झोपडपट्टी निर्मूलन) श्री. देशमुख यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमून त्या समितीकडे, महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यात करावयाच्या सुधारणा इत्यादीबाबत शिफारशी करण्यास सुचविले होते. त्या समितीकडे सहकारी संस्था कायद्यात करावयाच्या सुधारणा त्याचप्रमाणे सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण इत्यादीबाबत शिफारशी करण्यास सुचविले होते. त्या अनुषंगाने कृषी व सहकार व्यासपीठाचे एक चर्चासत्र दि. १८ मार्च २०१७ रोजी प्रतिष्ठानचे पुणे कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. त्यासाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, राज्य फेडरेशन इत्यादींचे प्रतिनिधी, सहकारी संस्था व सहकारी खात्यातील आजी-माजी अधिकारी हजर होते. याबाबतच्या शिफारशी मा. आयुक्त, सहकार यांना दि. ११.४.२०१७ रोजी अर्धप्रशासकीय पत्राने सादर केल्या असून त्याच्या प्रती मा मा. एस. एस. संधू, अतिरिक्त मुख्य सचिव (सहकार) तसेच संबंधित समिती अध्यक्ष श्री. देशमुख यांनाही सादर केल्या आहेत.

१.१० **सहकारावरील चर्चासत्रे** : दि. ५ जानेवारी २०१६ रोजी Positioning of Co-operatives in emerging market economy या इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन c/o VAMNICOM, Pune या संस्थेने आपल्या बगळूरु येथील अधिवेशनासाठी सुचविलेल्या विषयावर चर्चासत्र आयोजिले होते. त्याला माजी अतिरिक्त निबंधक सहकारी संस्था, डॉ. श्री. बी. टी. बधान यांचे मार्गदर्शन लाभले. चर्चासत्रात सदर विषयावरील चर्चेनंतर सदस्यांना आपले वरील विषयावरील प्रबंध इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशनकडे सादर करण्याचे आवाहन करणेत आले. त्यास अनुसरुन श्री. बधान व श्री. भिडे यांनी आपले प्रबंध सादर केल्याचे समजते.

## ९.२ महाराष्ट्र महिला व्यासपीठ :

शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात.

२.१ **टेरारिअम ग्लास गार्डन दि. १ व ४ एप्रिल २०१६ :-** काचेच्या हंडीतील बगीचा म्हणजेच टेरारिअम ग्लास गार्डन दि. १ व ४ एप्रिल २०१६ रोजी याची कार्यशाळा घेण्यात आली. एकूण २२ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. अत्यंत कलात्मकरितीने वेगवेगळया प्रकारे आपआपल्या कल्पकतेने काचेच्या हंडीत छोटी रोपे, माती व सजावटीच्या छोटया प्रतिकृती वापरुन बगीचा केला. प्रशिक्षणार्थीना नोटस देण्यात आल्या.

२.२ **फिजिओथेरोपिस्ट प्रात्यक्षिक दि. ११ एप्रिल २०१६ :-** आजकालच्या तणावपूर्व जीवनशैलीमुळे स्पॉन्डीलायसिस, गुडघे दुखी, कंबरदुखी हे प्रश्न वाढत आहेत. स्त्रियांचे स्वास्थ व आरोग्य या दृष्टीकोनाने दिनांक ११ एप्रिल २०१६ ला फिजिओथेरोपिस्ट डॉ. झेबा कुरेशी यांचे विनामूल्य व्याख्यान आयोजित केले होते. १५ महिलांनी सहभाग घेतला. पीपीटीद्वारे डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी स्त्रियांच्या कंबर दुखी व गुडघे दुखी या व्याधीवर व्यायामाचे प्रात्यक्षिक करुन दाखविले.

२.३ **ओरिगामी जपानी हस्तकला दि. ७ मे २०१६ :-** दि. ७ मे २०१६ रोजी ओरिगामी जपानी हस्तकला यांची विनामूल्य कार्यशाळा आयोजित केली होती. त्यामध्ये विविध प्रकारची फुले, कागदी टोपी शिकविले. एकूण ८० मुलांनी सहभाग घेतला.

२.४ **सहकारी गृहनिर्माण संस्था प्रशिक्षण - दि. ६ जून ते २२ जुलै २०१६ :-** सध्या मुंबईमध्ये ४० ते ६० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थाचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहिती व्हावी व लोकांमध्ये हौसिंग व्यवस्थेविषयी जागृती व्हावी या हेतूने महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे जून २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण दिले जाते. या कार्यशाळेला प्रभाकर चुरी , ॲड. प्रमोद कुमार, विजय सामंत व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ / अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगलं काम करु शकतात व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करु शकतात. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षांच्या व ६०० च्या वर प्रशिक्षणार्थीनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. त्यांना परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्यात येते. या प्रशिक्षणाचा १८ वा वर्ग दिनांक ६ जून ते २२ जुलै या कालावधीत पूर्ण झाला. १९ प्रशिक्षणार्थीनी हे प्रशिक्षण पूर्ण केले.

२.५ **आयुर्वेदिक उपचार पध्दती कार्यशाळा :-** हल्लीच्या धक्काधुक्कीच्या जीवनात स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास महिलांना वेळ नाही व त्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात व त्यांचे दुष्परिणाम फार त्रासदायक होतात. तेव्हा आपल्या आरोग्याविषयी सर्तक राहणे फार गरजेचे आहे हे लक्षात घेऊन आरोग्याविषयी काय काय काळजी घ्यावी, दिनचर्या व आहार कसा असावा तसेच विविध शारीरिक व्याधी व त्यावरील उपाय व व्याधी होऊच नयेत म्हणून घेण्यात येणारी दक्षता यावरील आयुर्वेदिक उपचार पधउती या विषयी दोन दिवसांची आरोग्य कार्यशाळा दि. २.८.२०१६ व दि. ११.८.२०१६ रोजी पोद्दार मेडिकल आयुर्वेदिक कॉलेज मधील तज्ञ डॉक्टर समवेत घेण्यात आली. त्यामध्ये स्त्री स्वास्थ, नेत्राआरोग्यम्, स्वास्थ संरक्षणम्, घरगुती फेस पॅक आणि साबण यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

२.६ **ओरिगामी इको फ्रेंडली कार्यशाळा, दि. २२.८.२०१६ :-** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी गणेश उत्सवासाठी ओरिगामी इको फ्रेंडली कार्यशाळा दि. २२.८.२०१६ रोजी घेण्यात आली. यामध्ये कागदापासून गणपती, उंदीर व मोदक, फुले शिकवण्यात आली. ३० लोकांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

२.७ **सौंदर्य प्रसाधन कार्यशाळा दि. २६.९.२०१६ ते ३०.९.२०१६** :- एकविसाव्या शतकातील स्त्री नोकरी व घर सांभाळून स्वतःच्या व्यक्तीगत सौंदर्याबाबत जागरुक झाली आहे. याच उद्देशाने व्यक्तीगत सौंदर्य प्रसाधन म्हणजेच पर्सनल ग्रुमींगचे विनामूल्या प्रात्यक्षिक मंगळवार दि. ३०.८.२०१६ रोजी आयोजित केले होते. ६५ महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला व महिलांच्या खास आग्रहास्तव पाच दिवसांची कार्यशाळा दि. २६.९.२०१६ ते ३०.९.२०१६ या कालावधीत आयोजित केली होती. त्यामध्ये १० महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. यात महिलांना त्वचा, केसांची निगा, मेकअप, केशभूषा याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले.

२.८ **शुभेच्छा पत्र व पाकिटे सजावटीचे प्रशिक्षण - दि. २३.९.२०१६** :- दि. २२.९.२०१६ रोजी आयरिस फोल्डींग, टी बॅग फोल्डींग, पेपर क्युलिंग, थेरड वर्क या विविध पेपर फोल्डींगच्या पध्दतीने शुभेच्छा पत्रे व पाकिटे यांच्या सजावटीचे विनामूल्य प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. ३० जणांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला व काहींच्या आग्रहास्तव दि. ३०.९.२०१६ रोजी टी बॅग फोल्डींगचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. त्यामध्ये १० प्रशिक्षणार्थीनी या प्रशिक्षणाचा सहभाग होता. महिलांच्या खास आग्रहास्तव सौंदर्य प्रसाधनांची दुसरी कार्यशाळा पर्सनल ग्रुमींग दि. १४ ते १७ ऑक्टोबर २०१६ रोजी घेण्यात आली. १० महिलांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

२.९ **सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम दि. ३.१.२०१७** :- ३ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त **स्वयंपाकघरातील रसायन शास्त्र** या विषयावर श्रीमती रेखा रानडे-दिवेकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी एकूण ४५ महिलांनी सहभाग घेतला.

२.१० **सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप** :- सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण १९ वा वर्ग फेब्रुवारी ते मार्च २०१७ या कालावधीत पूर्ण झाला. ४२ प्रशिक्षणार्थीनी हे प्रशिक्षण पूर्ण केले. या प्रशिक्षणाची परीक्षा दि. १५ मार्च २०१७ रोजी घेण्यात आली. यातील यशस्वी विद्यार्थ्यांना ६ एप्रिल २०१७ रोजी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## ९.३ नवमहाराष्ट्र युवा अभियान :-

३.१ **युवा स्वातंत्र्यज्योत रॅली** :- दि. १४ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपुरुषांना अभिवादन करण्यासाठी तरुणांमध्ये स्वातंत्र्य दिनाविषयी आदराची जाणीव व जागृती निर्माण व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीची सुरुवात श्री. विजय कसबे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचा उद्देश सहभागींसमोर मांडला. यानंतर प्रमुख पाहुणे मा. विनीत जोगळेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. युवा पिढीच्या भविष्यात काय काय अपेक्षा आहेत आणि त्यांचे दायित्व काय आहे आणि असावे यावर विवेचन केले. यानंतर त्यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली. 'स्वातंत्र्यज्योत चिरायू होवो' अशा घोषणा देत प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुतळयाला अभिवादन करुन रॅली मार्गस्थ झाली.

पुढे सेनापती बापट यांचा पुतळा, शिवाजी पार्क येथील शिवाजी महाराज यांचा पुतळा, सावरकर स्मारकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा यांना अभिवादन व पुष्पांजली अर्पण करुन त्यांच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदानास उजाळा दिला गेला.

चैत्यभूमि येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन श्री. आप्पा पाटील व श्रीमती चित्रा वाघ यांनी सहभागींना संबोधित केले. यानंतर श्री. सुरज भोईर यांनी गायलेल्या उत्स्फूर्त गीतांनी तसेच भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे जाहीर वाचन करुन शेवटी राष्ट्रगीत गायन केले. श्री. विजय कसबे यांनी शेवटी पाहुण्यांचे व सहभागींचे आभार मानून रॅलीची सांगता केली.

या युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीकरिता श्री. उमाकांत जगदाळे, श्री. राकेश कांबळे, श्री. रमेश मोरे, श्री. रमेश सांगळे, श्री. अर्जुन बचुटे, श्री. राजकुमार चव्हाण, श्री. नारायण परब, श्री. जयंत, प्रज्ञा व शरदिनी, श्री. सागडे आणि निर्मला कसबे यांसह सुमारे १०० अणांचा सहभाग लाभला.

३.२ **लोकसंवाद - महाश्वेतादेवी आदरांजली** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि सम्यक संवाद आयोजित 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत ३ सप्टेंबर २०१६ रोजी महाश्वेतादेवी यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात तसेच सूत्रसंचालन 'सम्यक संवाद' च्या सोनाली शिंदे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले. महाश्वेतादेवी यांच्या जीवनावरील संघर्ष व कार्य या विषयावर चर्चा करण्यात आली. ही चर्चा करतांना प्रा. इलीना सेन यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

महाश्वेतादेवी या फक्त लेखिका किंवा सामाजिक कार्यकर्त्याच नव्हत्या तर त्या एक पत्रकार, साहित्यिक तसेच विचारवंत व आंदोलनधर्मीही होत्या. इ. सन २००२ मध्ये साहित्यातील योगदानाबद्दल यांना 'ऑफीसर ऑफ आर्टस् अॅन्ड लिटरेचर' हा फ्रान्सचा दुस-या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी किताब जाहीर केला गेला होता. याशिवाय भारतातही त्यांना साहित्य अकादमीने सन्मानित केले आहे. त्यांना इ. स. १९९६ सालचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. अशा त्यांच्या बद्दलच्या ब-याच बाबी प्रा. इलीमा सेन यांनी मांडल्या. यानंतर सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी 'नून' या कथेचे वाचन केले. कार्यक्रमाचे आभार व कविता वाचन श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले व कार्यक्रमाची सांगता महाश्वेतादेवी यांच्या प्रसिध्द कादंबरी 'हजार चौरासी की माँ' च्या फिल्म प्रदर्शनाने झाली. या कार्यक्रमासाठी श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद होता.

३.३ **लोकसंवाद – चालू जागतिक घडामोडी** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित लोकसंवाद उपक्रमांमध्ये ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी 'चालू जागतिक घडामोडी' यावर मार्गदर्शन केले. आजूबाजूच्या देशांमध्ये घडणा-या घडामोडी भारताच्या दृष्टीने कशा महत्वाच्या आहेत आणि त्यांच्याकडे भारतीयांनी कसं बघितलं पाहीजे, 'ब्रेग्झिट' चा एकूण जागतिक आणि भारतीय सामाजिक, आर्थिक व्यवस्थेवर कसा परिणाम होईल, त्यावर काय उपाययोजना करणे गरजेचे आहे, सध्या सर्वच देशांमध्ये इसिसच प्रभाव वाढत आहे, त्याची कारणे काय असू शकतात तसेच अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक यांसह अनेक प्रश्नांवन त्यांनी प्रकाश टाकला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय, आर्थिक धोरण, समाजकारण याबरोबरच राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, जागतिक संघटना, जातीयवाद, विचारसरणी, मूल्ये आणि आपली राज्यघटना आणि इतर राष्ट्रांशी तुलनात्मक परिस्थिती या विषयांवर श्री. केतकर यांनी यावेळी चर्चा केली.

ज्येष्ठ अर्थतज्ञ श्री. अजित रानडे, ज्येष्ठ माजी सनदी अधिकारी, श्री. बी. के. अग्रवाल, प्रतिष्ठानचे विश्वस्त, डॉ. समीर दलवाई, ज्येष्ठ पत्रकार पद्मभूषण देशपांडे, विचारवंत व लेखक सुरेश सावंत, क्लाइड क्रेस्टो, नीला लिमये, सामाजिक कार्यकर्त्या भारती शर्मा, संजय बोरगे, रमेश मेनन, क्रीडा क्षेत्रातील सुनील वालावलकर तसेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची संकल्पना प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी स्पष्ट केली. प्रास्ताविक श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

३.४ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार सोहळा - शनिवार दि. १४ जानेवारी २०१७** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणा-या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक क्रीडा पुरस्कार २०१६ च्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे या क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणा-या युवक-युवतींना हा पुरस्कार देण्यात येतो. सदरील पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दि. १४ जानेवारी २०१७ रोजी विद्या प्रतिष्ठान, बारामती, जिल्हा पुणे येथे संपन्न झाला. पुरस्कार वितरण यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. श्री. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

त्याप्रसंगी खजिनदार श्री हेमंत टकले, मा. आ. सुनील तटकरे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक व प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त सौ. सुनेत्रा पवार, कार्यक्रम व्यवस्थापक श्री. दत्ता बाळसराफ, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक श्री. नीलेश राऊत, श्री. विजय कान्हेकर, बारामतीचे नगराध्यक्ष श्री. योगेश जगताप, श्री. महेश तपासे आदी उपस्थित होते.

२०१६ सालचा 'यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार' आंतरराष्ट्रीय धावपटू ललिता बाबर, सातारा यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप ५१ हजार रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे होते. या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार' युवक व युवती - क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीच कामगिरीबद्दल आंतरराष्ट्रीय रोईंगपटू दत्तू भोकनळ, तळेगाव रोही, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक व आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू अभिलाषा म्हात्रे, मुंबई यांना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्री. संतोष गर्जे, बीड (बालग्रा सहारा अनाथालय परिवार) व हेमलता तिवारी, मुंबई (स्वराधार, मुंबई) यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरुप रोख २१ हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह असे होते.

यासोबतच प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात येणा-या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या विजेत्यांनाही पुरस्कार देण्यात आले. त्यात कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा, जिल्हा नाशिक यांच्या 'बांधिलकी' या नियतकालिकास प्रथम पुरस्कार देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु.१०,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते. द्वितीय पुरस्कार नूतन महाविद्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांच्या 'प्रेरणा' या नियतकालिकास देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु.५,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते. तृतीय पुरस्कार न्यू आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या 'स्पंदन' या नियतकालिकास देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु.५,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते.

उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी.आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांच्या 'मानवता' या नियतकालिकास, उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, उरुन - इस्लामपूर, वाळवा, जिल्हा सांगली यांच्या 'ज्योती' या नियतकालिकास, तर उत्तेजनार्थ तृतीय पारितोषिक न्यू आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या 'स्पंदन' या नियतकालिकास देण्यात आले. या उत्तेजनार्थ पुरस्काराचे स्वरुप रु.२,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते. या स्पर्धेकरिता सादर केलेल्या नियतकालिकांचे जतन यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयामध्ये करुन ते विद्यार्थी व अभ्यासकांसाठी उपलब्ध केले जातात. सर्व पुरस्कारार्थींचे नवमहाराश्ट्र युवा अभियानाच्या राज्यस्तरीय कार्यकारी समितीने अभिनंदन केले.

**युवा पुरस्कार विजेत्यांचा अल्प परिचय - ललिता शिवाजी बाबर (धावपटू — यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार)** :- वयाच्या अकराव्या वर्षापासून ललिता बाबर यांनी विविध क्रीडा स्पर्धांमधून पारितोषिके पटकावली. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी पाच हजार मीटर धावण्याच्या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. या स्पर्धेतील घवघवीत यशामुळे ललिता बाबर यांना रेल्वे विभागाने नोकरीत सामावून घेतले. रेल्वे विभागात त्यांना श्री. मेल्वीन आणि श्री. भास्कर भोसले यांचे मार्गदर्शन मिळत राहिले. त्यांना आजपर्यंत विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकूण सात कांस्य, सहा रौप्य तर सुमारे तेरा सुवर्णपदके प्राप्त झाली आहेत.

चीन, दक्षिण कोरिया इत्यादी देशांमधील स्पर्धांमधून नवनवे ललिता बाबर यांच्या नावावर जागतिक विक्रम आहेत. आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स महासंघाच्या सन २०१६ साली ३००० मीटर स्टीपलचेस या क्रीडा प्रकारात जागतिक क्रमवारीत ललिता बाबर यांनी अव्वल स्थान मिळवले. सध्या त्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बी.ए. च्या तृतीय वर्षात शिकत असून मागील सहा वर्षांपासून त्यांनी बंगळुरु येथील रशियन क्रीडा प्रशिक्षक डॉ. निकोल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत.

**दत्तू बबन भोकनळ (रोईंग पटू - यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार)** :- ५ एप्रिल, १९९१ रोजी नाशिक जिल्हा, चांदवड तालुक्यातील तळेगाव रोही येथे एका गरीब कुटुंबात दत्तू भोकनळ यांचा जन्म झाला. आई आशाबाई आणि वडिल बबन भोकनळ यांच्या आर्थिक हलाखीच्या परिस्थितीमुळे दत्तू यांना इयत्ता ८ वी नंतर शिक्षण सोडावे लागले. परंतु परत तीन वर्षांनी त्यांनी १० वीची परीक्षा दिली व त्यात ते उत्तीर्ण झाले.

२०११ साली दत्तू भोकनळ यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर घरातील आर्थिक परिस्थितीचा विचार करुन दत्तू भोकनळ यांनी सैन्यदलात जाण्याचा निर्णय घेतला. २०१२ साली ते सैन्यदलात भरती झाले. नौकायन या क्रीडा प्रकारासाठी त्यांना सैन्यदलात वरिष्ठांनी प्रेरित केले. अल्पावधीतच दत्तू भोकनळ यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पारितोषिके प्राप्त केली. २०१४ साली झालेल्या एशियन गेम्समध्ये दत्तू भोकनळ पाचव्या स्थानावर होते. २०१५ च्या एशियन चॅम्पियनशिपमध्ये त्यांनी रजत पदक प्राप्त केले. २०१६ सालच्या रियो ऑलिंपिकसाठी त्यांची निवड झाली. त्यामध्ये त्यांनी जगातील ३२ देशांमधून तेरावे स्थान पटकावले. २०१६ साली यू.एस.ए. चॅम्पियनशिप स्पर्धेत त्यांना सुवर्ण पदक मिळाले. या व्यतिरिक्त राष्ट्रीय पातळीवरील २ सुवर्णपदके भोकनळ यांच्या नांवावर आहेत.

**अभिलाषा शशिकांत म्हात्रे (कबड्डी पटू - यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार)** :- अभिलाषा म्हात्रे यांचा जन्म रायगड जिल्हयातील पेण येथे २८ नोव्हेंबर १९८७ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव सौ. शुभांगी आणि वडिल श्री. शशिकांत म्हात्रे, एक लहान भावासह त्यांचा छोटा परिवार आहे. कबड्डी या खेळामध्ये अभिलाषा यांना शालेय जीवनापासूनच आवड होती.

शालेय जीवनात त्यांनी विविध पातळीवर स्पर्धा करत कबड्डी खेळामध्ये प्राविण्य मिळवले. २००७ साली खेळत असताना त्यांना दुखापत झाली. त्यावेळी त्यांना हेलन मेरी यांची खूप मदत झाली. दुखापतीतून बाहेर पडून त्यांनी स्वतःला परत कबड्डीमध्ये झोकून दिले. राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी स्पर्धक म्हणून त्यांची २००२ साली निवड करण्यात आली. त्याचा त्यांनी फायदा घेत यश संपादन केले. त्याचबरोबर आसाम, बिहार, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र अशा विविध राज्यांमध्ये झालेल्या राष्ट्रीय तथा आशियाई कबड्डी स्पर्धांमध्येही त्यांनी प्रथम, द्वितीय स्थान पटकावले.

आतापर्यंत अभिलाषा यांनी चार कांस्य पदकांसह दोन रजत आणि पाच सुवर्णपदके प्राप्त केली आहेत. त्यांना २०१५ साली अर्जुन भारत सरकारचा पुरस्कारही मिळाला. सध्या अभिलाषा नवी मुंबई महानगरपालिकेत शिक्षण विभागात क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

**हेमलता तिवारी (यशवंतराव चव्हाण युवा सामाजिक पुरस्कार)** :- रिक्षा चालकाच्या सामान्य कुटुंबात मुंबई येथे १९ मे १९९१ रोजी हेमलता तिवारी यांचा जन्म झाला. मुंबईच्या लोकलमधून प्रवास करीत त्यांनी अर्थशास्त्र विषयात पदवी घेतली, त्याचबरोबर मराठी विषयात पदव्युत्तर पदवीसह औपचारिक समुपदेशनाचीही पदविका प्राप्त केली. २००६ साली हेलमता यांच्या वडिलांचे निधन झाले. अर्थार्जनाची निकड म्हणून त्यांनी २०१० पासून सेवाभावी संस्थेत काम सुरु केले. परंतु, काही तरी वेगळे करुन दाखविण्याची ऊर्जा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यातच त्यांना भविष्यातील कार्याचा सूर सापडला. पोटाची खळगी भरण्याकरिता लोकलमधून गाणी गात आणि विविध वाद्ये वाजवत भिक्षा मागणा-या लोकांना त्यांनी एकत्रित केले. त्यात काही दृष्टीहीन, तर काही दिव्यांगांसह सर्वसामान्य बेरोजगारही होते. परंतु, कलेचे त्यांच्यामधील निसर्गदत्त देणे ओळखून त्यांना एकत्र आणून त्यांना मंच मिळवून देण्याचा प्रयत्न हेमलता यांनी सुरु केला. त्यातून त्यांनी स्वरांचाच आधार घेणा-या या लोकांसाठी २०१२ साली 'स्वराधार' या ऑर्केस्ट्राची निर्मिती केली. रेल्वे आणि लोकलच्या प्रवासात जे लोक कायम उपेक्षित राहिले, अशा २०० लोकांना एकत्र करुन त्यांनी एक अनोखा उपक्रम सुरु केला. याच कलावंतांपैकी १४ वर्षांच्या बालकलाकारास त्यांनी 'स्वराधार' च्या माध्यमातून 'इंडियन आयडॉल' या स्पर्धेत पाठविले. या मुलातील कलागुण आणि आवाज ऐकून संगीतकार विशाल

ददलानी यांनी त्या मुलास संगीत शिक्षणाकरिता दत्तक घेणे, हे 'स्वराधार' चे व पर्यायाने हेमलता तिवारी यांचे यश आहे. हेमलता तिवारी यांना त्यांच्या कार्याची दखल घेत विविध संस्थांच्या पुरस्कारांसह, 'एच.आर. क्लब' ने 'वूमन गेम चेंजर ॲवार्ड' तथा नामांकीत संस्थेच्या नायिका पुरस्काराने सन्मानित केले आहे.

**संतोष गर्जे (यशवंतराव चव्हाण युवा सामाजिक पुरस्कार)** :- आई छबूबाई आणि वडील नारायण गर्जे यांच्यापोटी दि. २७ ऑगस्ट १९८५ ला संतोष गर्जे यांचा जन्म झाला. सख्ख्या बहिणीचा प्रसुती दरम्यान झालेला मृत्यू अन पोरक्या झालेल्या नवजात जीवाच्या अश्रूंनी त्यांना अंतर्बाहय हेलावून सोडले. त्या दुःखाच्या अतिरेकाने त्यांच्या वडिलांनी सुध्दा गृहत्याग केला. त्यांच्या बहिणीचे अनाथ झालेले पोर त्यांनी छातीस धरले आणि अशाच अनाथांचा सांभाळ करण्याचा निश्चय केला. लहानपणापासूनच विठोबा आणि ज्ञानोबांना 'माऊली' म्हणतात याचे बाळकडू त्यांना मिळालेच होते. वडिलांची दर महिन्याची न चुकणारी पंढरीची वारी पाहातच ते लहानाचे मोठे झाले होते.

अनाथांच्या कळवळयातून संतोष गर्जे यांनी 'बालग्राम सहारा अनाथालय परिवार' उभारले. २००४ साली सुरु झालेल्या या अनाथालयात आज ८५ मुले - मुली आहेत. तीन वर्ष वयाच्या मुलांपासून ते १८ वर्षांपर्यंतची ही सगळी मुले या परिवारात सदस्यांसारखी राहतात. आपलं कोणीतरी आहे, ही भावनाच या मुलांना जगण्याची उर्मी देत आहे. सव्वा दोन ते अडीच लाख रुपये मासिक खर्चाची तजवीज करताना संतोष गर्जे यांची नेहमीच दमछाक होते. परंतु, ध्येयापासून मागे न हटता कोणत्याही शासकीय अनुदान किंवा मदतीशिवाय त्यांनी आपली वाटचाल सुरुच ठेवली आहे.

**यशवंतराव चव्हाण सामाजिक युवा पुरस्कार २०१६ (युवक व युवती)**

| अ.क्र. | नांव | पुरस्कार रक्कम (धनादेश) |
|---|---|---|
| १ | श्री संतोष गर्जे | २१,०००/- |
| २ | हेमलता तिवारी | २१,०००/- |

**यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार २०१६ (युवक व युवती)**

| अ.क्र. | नांव | पुरस्कार रक्कम (धनादेश) |
|---|---|---|
| १ | श्री दत्तू भोकनळ | २१,०००/- |
| २ | अभिलाषा म्हात्रे | २१,०००/- |

**यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार २०१६**

| अ.क्र. | नांव | पुरस्कार रक्कम (धनादेश) |
|---|---|---|
| १ | श्रीमती ललिता बाबर | ५१,०००/- |

नियतकालिक पुरस्कार — २०१६ त्याकरिता निवड करण्यात आलेली नियतकालिकांची यादी.

| | नियतकालिकाचे नांव | महाविद्यालयाचे नांव | शिफारस | पुरस्कार क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | बांधिलकी | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य | हे नियतकालिक म्हणजे चित्रपट रसग्रहण विशेषांक असून ६६ विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेतील चित्रपटांविषयी रसग्रहण लिहिले आहे. हे लेखन करण्यापूर्वी चित्रपट रसग्रहणाविषयी त्यांना मार्गदर्शन करण्यात आले होते व लेखनाचे मुद्दे सुचविण्यात आले | प्रथम पुरस्कार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालय देवळा, जिल्हा नाशिक | होते. विद्यार्थ्यांची चित्रपटांविषयी जाण वाढविण्यासाठी व स्वतःच्या शब्दात त्याची अभिव्यक्ती करण्यासाठी प्रोत्साहन देणारा असा हा अंक आहे. नव्या पिढीची कलात्मक अभिरुची घडावी यासाठी केलेला हा अतिशय अभिनंदनीय प्रयत्न आहे. | |
| २ | प्रेरणा | नेतन महाविद्यालय, सेलू, जिल्हा परभणी | भारतीय समाजात अनेक प्रकारचे भेद व वैविध्य आहेत. जात, धर्म, प्रदेश, लिंग यावर आधारित अनेक विषमतापूर्ण व्यवहार आपल्या समाजात घडत असतात ते आपण पाहतो. तरुण पिढीला या भेदांच्या पलीकडे नेऊन त्यांना सामाजिक न्यायाची संकल्पना समजावून सांगण्याच्या दृष्टीने या अंकाचा विषय अतिशय महत्वाचा आहे. विद्यार्थी-विद्यार्थीनींनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमधून सामाजिक न्यायाची संकल्पना आपापल्या परीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे तो खूपच प्रेरणादायी आहे. | द्वितीय पुरस्कार |
| ३ | विद्यादीप | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय विद्यानगरी, बारामती, जिल्हा पुणे | अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सातत्याने विविध दर्जेदार साहित्याची निर्मिती नियतकालिकाच्या माध्यमातून करीत आहे. यावर्षीचा संपूर्ण अंक हा आजी-माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा चढता आलेख घेणारा आहे. यामध्ये कला, क्रीडा, साहित्य याबरोबरच विज्ञानामधील विविध शाखा यांचाही समावेश आहे. विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाचेही आवर्जून कौतुक करण्यात आले आहे. विशेषतः प्राध्यापक श्री. अय्यर यांच्याबद्दलचा लेख वाचनीय, महनीस आहे. | तृतीय पुरस्कार |
| ४ | मानवता | कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय मानवत, परभणी | हे नियतकालिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार विशेषांक असून यात विविध अंगानी बाबासाहेबांच्या विचारांचा शोध घेण्याचा प्रयत्न युवा पिढीने केलेला दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक योगदान, त्यांचा व्यासंग व प्रगल्भता तरुण पिढीला परिचित होण्याच्या दृष्टीने हा अंक उपयुक्त अंक आहे. | उत्तेजनार्थ प्रथम पुरस्कार |
| ५ | ज्योती | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय उरुण-इस्लामपूर | या अंकात प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी फक्त पाठयक्रमिक शिक्षण न घेता आपल्या ज्ञानाचा उपयोग ज्ञानप्रबोधन, समाजातील सर्वकष विषमतेच्या विरोधात केला पाहिजे यावर आवर्जून भर दिला आहे. अंकामध्ये प्रामुख्याने रोहित वेमुला प्रकरणावर अभ्यासपूर्ण चर्चा करुन समाजातील विषमताग्रस्त विषयाला अनुसरुन काही लेख लिहिले आहेत. याच अनुषंगाने विविध विद्यार्थ्यांच्या सुंदर, अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश समर्पकपणे केला | उत्तेजनार्थ द्वितीय पुरस्कार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आहे. विविध स्पर्धांमधील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करणारा आलेख अंकाची उंची वाढवतो. | |
| ६ | स्पंदन | न्यू आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर | या वर्षीचा सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरविण्यात आलेल्या या नियतकालिकात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग असणारी 'दान' ही संकल्पना सर्वकष मांडणारे 'स्पंदन' हे नियतकालिक विद्यार्थ्यांना रक्तदान, नेत्रदान, देहदान, श्रमदान याबरोबरच अन्नदान, भूदान, मतदान, बलिदान यासारख्या विविध संकल्पनांची उकल करणारे आहे. | उत्तेजनार्थ तृतीय पुरस्कार |

३.५ **शेतकरी संवाद (शेतकरी समुपदेशन) व दुष्काळनिवारण कार्यक्रम** (मार्च, एप्रिल, मे व जून २०१६) - **मार्गदर्शक** - मा. श्री. शरद पवार, डॉ. द्वारकादास लोहिया, श्री. शरद काळे, श्री. नंदकिशोर मुंदडा व डॉ. सुरेश खुरसाळे. **सहाय्य व सल्ला** - सौ. सुप्रिया सुळे, श्री. हेमंत टकले, श्री. अनिकेत लोहिया, डॉ. मिलिंद पोतदार, श्री. अक्षय मुंदडा, डॉ. दीपा क्षीरसागर. **समन्वयक -** दत्ता बाळसराफ, डॉ. नरेंद्र काळे, निलेश राऊत, डॉ. राजेश चव्हाण, विजय कान्हेकर, अतुल कुलकर्णी, सौ. आशाताई भिसे, अरुंधती पाटील. **अर्थ सहयोग** - आशिष दामले, राकेश कामठे, उदय जाधव, नंदकिशोर कागलीवाल, सुहास तेंडुलकर, मंगेश निरंतर. **सहभागी संस्था** - राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, मानवलोक अंबाजोगाई, आम्ही अंबाजोगाईकर. **कार्यक्षेत्र** - बीड, लातूर, उस्मानाबाद, परभणी आणि औरंगाबाद जिल्हे. **विशेष आभार** - शामसुंदर सोन्नर, मनोज हाडवळे, प्रभाकर साळेगावकर. सहभागी कार्यकर्ते - रविकांत वरपे, विजय कसबे, रमेश मोरे, डॉ. संतोष बुरले, डॉ. बागडे, डॉ. गायकवाड, डॉ. मोलेकर, डॉ. अनिरुध्द कुलकर्णी, डॉ. महेंद्र जाधव, प्रदीप कात्रे, गोविंद टेकाळे, रणजीत मोरे, मुजीब काझी, आशिष जाधव, अभिजित देशमुख, शेख सलिम, सोनाली डाळवाले, प्रज्ञा सागडे, रणजित नाळे.

१. अंबाजोगाई येथे दुष्काळ निवारण कार्यकर्ता शिबिराचे आयोजन (सहभाग व २०० कार्यकर्ते)

२. शेतकरी संवाद - मानसोपचार तज्ञ व डॉक्टरांच्या मदतीने शेतक-यांचे मानसिक समुपदेशन (८ प्रशिक्षणे व सहभाग) प्रसिध्द पत्रकार व कवी श्री. शामसुंदर सोन्नर यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून शेतक-यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रयत्न (२५ गावांत सहभाग).

३. स्वामी विवेकानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दुष्काळग्रस्त रुग्णांसाठी दोन वेळचे पौष्टिक जेवण (दररोज सरासरी ५०० लोक - ३ महिने).

४. अंबाजोगाई येथील निजामकालीन बारव व विहिरीतील गाळ काढून पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देणा-या 'आम्ही अंबाजोगाईकर' संस्थेस रु.१,००,०००/- ची मदत (१५ विहीरी व बारव).

५. अंबाजोगाई शहराची पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी आवश्यक असणा-या काळवीट साठवण तलाव, अंबाजोगाईतील गाळ काढण्यासाठी रु.५०,०००/- ची मदत.

६. वसुंधरा प्रतिष्ठान व मानवलोक या वतीने आयोजित सर्वधर्मीय सामुहिक विवाहातील ३७ नवदाम्पत्यांस प्रत्येकी रु.५,०००/- किंमतीची भेट एकूण रु.१,५०,०००/- ची मदत.

७. बीड जिल्हयातील २५ शेतक-यांना 'चैत्रपालवी' या तीन दिवसीय शिबिरासाठी बारामती येथे पाठविण्यात आले. कृषी विज्ञान केंद्र बारामतीच्या या कार्यक्रमात विविध तज्ञांचे मार्गदर्शन मिळाले.

८. अंबाजोगाई पर्यटन आराखडा.

९. पाण्यावरील कवितांचे 'पाणीबाणी' या काव्यसंग्रहाद्वारे प्रकाशन.

१०. मराठवाडयातील दुष्काळाचे अभ्यासपूर्ण परीक्षण करुन दस्ताऐवज करण्यात येत आहे. यशस्विनी सामाजिक अभियानाचा 'उमेद' कार्यक्रमाला सहकार्य.

३.६ **उमेद** - आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिला सहायता उपक्रम - मराठवाडा विभाग, संकल्पना : सौ. सुप्रिया सुळे, संयोजन : यशस्विनी सामाजिक अभियान व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

उपक्रमाचे स्वरुप : उपक्रम समन्वयक नीलेश राऊत, आशा भिसे, विजय कान्हेकर व सहकारी :- उमेद उपक्रमात मराठवाडयातील आठ जिल्हयांतील दोनशे विधवा महिलांची निवड करण्यात आलेली आहे. या सर्व महिला चाळीशीच्या आतमधील असून यांना पुढील एक वर्ष आर्थिकदृष्टया स्वावलंबी करण्यात येणार आहे. या महिलांना लघुव्यवसायाकरिता मदत करुन प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रत्यक्ष मदत या त्रिसूत्रीच्या माध्यमातून स्वावलंबी करण्यात येणार आहे. तसेच यासर्व महिलांच्या पुढील वैद्यकीय उपचाराकरिता सदर महिलांचे हेल्थकार्ड देखील झाले असून त्यांना औरंगाबाद येथील एम.जी.एम. रुग्णालयात पुढील तीन वर्षे कोणतेही उपचार, शस्त्रक्रिया मोफत करता येणार आहे. तसेच त्यांच्या १८ वर्षाखालील पाल्यांच्या शिक्षणाची देखील जबाबदारी घेण्यात आलेली आहे.

६.१ **जालना वितरण कार्यक्रम** - दि. २४ जुलै २०१६ : जालना जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आली असून या अंतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम संपन्न झाला. श्री. राजेश टोपे यांच्या हस्ते महिलांना पिठाची गिरणी, शिलाई मशीन, शेळया आदी व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर उपक्रमाचा हा पहिला टप्पा आहे. माजी आ. चंद्रकांत दानवे, राजेश राऊत हे यावेळी उपस्थित होते.

६.२ **बीड वितरण कार्यक्रम** - दि. ३१ जुलै २०१६ : बीड जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली आहे. सकाळी ११ वा. रेणुका माता मंदिर, पाटोदा येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी माजी आ. उषाताई दराडे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जयदत्त धस, जिल्हा परिषद सभापती महेंद्र गर्जे, मेहबूब शेख, तात्यासाहेब घुले, भाऊसाहेब भवर, बळीराम पोटे, रोहिदास गाडेकर, नाय्युम पठाण, राजू जाधव, शरद बामदळे, वसीम शेख, बालाजी जाधव, सोमनाथ कोरले, सुभाष अडगाळे, जब्बार पठाण, बंडू तवार, आबा ढेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमात अठरा विधवा महिलांना शेळया, सात महिलांना पिठाच्या गिरणीचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या सर्व महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देखील देण्यात येणार आहे.

६.३ **उस्मानाबाद वितरण कार्यक्रम** - दि. १ ऑगस्ट २०१६ : उस्मानाबाद जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, उस्मानाबाद येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. राणा जगजितसिंग पाटील यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात बारा विधवा महिलांना शेळया, पाच महिलांना पिठाची गिरणी आणि तीन महिलांना पिको -फॉल मशीनचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मा. जीवनराव गोरे, वैशालीताई मोटे, डॉ. नरेंद्र काळे, मनीषा राखुंडे, सुरेश देशमुख, प्रवीण यादव, मसूद शेख, रामचंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

६.४ **लातूर वितरण कार्यक्रम** - दि. २ ऑगस्ट २०१६ : लातूर जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे व मा. जीवनराव गोरे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. जनार्दन वाघमारे यांना विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल उपस्थितांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या

कार्यक्रमात तीन विधवा महिलांना शेळया, पंधरा महिलांना पिठाची गिरणी आणि सहा महिलांना पिको - फॉल मशीनचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य संयोजक मकरंद साबे, संजय बनसोडे, अशोक गोविंदपूरकर, बबन भोसले, प्रशांत पाटील, डी. एन. शेळके, मुर्तुझा खान, भाग्यश्री खीरसागर, चंदन पाटील, श्रीकांत सूर्यवंशी, निशांत वाघमारे, अरविंद कांबळे, विनोंद रनसुभे, संजय सोमवंशी, डॉ. मोटे, डॉ. चव्हाण, रेखा कदम, रघुनाथ कुचेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

६.५ **नांदेड वितरण कार्यक्रम** - दि. ३ ऑगस्ट २०१६ : नांदेड जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत ‘उमेद’ हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम कदम हॉस्पिटल, नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी बापूसाहेब गोरठेकर आणि माजी आ. शंकरराव धोंडगे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात तीन विधवा महिलांना शेळया, तेरा महिलांना पिठाची गिरणी आणि तीन महिलांना शिलाई मशीनचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी खा. गंगाधररावजी कुंटूरकर, डॉ. सुनील कदम, दत्ता पवार, जीवन घोगरे पाटील, प्रांजली रावणगावकर, कृष्णाती मांगनाळे, कल्पनाताई डोंगळीकर, मनपा गटनेत्या डॉ. शीला कदम, सुरेखा कदम, सविता कंठेवाड, चित्राताई लुंगारे, निर्मला सोनकांबळे, जयसिंग हंबर्डे, दत्ता पाटील तळणीकर, विनायक गव्हाणे, किशोर सूर्यवंशी, मनोरमा शेट्टे, छाया धर्माधिकारी, लता मद्रेवार, वंदना सुरनर, ज्योती धोंडगे, प्रतीक्षा आघव, सय्यद बलीगोद्दिन साकिब, वसंत सुगावे, सारिका बच्चेवार, गणेश तादलापूरकर, सुरेंद्रकुमार जयस्वाल, उत्तमराव आलेगावकर, रितू कोलंबीकर, जर्नेलसिंग गाडीवाले, दिलीप गवळी, मोहम्मदि शेख उस्मान, सय्यद मौला, प्रकाश मोराळकर, परवीन शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

६.६ **हिंगोली वितरण कार्यक्रम** - दि. ४ ऑगस्ट २०१६ : हिंगोली जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत ‘उमेद’ हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, हिंगोली येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी जयप्रकाश दांडेगांवकर आणि आ. रामराव बडकुते यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष मुनीर पटेल हे होते. यावेळी रेखा हिवाळे, आशाबाई शिंदे, सखुबाई इंगळे, कुश्वर्ता नळगे, कलावती सवंडकर, नंदाबाई धबडगे, नंदाबाई कदम या महिलांना या महिलांना प्रत्येकी दोन शेळया देण्यात आल्या. कावेरी जाधव, शांताबाई लिंबूळे, मालती कदम, सत्यभामा गायकवाड, रेखा गलांडे, छाया जगताप, इंदुबाई चव्हाण, अंजनाबाई सारंग, चंद्रकला जाधव, रेखा साबळे या महिलांना पिठाची गिरणी, शिवचरणा घोडके, शिवकन्या साखरे यांना पिको फॉल मशीन तर मथुराबाई जहीरब, नंदाबाई खरात, बायसाबाई तुरुकमाने यांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत हिंगोली जिल्हयातील या सर्व महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देखील देण्यात येणार आहे.

याप्रसंगी बाबुराव वानखेडे, अनिल पतंगे, शिवाजी गावंडे, देविदास क-हाळे, डॉ. धोंडीराम पारडीकर, विजयराव गावंडे, प्रा. गुलाब भोयर, ठाकूरसिंग बावरी, शिवाजी शिंदे, विनायक गव्हाणे, संचित गुंडेवार, राजू थळपते, विलास सावंत, संजय म्हस्के, विजय आडे, विजय डोंगरे, सुजय देशमुख, सर्जेराव पाटील, पठाण इरफान, संजय दराडे, रत्नमाला शिंदे, निलावती चव्हाण, सीमा सावंत, प्रतिभा टाले पाटील, सीमा राठोड, रत्नमाला चव्हाण, इंदिराबाई साखरे, कुसुमताई अवचार, शेख लतीफ शेख गयूम, अंबादासराव भोसले, राजेंद्र महागावकर, स्वप्नील गुंडेवार, संतोष गुट्टे, तात्या कदम, अमोल देशमुख, माधव कोरडे, बबलू मंगळूरकर, डी. एन. अडकीने यांची प्रमुख उपस्थिती होती.

६.७ **परभणी वितरण कार्यक्रम** - दि. ६ ऑगस्ट २०१६ : परभणी जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, परभणी येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. विजय भांबळे आणि आ. मधुसूदन केंद्रे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. रामराव वडकुते हे होते. या उपक्रमांतर्गत परभणी जिल्हयातील आठ महिलांना पिठाची गिरणी, सात महिलांना शेळया, दोन महिलांना शेवई मशीन आणि एका महिलेला शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी शहराध्यक्ष स्वराज परिहार, मनीषा केंद्रे, वनिता चव्हाण, सोनाली देशमुख, भावना नखाते, नंदा राठोड, विद्या पाटील, शशिकला चव्हाण, गंगाधर जवंजाळ, सिध्दांत हाके, सुरेंद्र रोडगे, विष्णू नवले, किरण सोनटक्के, संजय कदम, इमरान हुसैनी, सुमंत वाघ, श्रीकांत देखमुख, रितेश काळे, पुंजारे गुरुजी, ओंकार वडकुते, शाम गरुड, मीरा वाघ, सलमा शेख, शामला मुळावेकर, उज्वला पाटील, ज्ञानेश्वर खटिंग, नागेश लोंढे, ईश्वर बोईसोना यांची प्रमुख उपस्थिती होती.

६.८ **औरंगाबाद वितरण कार्यक्रम** - दि. ७ ऑगस्ट २०१६ : औरंगाबाद जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. भाऊसाहेब पाटील चिकटगावकर आणि आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कदीर मौलाना हे होते. या उपक्रमांतर्गत औरंगाबाद जिल्हयातील आठ महिलांना पिठाची गिरणी, आठ महिलांना शेळया, दोन महिलांना पिको फॉल आणि दोन महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. त्या सोबतच एका महिलेला इस्त्रीचे दुकान टाकून देण्यात येणार आहे. या प्रसंगी काशिनाथ कोकाटे, प्रदीप साळुंके, रंजना राजपूत, सुनिता साखरे, सुनिता मारग, हिरा वायकोस, सुरजितसिंग खुंगर, ख्वाजा शरीफोद्दीन, माणिकराव शिंदे, राजेश पवार, नितीन देशमुख, महेश उबाळे, सुनिता चव्हाण, मेहराज पटेल, अंकिता विधाते, प्रतिभा वैद्य, सीमा थोरात, शैलेश चौधरी, अभिषेक देशमुख, राहुल तायडे, डॉ. ज्ञानेश्वर नीळ, विनोद बनकर, विलास चव्हाण, इसाक पटेल, सोपानराव खोसे, सुशील बोर्डे, अक्षय गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ९.४ कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :-

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य सचिव म्हणून श्री. म. बा. पवार हे कामकाज पहात आहेत.

४.१ **फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते :-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत कायदेविषयक तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

३. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी वरचेवर विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळांचे आयोजन करणे.

४.२ **फोरमच्या बैठका :-** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुस-या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. या बैठकांना फोरमचे जास्तीत जास्त सदस्य उपस्थित राहतात. १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ या आर्थिक वर्षामध्ये फोरमच्या १२ मासिक बैठका झाल्या. या १२ बैठकांमध्ये एकूण अंदाजे १९४ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकांना एकूण १३१ सदस्य उपस्थित होते. याप्रमाणे प्रत्येक बैठकीला सरासरी ११ सदस्य उपस्थित होते.

४.३ **फोरमच्या उपसमित्या :-** वेळोवेळी विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी फोरमच्या उपसमित्या घटित केल्या जातात. या समित्यांमध्ये सक्रिय सदस्यांचा समावेश केला जातो. अशा उपसमित्यांनी दिलेल्या अहवालानुसार फोरमचे निर्णय घेण्यात येतात.

४.४ **विभागांची बैठक** : ऑक्टोबर २०१६ मध्ये ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा भरविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांच्या प्रतिनिधींची बैठक मा. सरचिटणीस श्री. शरद काळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२ जुलै २०१६ रोजी बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला १६ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ४१ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

४.५ **ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक** : ऑक्टोबर २०१६ मध्ये आयोजण्यात येणा-या ज्येष्ठ नागरिक आंनद मेळाव्याचे आयोजन करण्यासंबंधी विचार करण्यासाठी बांद्रा ते दहिसर या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक ज्येष्ठ नागरिक संघ वजिरा बोरीवली (पश्चिम), मुंबई येथे दि. २७ जुलै २०१६ रोजी दुपारी ३ वाजता श्री. विजय औंधे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला ६५ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ४१ पेक्षा जास्त बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

४.६ **कायदेविषयक सल्ला केंद्र :-** गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये या सल्ला केंद्राच्या एकूण ३९ बैठका झाल्या. या बैठकांमध्ये एकूण ८१ लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यात आला. सल्ल्याचे विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार, सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण, भाडे नियंत्रण, मोफा कायदा, गृहनिर्माण इत्यादी विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी मोफत वकीलाची सेवा मागणा-या लोकांना शासनाचे संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले.

४.७ **आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या :-** या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतीचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार आणि सायबर कायदा या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.८ **वकीलांची व्यावसायिक नितीमत्ता या विषयावर चर्चासत्र :-** विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात आणि त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नितीमत्ता या विषयाबाबत नवीन होतकरु वकीलांना जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या अशा कार्यक्रमांचे आयेजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.९ **विधी साक्षरता कार्यशाळा :-** लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्याची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळया घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदा. पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ट नागरिक, महिला सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त,

सार्वजनिक संस्थेचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सहा महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

(१) फोरम व सातारा बहुजन सेवा संघ नायगाव, दादर (पूर्व), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दि. १० एप्रिल २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत नायगाव भोईवाडा, मुंबई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु ती जागा शासनाने एस.एस.सी. परीक्षेसाठी घेतल्यामुळे तो कार्यक्रम ऐन वेळी रद्द करण्यात आला.

(२) फोरम व अंधश्रध्दा निर्मूलन समिती, केशव गोरे स्मृती ट्रस्ट, गोरेगाव (पश्चिम), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दि. २४ एप्रिल २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत गोरेगाव, मुंबई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष उपस्थित होते. अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्री. अविनाश पाटील हे कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(३) फोरम व मैत्री संस्था, परेल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दि. ८ मे २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत ग्रॅन्ट रोड, मुंबई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष उपस्थित होते. श्री. सुरज भोईर हे कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(४) फोरम व स्वयंम फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दि. २८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत म्युनिसिपल हायस्कूल, कुलाबा, मुंबई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी व हिंदी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष उपस्थित होते. श्री. उज्वल जाधव हे कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(५) फोरम व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली पूर्व यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी रविवार दि. ११ डिसेंबर २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत रोटरी क्लब ऑफ डोंबिवली पूर्व, रोटरी भवन, एम.आय.डी.सी., पेंढारकर महाविद्यालयासमोर, डोंबिवली पूर्व येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम इंग्रजी व मराठी होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. श्रीमती ज्योत्स्ना भिसे या कार्यक्रमात अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.

(६) फोरम व स्वयंसेवी समन्वयक संस्थेच्या माध्यमातून सिडको मनस्वी स्त्री संसाधन केंद्र कळंबोली, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांकरिता रविवार दि. ८ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कळंबोली, नवी मुंबई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. ९० महिला उपस्थित होत्या. श्रीमती वृषाली मगदूम हया कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.

(७) फोरम व स्वयंम फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने युवक व युवतींकरिता रविवार दि. १५ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत पालघर येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी व हिंदी होते. ९० युवक व युवती होते. कु. अब्रिता ढवळे हया कार्यक्रमाच्या प्रमुख म्हणून उपस्थित होत्या.

४.१० **विधी साक्षरता कार्यशाळेत शपथ कार्यक्रम व निबंधांनप बक्षिसे** :- सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधनातील मुलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंधीसंबंधी शपथा घेतल्या जातात. तसेच विधी साक्षरता

कार्यशाळेमध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयांबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकाच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. बक्षिसे संबंधित विद्यालये किंवा महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविली जातात. विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयाच्या समारंभामध्ये संबंधित विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.

४.११ **कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे :-** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६०, (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छापत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व पोटगी अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००७, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९९८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रँगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०, (५३) जादूटोणा विरोधी कायदा २०१३, (५४) हिंदू मायनॉरिटी ॲन्ड गार्डीयनशिप ॲक्ट, १९५६, (५५) गार्डीयनशिप ॲन्ड वॉर्डस्

ॲक्ट, (५६) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी, तक्रार व निवारण) अधिनियम २०१३ (५७) The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013 (Act 14 of 2013).

## ९.५ रंगस्वर - सांस्कृतिक विभाग :-

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाटय, चित्रपट, गायन आदी कार्यक्रम होतात. रंगस्वरची वार्षिक वर्गणी पती- पत्नीसाठी रु.२,०००/-, वैयक्तिक रु.१,२००/-, अपंगासाठी रु.५००/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या सदस्यांना कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. जानेवारी २०१५ मध्ये यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव याचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुंबई येथील सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम रंगस्वरच्या वतीने नियमितपणे सादर केले जातात. सर्व सभासद व रसिकांसाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो. रंगस्वरसाठी सभासद नोंदणी सुरु आहे.

## ९.६ सृजन :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोंड ओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे याकरिता सृजनचा हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देययाचा हा प्रयत्न आहे. सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहेत.

६.१ २६ जून रोजी श्री विवेक टेटवीलकर, प्राध्यापक, रचना संसद कॉलेज यांनी जून महिन्यात शाळा सुरु होत असतात त्यावेळी पुस्तकांना कव्हर घालण्यात येत असते. पारंपारिक पध्दतीने पुस्तके / वहयांना कव्हर घालणा-या पेक्षा विविध पध्दतीने मुलांना वहया पुस्तकांना कव्हर घालण्यास शिकले. वहया पुस्तके खराब होणार नाही वहया पुस्तकांची काळजी कशी घ्यावी याची माहिती दिली.

६.२ १६ जुलै रोजी श्री. जॉन डग्लस सर यांनी पातळ प्लॅस्टिकच्यापासून रेनकोट कसे बनवावेत याचे या विषयावर कार्यशाळा घेतली यानंतर हा रेनकोट कमी खर्चात तयार कसा करावा विविध स्थानिक वस्तूचा वापर करुन रेनकोर्ट कसा सजावा यांचे प्रात्याक्षिक त्यांनी करुन दाखवले.

६.३ ७ ऑगस्ट २०१६ रोजी सर्पमित्र श्री सुनिल कदम यांनी नागपंचमी या दिवशी सर्प या विषयावर माहिती दिली. स्लाईड शो, प्रश्नोत्तरे आणि खेळ यामाध्यमातून मुलांना सर्प विषयावर माहिती दिली. सर्प या विषयावर मुलांच्या अनेक शंकाचे निरासरण केले. त्याच दिवशी फेंडशिप डे होता विद्यार्थ्यानी सृजनप्रमुख, खासदार मा. सौ. सुप्रिया ताई सुळे यांना फेंडशिप बॅन्ड बांधुन फेंडशिप डे साजरा केला.

६.४ ४ सप्टेबर २०१६ गणपती बनविणे या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. श्री. द्रवेंद्र मलमे यांनी मुलांना मातीपासून विविध प्रकारची वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले. मातीपासून गणपती कसा तयार करावा या गोष्टीपासून बरोबर मुलांनी या कार्यशाळेत मातीच्यर छोटया वस्तू आणि गणपती इ. प्रकारे बनविले.

६.५ २ ऑक्टोबर २०१६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने मुलांना महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित विविध शार्ट फिल्म दाखविण्यात आल्या. यानंतर मुलांना महात्मा गांधी यांच्या जीवनावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये अनेक मुलांनी सहभाग घेतली. विजयी स्पर्धाकांना खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते बक्षीस म्हणून पुस्तके देण्यात आली.

६.६ ६ नोव्हेबर २०१६ श्री. सुनिल कदम यांनी विज्ञानातील गमती जमती या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेमध्ये घरातील विविध साधनाचा वापर करुन काही विज्ञान प्रयोग कसा करता येईल यांचे प्रात्याक्षिक

दाखविले. त्याचबरोबर निखारावरुन चालत असताना आणि अंगावरुन ज्वाला फिरवणा-या पाठीमागे काय विज्ञान असते. यांची माहिती दिली.

६.७ डिसेंबर २०१६ सृजन उपक्रमाला १३ वर्षे पुर्ण होत असून त्याचबरोबर सृजन २०१६ या वर्षाचा सांगता समारंभ म्हणून पार्टी हा कार्यक्रम आयोजित केला होता याकार्यक्रमा मध्ये श्री. संतोष जोशी यांनी जादुचे प्रयोग, खेळ असे मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले.

सृष्टीजन या पर्यावरण शिक्षण देणा-या संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती. संगीता खरात यांनी 'जैवविविधता - संरक्षण आणि संवर्धन' विषयावर सादरीकरण केले तसेच फिल्महीं दाखवली. जैवविविधता म्हणजे काय, प्राण्यांचे विविध अधिवास, प्राण्यांमधील वर्गीकरण, जैवविविधतेचे आपल्या आयुष्यातील महत्व तसेच जैवविविधतेला असलेले धोके याबद्दल या सत्रात माहिती देण्यात आली. फेब्रुवारी २०१७ रोजी अनुयोग शिक्षण संस्थेच्या संस्थापक श्री. सतीश चिंदरकर यांनी 'परिक्षेची तयारी' या विषयावर मुलांना मार्गदर्शन केले विविध विषयांचा अभ्यास कसा करायचा. अवघड वाटत असलेला विषयाचा अभ्यास कसा करावा. अभ्यास करण्याची पूर्वतयारी करुन अभ्यासाला बसावे त्याचबरोबर घरातील कोणते काम करयाचे असेल तर ते अगोदर करुन अभ्यासाला बसावे त्यामुळे एकाग्रतेने अभ्यास करता येईल.

मार्च ते मे या महिन्यात मुलांच्या वार्षिक परिक्षा आणि उन्हाळाची सुट्टी यामुळे तीन महिने सृजन कार्यशाळा आयोजित करण्यात येत नाही. सृजनाच्या कार्यशाळेत प्रत्येक सत्रात १०० ते १५० च्या आसपास विद्यार्थ्याचा सहभाग असतो.

## ९.७ शिक्षण विकास मंच :-

शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी २००८ साली 'शिक्षण विकास मंच' ची स्थापना झाली. मा. सुप्रिया सुळे हया मंचच्या निमंत्रक आहेत. मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे, विशेष सल्लागार बसंती रॉय, संयोजक दत्ता बाळसराफ, समन्वयक सुरेश पाटील, प्रा. माधव सुर्यवंशी व सदस्य म्हणून नजमा काझी, शुभदा चौकर, विलास कांबळे हे मदत करतात. शिवाय राज्यातील शिक्षण तज्ञ, मुख्याध्यापक, शिक्षक हेही वेळोवेळी शिक्षण विकास मंचच्या कामास सहकार्य करीत असतात. शिक्षण विकास मंचच्या सुरुवातीपासूनच्या मार्गदर्शक डॉ. कुमुद बन्सल यांचे ५ सप्टेंबर २०१५ रोजी आकस्मिक दुःखद निधन झाले. त्यांनी घालून दिलेल्या वाटेवरच मंचची यशस्वी वाटचाल सुरु आहे. आपल्या वैशिष्टयपूर्ण कामामुळे राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळा सकारात्मक कार्याचा ठसा शिक्षण विकास मंचने उमटविला आहे.

७.१ **शालेय विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :-** शिक्षण विकास मंचाकडून २३ एप्रिल २०१६ रोजी 'शालेय विद्यार्थ्यांचे मूल्यमापन' या विषयावर शिक्षण कट्टयावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. शालेय विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करावे याबाबत चर्चा करण्यासाठी मा. कृष्णकुमार पाटील (सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ) उपस्थित होते. घोकंपट्टी आणि पाठांतर करण्यापेक्षा भाषा विषयाचे ज्ञान वाढविण्यासाठी शिक्षण मंडळ यंदा प्रथम-भाषा, द्वितीय-भाषा व संयुक्त भाषा या विषयाच्या कृतिपत्रिका काढणार आहे याचीही माहिती त्यांनी शिक्षण कट्टयावर दिली. या संदर्भातील प्रशिक्षण प्राथमिक शिक्षकांना जून जुलै महिन्यात देणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. भाषा विषयात 'धोका आणि ओका' या पध्दतीला फाटा देऊन त्याऐवजी कृतीवर भर देणार असल्याचे मा. कृष्णकुमार पाटील यांनी सांगितले. भाषा परीक्षेच्या स्वरुपातील बदल सांगताना त्यांनी पुढील माहिती दिली. २० मार्कांची तोंडी परीक्षा आणि ८० मार्कांची लेखी परीक्षा पूर्वीप्रमाणेच असेल. प्रथम भाषा शिकविताना शिक्षकांनी केवळ वाचन आणि पाठांतराकरिता मर्यादित न ठेवता धडयातील व्याकरण, भाषाभ्यास, वाचन, उपक्रम, स्वाध्याय आदी घटकांची उजळणी करुन घ्यावी. कृतिपत्रिकेत विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिताना भाषा आकलन होणे आवश्यक आहे. खरोखरच भाषाज्ञान, भाषाकौशल्ये आत्मसात केली आहेत की नाहीत हे समजण्यासाठी कृतीयुक्त प्रश्न विचारले जाणार आहेत. निबंध लिहिताना विद्यार्थी वाचून पाठांतर

करुन लिहितात. त्याऐवजी एखादे वाक्य दिले जाईल आणि कल्पनाशक्तीचा वापर करुन विद्यार्थी त्याचे वर्णन करेल. यामुळे विद्यार्थ्यांस भाषेचे ज्ञान, जाण याचीही माहिती मिळेल.

शिक्षण कट्ट्यात शिक्षकांनी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत सुरु असलेल्या विविध चाचण्यांसंदर्भात सरकार जागरुक नसल्याच्या तक्रारी केल्या. प्रश्नपत्रिकेतील स्वरुप आणि रचना यात कौशल्याचा अभाव असल्याचेही नमूद केले. विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देण्याऐवजी त्यांचे मूल्यमापन करण्यात येत आहे, ही पध्दत चुकीची आहे असे मत यावेळी मुख्याध्यापक सुचेता भवाळकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास शिक्षण विकास मंचाचे संयोजक डॉ. वसंत काळपांडे, मुख्य मार्गदर्शक श्रीमती बसंती रॉय, एनसीईआरटीचे राज्य समन्वयक रमाकांत काठमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. नजमा काझी, राज अलोनी, फादर ज्यूड, फादर स्वामी, शैलजा मुळे, डॉ. समीर दलवाई, शुभदा चौकर, पत्रकार पूजा पेडणेकर, विनम्रता बोरवणकर, पवन होल्याळकर आणि विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते. समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी सर्वांचे आभार मानले.

७.२ **'कट्टा शिक्षणाचा' २३ जुलै २०१६ :-** शिक्षण विकास मंच, शिक्षणकट्टा अंतर्गत वेगवेगळया शैक्षणिक विषयांवर चर्चा होत असते. यावेळी चर्चा २३ जुलै २०१६ रोजी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०१६' यावर करण्यात आली. या कार्यक्रमास शिक्षणतज्ञ मा. किशोर दरक, मुंबई शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे, डॉ. समीर दलवाई आणि प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री दत्ता बाळसराफ यांची प्रमुख उपस्थिती होती. या कट्टयाच्या संयोजक बसंती रॉय यांनी 'शैक्षणिक धोरणाचे स्वरुप' समजावून सांगितले. तसेच किशोर दरक यांनी मुलांच्या भविष्याच्या दृष्टीने घ्यावयाची सुरक्षा, मुलांचे हक्क आणि कायदे, पालकांची जागरुकता, शिक्षकांची प्रशिक्षणे यावर मार्गदर्शन केले.

७.३ **राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०१६, ७ ऑगस्ट २०१६ :-** शिक्षण विकास मंचावरील शिक्षण कट्टा यावर उपक्रमात 'राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०१६' यावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चेचा पहिला भाग २३ जुलै रोजी झाला होता. उर्वरीत विषयावर ७ ऑगस्ट रोजी अभ्यासपूर्ण चर्चा झाली. शाळेचे अभिन्न अंग असलेल्या शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी निगडित विषयावर मुख्यत्वे चर्चा झाली. शिक्षक, मुख्याध्यापक यांची निवड कशी केली जावी, त्यांचे प्रशिक्षण, बढती, वेतन आदी संदर्भात या धोरणात काय तरतूदी आहेत आणि यात काय बदल आवश्यक आहेत यासंबंधीचे विचारमंथन करण्यात आले. ही चर्चा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पूर्ण दिवस सुरु होती. या चर्चेची सुरुवात शिक्षण कट्टयाच्या निमंत्रक श्रीमती बसंती रॉय यांनी केले तर आभार समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी मानले.

७.४ **विशेष बैठक : २३ जानेवारी २०१७ :-** शिक्षण विकास मंचची विशेष सभा २३ जानेवारी २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. ही बैठक शिक्षण विकास मंचचे संयोजक डॉ. काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होती. प्रारंभी शिक्षण विकास मंचच्या गतवर्षातील कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. दरवर्षी २५ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय शिक्षण परिषद होत असते. यावर्षी ती झाली नाही. या परिषदेत उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथांनप शिक्षण विकास मंच मार्फत 'कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार' देण्यात येतो. या वर्षी एप्रिल २०१७ मध्ये ही राज्यस्तरीय परिषद होणार आहे. पुरस्कारांसाठी आलेल्या ग्रंथापैकी पुरस्कारांसाठी कोणते ग्रंथ योग्य आहेत याची चर्चा यावेळी करण्यात आली. आगामी राज्यस्तरीय परिषदेचा विषय काय असावा या संदर्भातही चर्चा झाली. ही परिषद अहमदनगर येथे घेण्याचे ठरले आहे. परिषदेचा विषय सध्यातरी 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' हा ठेवण्यात आला आहे. या परिषदे अगोदर मार्चच्या शेवटच्या आठवडयात मुंबई येथे या विषयावर शिक्षण कट्टा आयोजित करण्यात यावा. या कट्टयामध्ये जी चर्चा होणार आहे ती राज्यस्तरीय परिषदेची पूर्वतयारी असावी असा प्रयत्न व्हावा असे ठरविण्यात आले. हा कट्टा पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार श्रीमती बसंती रॉय यांनी घेतली. यासंदर्भात मदत करण्याचे निर्देश डॉ. काळपांडे यांनी समन्वयक सूर्यवंशी यांना दिले. या विशेष बैठकीत प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, माधव सूर्यवंशी यांची मुख्य उपस्थिती होती.

## ९.८ अपंग हक्क विकास मंच :-

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती करण्यात आली. मंचाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व श्री. दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत शिबीराचे आयोजन करुन सर्व प्रवर्गातील अपंगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कृत्रिम अवयव व साहित्य साधनांसाठीचे मोजमाप घेऊन साधने मोफत उपलब्ध करुन दिली जातात. या मंचामार्फत प्रत्येक अपंगांना त्यांच्या अपेक्षेनुसार योग्य ती माहिती पुरविली जाते. तसेच अपंगांना मदत करण्याचा आपल्या स्तरावरुन योग्य ते सहकार्य करण्याचा मंचाचा सतत प्रयत्न असतो. महाराष्ट्रातील विविध जिल्हयात सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व प्रवर्गातील अपंगांसाठी कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व अपंग हक्क विकास मंचाचे कर्मचारी व कार्यकर्ते आणि सहकारी यांनी परिश्रम घेतले त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे.

८.१ **पुणे (इंदापूर) दि. ४ जुलै २०१६ : पुणे जिल्हयातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर** :- स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका, अपंग हक्क विकास मंच, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हयातील १००० श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधिर मुले यांना मोफत डिजिटल श्रवणयत्र वाटप शिबिर इंदापूर शाह सांस्कृतिक सभागृह, इंदापूर, पुणे येथे दि. ४ जुलै २०१६ रोजी संपन्न झाले. या शिबिरात दौंड, पुरंदर, बारामती येथील ग्रामीण व शहरी भागातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधिर मुलांनी याचा लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका या संस्थेचे भारतात दिल्ली येथे काम करणारे पदाधिकारी व स्वयंसेवक पुण्यात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पूर्व तयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, निलेश राऊत, सुबोध जाधव व स्टारकीचे समन्वयक यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी मा. दत्तामामा भरणे (आमदार), इंदापूर तालुकाध्यक्ष मा. आप्पासाहेब जगदाळे, मा. प्रदिपदादा गारटकर, मा. महारुद्र पाटील (तालुकाध्यक्ष), मा. सौ. सुनंदा पवार (विश्वस्त, ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट), मा. सौ. शुभांगी पवार, मा. रेहनाताई मुलानी (तालुका महिलाध्यक्ष), मा. सचिन सकपाळ (तालुका युवक अध्यक्ष), मा. शुभम निंबाळकर (तालुका विद्यार्थी अध्यक्ष), मा. सौ. वनिता बनकर (बारामती तालुका अध्यक्ष) आदी मान्यवर उपस्थित होते.

८.२ **पुणे (बारामती) दि. १९ व २० ऑगस्ट २०१६ : पुणे जिल्हयातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर** :- स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका, अपंग हक्क विकास मंच, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हयातील १३०० श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधिर मुले यांना मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर आप्पासाहेब पवार सभागृह, बारामती येथे दि. १९ व २० ऑगस्ट २०१६ रोजी संपन्न झाले. या शिबिरात सातारा, सांगली, उस्मानाबाद, सोलापूर या जिल्हयांतील विविध तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरीक व कर्णबधिर मुलांनी याचा लाभ घेतला. या शिबिरातील कर्णबधिर मुलांची व ज्येष्ठ नागरिकांच्या कानाची तपासणी आणि कर्ण साचाचे मोजमापाचे शिबिर अनुक्रमे दि. ५ जुलै २०१६ रोजी बार्शी (सोलापूर), दि. ६ जुलै २०१६ रोजी (उस्मानाबाद), दि. ७ व ८ जुलै २०१६ रोजी (बारामती), दि. ९ जुलै २०१६ रोजी (पुणे) येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी स्टारकी फाऊंडेशन, अमेरिकाचे अध्यक्ष श्री. बिल ऑस्टीन आणि त्यांच्या पत्नी टॅनी ऑस्टीन तसेच या संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक अमेरिकेहून या शिबिरासाठी बारामतीत उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पूर्व तयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, निलेश राऊत,

सुबोध जाधव आदींनी मार्गदर्शन केले. दि. १९ व २० ऑगस्ट २०१६ रोजी सकाळपासूनच पुणे जिल्हयातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक आणि निवड केलेल्या विशेष शाळा व त्यांचे कर्णबधिर विद्यार्थी आप्पासाहेब सभागृहात येण्यास सुरुवात झाली. प्रत्येक शाळांनी त्यांचे विद्यार्थी ३ ते १४ वयोगटातील विद्यार्थी गट निहाय क्रमाने बसवले होते. आलेल्या प्रत्येक कर्णबधिर विद्यार्थ्याला व श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिकांना अगोदरच दिलेल्या व सविस्तर अशा फॉर्मसह त्यांच्या क्रमानुसार नोंदणी करण्यात आली. नोंदणी झालेले विद्यार्थ्यांचे व ज्येष्ठ नागरिकांचे कान स्वच्छ आहेत किंवा नाही याची पडताळणी करण्यात आली. तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांचे कान स्वच्छ करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्वच्छ केलेल्या कानामध्ये अगोदरच मोजमाप घेऊन तयार करण्यात आलेले कानाचे मोल्ड (कर्णसाचे) बसविण्यात आले. मोल्ड बसविण्यात आलेले विद्यार्थ्यांना हॉलमध्ये क्रमानुसार बसवण्यात येत होते. विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी कार्टून फिल्मची व्यवस्था करण्यात आली. एक एक करुन विद्यार्थ्यांना स्टेजवर बोलावून त्यांना श्रवणयंत्र बसवण्यात येत होते. प्रत्येक श्रवणयंत्राची नीट तपासणी करुन विद्यार्थ्यांना दिले जात होते. या आधुनिक डिजिटल श्रवणयंत्राची निगा कशी राखावी, त्याचा वापर कसा करावा, वापर नसताना ते कशा प्रकारे ठेवावे याची माहिती विशेष शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. संपूर्ण माहिती देऊन झाल्यावर विद्यार्थ्यांना शेवटी त्यांच्या श्रवणयंत्रासाठी आवश्यक असणारे पाऊच व पुढील सहा महिने पुरतील एवढे सेल त्यांना देण्यात आले होते. श्रवणयंत्र व्यवस्थित काम करत असलेल्या बद्दलची खात्री करुन पुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. पुणे जिल्हयाच्या कानाकोप-यातून आलेल्या विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. दुषित पाण्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये याकरिता सर्वांना शुध्द पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्टारकीचे कर्मचारी असो वा शिक्षक, विद्यार्थी सर्वांना त्यांच्या जागेवर जेवण, चहा व पाणी मिळण्याची व्यवस्था सर्व स्वयंसेवकांनी यथोचित पार पाडली.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनासाठी मा. श्री. शरदचंद्र पवार साहेब, श्री. अजितदादा पवार, खा. सौ. सुप्रियाताई सुळे, श्री. राजेंद्र पवार, सौ. सुनंदा पवार, सौ. सुनेत्रा पवार, श्री. रंजितदादा पवार, सौ. शुभांगी पवार, श्री. विठ्ठलराव मनियार, श्री. एन. के. पाटील, आयुक्त, (अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे) आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांचा स्मृतिचिन्हे आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अपंग हक्क विकास मंच मुंबईचे राज्य संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. निलेश राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस अपंग सेलचे राज्य प्रमुख श्री. सुहास तेंडुलकर, श्री. अभिजीत राऊत, डॉ. कल्याणी मांडक आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबादचे कर्मचारी वृंद, स्वयंसेवक, अपंग हक्क विकास मंच मुंबई व पुणे विभागाचे कार्यकर्ते, स्वयंसेवकांची टीम आदींनी परिश्रम घेतले.

८.३ **पुणे दि. ३१ जानेवारी २०१७ : 'दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६' 'एक दृष्टीक्षेप' कार्यशाळा :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग कल्याण आयुक्त कार्यालय पुणे आणि जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६' 'एक दृष्टीक्षेप' कार्यशाळा निसर्ग मंगल कार्यालय, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे येथे दि. ३१ जानेवारी २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी सध्याचे अपंग कल्याण आयुक्त मा. नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यशाळेची सुरुवात झाली. आयुक्तांनी केलेल्या त्यांच्या भाषणात केंद्र शासनाने २०१६ ला मंजूर केलेल्या दिव्यांग व्यक्तींसाठीच्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून सर्वसमावेशक व परिणामकारक नियमावली तयार करण्यात येत आहे. त्यामुळे नवीन कायदा तळागाळातील दिव्यांग व्यक्तींपर्यंत पोचवण्यासाठी या क्षेत्रातील सेवाभावी संस्था व तज्ज्ञ व्यक्तींनी जनजागृती करावी. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून तयार करण्यात येणा-या नियमावलीसाठी दिव्यांग क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांनी केलेल्या सूचनांचे स्वागत केले जाईल असे आवाहन राज्याचे अपंग कल्याण आयुक्त मा. नितीन पाटील यांनी केले. दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६ निर्मिती प्रक्रिया, २) दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६ व त्याचा आशय, ३) दिव्यांग कायदा-२०१६ आणि त्याची व्याप्ती, ४) दिव्यांग कायदा व राज्य शासनाची नियमावली, ५) दिव्यांग कायदा-२०१६ आणि अपंगत्वाचे प्रकार, ६) दिव्यांग कायदा-२०१६ ची धोरणात्मक अंमलबजावणी प्रक्रिया इत्यादी विषय या

कार्यशाळेत मांडण्यात आले. या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती मा. समीर घोष, मा. असीम सरोदे, मा. बी. एम. तायडे, मा. संजय जैन, मा. डॉ. कल्याणी मांडके, मा. नितीन पाटील आदी मान्यवरांनी वरील विषयांवर मार्गदर्शन केले. याप्रसंगी समाज कल्याणचे अतिरिक्त आयुक्त मा. सदानंद पाटील, प्रादेशिक उपयाुक्त मा. लक्ष्मीकांत महाजन, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मा. प्रवीण कोरगनटीवार, अपंग कल्याण निरीक्षक मा. मधुकर फाटवडे, प्रकल्प संचालक मा. नंदकुमार फुले, सी. आर. रंगनाथन, संस्थेचे अध्यक्ष वसंत पाटोळे, वसंत ठकार आदी मान्यवर उपस्थित होते.

८.४ **मुंबई दि. २१ मार्च २०१७ : 'वर्ल्ड डाऊन सिन्ड्रोम डे' कार्यशाळा** :- 'वर्ल्ड डाऊन सिन्ड्रोम डे' चे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच आणि पॅरेन्टस ऑफ दाऊन सिन्ड्रोम असोसिएशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ मार्च २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्राच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये मुलांच्या पालकांसाठी प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेला पालकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

सकाळी साडेनऊ वाजता सुरु झालेल्या कार्यक्रमास प्रथम प्रार्थना नृत्याने डाऊन सिन्ड्रोम असलेल्या विशेष मुलांनी सुरेख सादरीकरण केले. या कार्यशाळेसाठी राज्याचे अपंग कल्याण विभागाचे आयुक्त मा. नितीन पाटील (भा.प्र.से.), डॉ. अशोक खनवटे, प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अंजली छाब्रिया, शिक्षणतज्ज्ञ मिनाक्षी बालसुब्रम्हण्यम, प्रसिध्द बालरोगतज्ज्ञ डॉ. समीर दलवाई आदींनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी नितीन पाटील यांनी राज्याच्या होऊ घातलेल्या धोरणांमध्ये या विशेष मुलांसाठी तरतुदी केल्या असून आता प्रत्येक सामान्य शाळांमध्ये विशेष शिक्षकांची नियुक्ती केली जाणार असल्याचे कळवले. डॉ. खनवटे यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात साध्या भाषेत या मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकांनी व समाजानी काय केले पाहिजे हे तंत्रशुध्द पध्दतीने सांगितले. यावेळी मुले आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. सुप्रसिध्द मानसोपचारतज्ज्ञ आणि मनोविकारतज्ज्ञ असलेल्या डॉ. अंजली छाब्रिया यांनी या मानसोपचार आणि मनोविकार यांतील फरक आणि समाजामध्ये उपचाराबद्दल असलेला गैरसमज आणि भिती याबाबतची सविस्तर माहिती दिली. त्यांनी असे विषद केले की, प्रत्येक व्यक्तीला मग तो डाऊन सिन्ड्रोम असो अथवा नसो, सल्ला व मार्गदर्शनाची गरज असते.

डॉ. समीर दलवाई यांनी डाऊन सिन्ड्रोम विद्यार्थ्यांचे शीघ्र हस्तक्षेप करुन योग्य तो उपचार आणि थेरेपी देणे तसेच व्यक्तिमत्व विकासावर लक्ष देऊन पालकांनी या मुलांना मुख्य प्रवाहात येण्यासाठी मदत केली पाहिजे. मिनाक्षी बालसुब्रम्हण्यम यांनी या मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कला, क्रीडा, योगा आणि नृत्य आदींच्या मदतीने मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न केले पाहिजे असे आवाहन केले. यावेळी पालकांच्या संस्थेचे प्रमुख गोपाल सेहेजपाल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मणिहार भाटे यांनी आभार मानले. आये फिर आये फिर से रानीला मेहमान या गाण्याने कार्यक्रम संपन्न झाला.

८.५ **मुंबई दि. ३० मार्च २०१७ : स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा** :- स्वच्छ भारत अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या घर तिथे शौचालय आणि सार्वजनिक स्वच्छता गृहामधील सोयी-सुविधा याबाबत केंद्र व राज्य शासनाच्या वतीने त्याची बांधणी करताना सर्व प्रवर्गाच्या अपंगांसाठी अडथळा विरहीत सोईचे असावे याबाबत जाणीव जागृती करण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे दि. ३० मार्च २०१७ रोजी बोर्डरुममध्ये आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला पाच जिल्हयांमधून विविध प्रवर्गाचे दिव्यांग लाभार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला समीर घोष (वर्ल्ड बँक) यांनी पाच जिल्हयांमधून आलेल्या लाभार्थींचे स्वागत केले. वैशाली ठाकूर (एम.एस.आर.एल.एम.) यांनी कार्यक्रमाची रुपरेषा सांगून लाभार्थींच्या अडीअडचणी, प्रवास करताना होणारा त्रास अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. वर्ल्ड बँकेच्या डॉ. मेघा फणसळकर यांनी सर्व लाभार्थ्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर प्रत्येक लाभार्थ्यांना होत असलेल्या समस्या विचारण्यात आल्या.

स्वच्छ अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या घर तिथे शौचालय या केंद्र व राज्य शासनाच्या योजनेमध्ये सर्व प्रवर्गाच्या अपंगांना आवश्यक असणा-या सुविधांचा समावेश या योजनेमध्ये आहे का ? या मुख्य विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत स्वच्छतागृहे अडथळा विरहीत सोयीचे कसे असावेत याबाबत

लाभार्थ्यांची मते व समस्या जाणून घेण्यात आल्या. लाभार्थींच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. उपस्थित प्रश्नांची मान्यवरांनी योग्य उत्तरे दिली. मान्यवरांनी लाभार्थींना मार्गदर्शन केले.

राज्यामध्ये अपंग व्यक्तींसाठी बांधण्यात आलेले शौचालय चालू आहे की बंद आहे याची शहानिशा करणे कसे गरजेचे आहे याबाबत डॉ. समीर दलवाई यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच कार्यशाळेत वर्ल्ड बँकेचे वरिष्ठ अधिकारी या विषयावर काम करणारे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, राज्य शासनाचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि ग्रामीण भागातील प्रत्यक्ष लाभार्थी प्रतिनिधीक स्वरुपात उपस्थित राहून लाभार्थींशी संवाद साधला. या पूर्ण कार्यशाळेला एकूण ४५ लाभार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेला वर्ल्ड बँकेचे समीर घोष, वर्ल्ड बँकेच्या डॉ. मेघा फणसळकर, प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे, वर्ल्ड बँकेचे श्रीकांत नेवरेकर, डॉ. मीनाक्षी देशपांडे, आर. विमला, अपंग हक्क विकास मंचाचे विजय कान्हेकर यावेळी उपस्थित होते.

## ९.९ वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान :-

हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ या जगाला भेडसावणा-या समस्या आहेत. वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान मार्फत हे आव्हान पेलणारी भावी पिढी घडविण्याचा प्रयत्न शालेय पातळीवर केला जातो आहे. याच उपक्रमातील पुढील पाऊल म्हणजे मुलांचे हवामान अध्ययन केंद्र होय. हवामानाचा अभ्यास करण्यासाठी स्थानिक पातळीवरील उपययोजना करण्याकरिता विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची तयारी करुन घेणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांच्या अंमलबजावणीतून स्थानिक पातळीवरील हवामान अध्ययन केंद्र आकाराला येईल. यामार्फत प्रकल्पात सहभागी मुलांमध्ये हवामानविषयक शास्त्रीय अध्ययन, माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरणाचे कौशल्य विकसित होईल. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांबरोबर रिकाम्या प्लास्टीक बाटल्यांपासून पर्जन्यमापक बनवणे आणि प्लास्टीक स्ट्रॉपासून वातकुक्कुट बनवणे शिकवले होते.

'वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान' मार्फत हे आव्हान पेलणारी भावी पिढी घडविण्याचा प्रयत्न शालेय पातळीवर केला जात आहे. गेली पाच वर्षे मुंबई आणि पुण्यातील शाळांमधून आजवर हजारो विद्यार्थ्यांबरोबर यासंदर्भात विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. याच उपक्रमातील पुढील पाऊल म्हणजे मुलांचे हवामान अध्ययन केंद्र होय. हवामान बदलाचा परिणाम महाराष्ट्राचे पर्जन्यमान, शेती, माती, ऊर्जा, कचरा निर्मूलन आणि जैवविविधता या संदर्भात ठळकपणे लक्षात येत आहे. गाव असो की शहर, सर्वांनाच कमी अधिक प्रमाणात हवामान बदलाचा फटका बसत आहे. हे लक्षात घेऊन मुंबई, पुणे, ठाणे, पालघर, रायगड आणि बीड जिल्हयांतील विविध शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांबरोबर जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल या पर्यावरणातील समस्यांविषयी जाणीव जागृती केली जाणार आहे. साधी सोपी उपकरणे तयार करुन पाऊस मोजणे, तापमान मोजणे, मातीची व पाण्याची गुणवत्ता ओळखणे, जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी वृक्षसंवर्धन करणे, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा अवलंब करणे असे अनेक उपक्रम केले जातील. या उपक्रमांच्या अंमलबजावणीतून स्थानिक पातळीवरील हवामान अध्ययन केंद्र आकारास येईल. यामार्फत प्रकल्पात सहभागी मुलांमध्ये हवामान विषयक शास्त्रीय अध्ययन, माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरणाचे कौशल्य सुध्दा विकसित होईल.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विविध कार्यकर्त्यांबरोबर बैठका घेऊन शाळांची निवड व कार्यक्रमाचे वेळापत्रक आखण्यात आले. ऑगस्ट महिन्यात सर्व शाळांना प्रकल्प सहभागासाठी पत्रं पाठविण्यात आली.

शाळांचा उत्तम प्रतिसाद या प्रकल्पाला मिळाला व लगेचच शाळांमध्ये पकल्पातील विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली. पहिल्या सत्रात हवामान बदल म्हणजे काय ? हवामान कसे मोजायचे ? हवामानावर परिणाम करणारे विविध घटक व हवामान मोजावयाची विविध उपकरणे कोणती याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच साध्या प्लास्टिकच्या बाटलीपासून पर्जन्यमापक बनवून त्यात पाऊस कसा मोजायचा याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे स्ट्रॉ आणि पेन्सिल वापरुन वातकुक्कुटाची संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. त्या अनुसार

वातकुक्कुट तयार करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुटीमध्ये करण्यासाठी देण्यात आला. उत्तम बनविलेला वातकुक्कुट शाळेच्या गच्चीवर लावला जाईल व त्यानुसार होकायंत्र वापरुन वा-याची दिशा ओळखायला विद्यार्थी शिकतील.

या व्यतिरिक्त प्रकल्पांतर्गत रेन गेज (पर्जन्यमापक), अॅनराइड बॅरोमीटर (हवेचा दाबमापक), तापमापक, दिशादर्शक होकायंत्र हायड्रोमीटर (आर्द्रतामापक) अशा शास्त्रीय पध्दतीने हवामान मोजावयास मदत करणा-या उपकरणांचा संच प्रत्येक शाळेत कार्यरत करणार असून त्यांच्या नोंदी घेण्याची जबाबदारी त्या शाळेतील संबंधित शिक्षक व विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

९.१ **क्लायमेट अँबॅसॅडर्स स्टुडंटस कॉन्फरन्स - दि. १९ डिसेंबर २०१६** : वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान आणि सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्लायमेट अँबॅसॅडर्स, मुंबई स्टॉकहोम' या प्रकल्पाची सांगता विद्यार्थ्यांच्या परिषदेने सोमवारी दि. १९ सप्टेंबर २०१६ रोजी झाली. या समारोप प्रसंगी प्रकल्पातील सहभागी संस्था क्लायमेट अॅक्शनचे प्रतिनिधी श्रीमती करीन वाह्लग्रेन आणि श्री रिकार्ड -हेनबर्ग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परिषदेची सुरुवात विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रकल्प प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाने झाली. या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या उपक्रमांचे अहवाल तसेच हवामान बदलास उत्तर म्हणून त्यांनी तयार केलेली मॉडेल या प्रदर्शनात मांडली होती. परिषदेच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी नाटिका, मूकाभिनय, पोवाडा अशा विविध माध्यमातून हवामान बदल ही समस्या आणि तिच्यावरील उपाययोजनांचे सादरीकरण केले. हवामान बदल या समस्येला वैयक्तिक पातळीवर द्यावयाचे उत्तर म्हणजे आपली जीवनशैली बदलणे, हवामानानुसार आपल्या कपडयांमध्ये बदल करणे. भारतीय पारंपारिक पोषाखांमध्ये हे हवामानाचे भान राखलेले होते जे आपण विसरत चाललो आहोत. म्हणूनच हा विसरलेला वारसा पुन्हा आठवून देणारा फॅशन शो सादर झाला. यात सर्व शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि सृष्टीज्ञानच्या कार्यकर्त्यांनीही सहभाग घेतला.

सृष्टीज्ञान संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. प्रशांत शिंदे यांनी परिषदेचे प्रास्ताविक केले. जागतिक पातळीवर सुरु असलेल्या हवामान बदल विषयक घडामोडींचा आढावा घेऊन आपणही आपल्या पातळीवर या समस्येवर प्रकल्पाच्या माध्यमातून काम सुरु केले आहे अशी मांडणी त्यांनी केली. यानंतर शारदाश्रम विद्यामंदिर तांत्रिक विद्यालयाच्या शिक्षिका श्रीमती हर्षदा मिश्रा यांनी प्रकल्पांतर्गत राबविलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. प्रकल्पात सहभागी झालेल्या विद्यार्थी व शिक्षक प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर प्रमुख पाहुणे श्री. रिकार्ड -हेनबर्ग यांनी क्लायमेट अॅक्शन संस्था आणि फ्युचर अर्थ नेटवर्क यांच्या कार्याची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. स्वीडनमध्ये हवामान बदलाशी निगडीत विविध समस्यांवर काय काम सुरु आहे, जैविक इंधनाच्या विरोधात कशी आंदोलने सुरु आहेत, धोरणांच्या आखणीबाबत राजकीय प्रतिनिधींशी कशा चर्चा सुरु आहेत याची मांडणी आपल्या सादरीकरणात केली. श्रीमती कारीन वाहनग्रेन यांनी हवामान बदल विषयक सादरीकरण केले. हवामान बदल होत आहेत हे जगातील सवा शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. त्याची तीव्रता आणि त्याचे पृथ्वीवर होणारे परिणाम त्यांनी सादरीकरणातून दाखवले. त्यावर उपाययोजना म्हणून जागतिक तसेच स्थानिक पातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे असे त्यांनी पटवून दिले. त्याकरिता जनजागृती हे महत्वाचे कार्य आहे, जे तुम्ही आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून करत आहात असे म्हणून तिने सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यानंतर झालेल्या बक्षिस वितरण कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष, मा. खासदार सुप्रियाताई सुळे या आवर्जून उपस्थित राहिल्या होत्या. सर्वात प्रथम या प्रकल्पात उल्लेखनीय कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार झाला. विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून सोलर पॅनल देण्यात आले. त्यानंतर प्रकल्पात सहभागी सर्व शिक्षकांचाही सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सर्व सहभागी शाळांना जलसंवर्धन,

वृक्षारोपण, कचरा व्यवस्थापन, जगजागृती, जैवविविधता अशा विविध विषयातील सर्वोत्कृष्ट उपक्रम राबविल्याबद्दल प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्हे देण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभ झाल्यानंतर परिषदेच्या प्रमुख पाहुण्या मा. खासदार सुप्रिया सुळे यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात ताईनी प्रत्येक शाळांमधील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. ताईनी प्रतिष्ठानच्या गच्चीवरही औषधी वनस्पतींची लागवड व्हावी अशी इच्छा जाहीर केली. या प्रकल्पांतर्गत राबविले गेलेले उपक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या पोर्टलवर सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही टाकावेत असे आवाहनही त्यांनी केले. स्वीडनमधील क्लायमेट ॲक्शन या संस्थेच्या सदस्या श्रीमती कारीन आणि फ्युचर अर्थ, स्वीडनचे श्री. रिकार्ड यांच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला आणि त्यांच्या देशाने पर्यावरण संवर्धनात घेतलेल्या आघाडीबद्दल अभिनंदन केले. अखेरीस प्रकल्पात सहभागी शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे त्यांनी मनापासून कौतुक केले, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. बदलापूरचे नगरसेवक श्री आशिष दामले यांनी आभार प्रदर्शन केले. त्याने हवामान बदल विषयक विद्यार्थ्यांच्या परिषदेचा समारोप झाला. या परिषदेचे सूत्रसंचालन ‘सृष्टीज्ञान’ च्या प्रकल्प संघटक श्रीमती संगीता खरात यांनी केले. या संपूर्ण परिषदेच्या आयोजनात प्रतिष्ठानचे संयोजक दत्ता बाळसराफ यांनी मार्गदर्शन केले. तसेच सृष्टीज्ञानचे कार्यकर्ते प्रशांत शिंदे, श्रीमती ज्योती खोपकर आणि कुणाल अणेराव यांनी परिषद यशस्वी व्हावी याकरिता विशेष परिश्रम घेतले.

९.२ **जानेवारी २०१७ :** मुलांचे हवामान अध्ययन केंद्र या प्रकल्पांतर्गत प्रकल्पात सहभागी मुंबई तसेच बदलापूर येथील शाळांमध्ये ‘हवामान बदल आणि वनस्पती’ या विषयावर सत्रे घेण्यात आली. आपले जीवनचक्र पूर्ण करत असताना वनस्पती विविध बदलांद्वारे बदलत असलेल्या हवामानबद्दलही सांगत असतात. तापमान, हवेतील आर्द्रता, पावसाचे प्रमाण तसेच कालावधी यासारख्या अनेक घटकांचा वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होत असतो. त्यामुळे जर एखाद्या वृक्षाचे दररोज नियमितपणे निरीक्षण केले तर त्यामधून आपल्याला बदलणा-या हवामानाचा अंदाज येऊ शकतो. वृक्ष हे हवामान बदलाचे निदर्शक आहेत म्हणूनच प्रकल्पात सहभागी विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरातील विविध वृक्षांचे निरीक्षण करण्याचा उपक्रम देण्यात आला. त्याचप्रमाणे वनस्पतींची वाढ नेमकी कशी होते, बिया कशा रुजतात यांचे निरीक्षण करता यावे यासाठी प्लास्टीकच्या ग्लासमध्ये टिश्यू पेपर ओला करुन त्यात बिया कशा रुजवाव्यात याची प्रात्यक्षिक दाखविण्यात आलं. मुंबईतील पाच शाळा आणि तलासरी येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या शाळांमध्ये संगीता खरात यांनी हे उपक्रम राबविले. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानच्या बदलापूर विभागात प्रियांका दामले यांच्या पुढाकाराने बदलापूर मध्ये दोन शाळांमध्ये उपक्रमांस सुरुवात करण्यात आली.

## ९.४ वाहतूक सुरक्षा अभियान :-

या वर्षीच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी एक लाख किलामीटर नवीन महामार्ग निर्माण करण्याची घोषणा केली आहे. नव्या आधुनिक भारताला त्याची आवश्यकता आहेच. दररोज सतत नवनवीन गतिमान वाहने रस्त्यावर येत आहेत. जीवनाची एकूणच गती वाढत असताना रस्त्यावरील अपघातांची संख्या त्याहून अधिक गतीने वाढत आहे. रस्त्यावरील मृत्यूचे तांडव सुरुच आहे. अगदी रोजच नव्हे तर दर तासाला ते सुरु आहे. अगदी साध्या सुध्या गोष्टी समाजात सगळयांचे लक्ष वेधून घेत असतांना हा एवढा गंभीर विषय दुर्लक्षित का राहतो याची खंत वाटल्यावाचून राहत नाही. दरवर्षी भारतात लक्षावधी आणि महाराष्ट्रात हजारो कुटुंबे आपली जीवा भावाची व्यक्ती अशा अपघातात गमावून दु:खाचे वाटेकरी होत असतात. एक क्षणात त्यांचे भविष्य उद्वस्त होऊन जाते. मात्र हे सर्व जणू काही निसर्गाचा प्रकोप आहे असे समजून आपण वागत असतो. खरं तर निसर्गाची अवकृपा अशी रोज होत नाही. तरीही आपण हा जीवघेणा खेळ शांतपणे पाहत राहतो. एका किल्लारीच्या भूकंपात जेवढी माणसं आपण गमावली त्याहून जास्त बळी दरवर्षी महाराष्ट्रातील रस्त्यांवर आपणा सर्वांच्या समोर जात असतात. महाराष्ट्रातील रस्त्यांवर दरवर्षी

जवळपास ७० हजार अपघातात सुमारे १२ हजारांहून अधिक मृत्यू आणि ४० हजारांहून अधिक माणसे जखमी होत असतात. जखमींमधील जवळपास निम्मे लोक कायमचे अपंग होऊन बसतात. २०१४ या वर्षात रस्ते अपघातातील बळींची संख्या १४ हजारांवर पोहचली आहे तर देशपातळीवर हीच अपघातांची संख्या ३.५ लाखांवर असून त्यात जवळ जवळ १ लक्ष ४० हजार मृत्यू आणि सुमारे ५ लक्ष लोक जखमी होत असतात. या प्रकारे आपला देश या अपघातांची जबरदस्त किंमत मोजत आहे.

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईची विभागीय केंद्रे :-

## १०.१ पुणे विभागीय केंद्र :-

१.१ मा. राम प्रधान, विश्वस्त यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई यांनी आपल्या शासकीय सेवेमधील अनुभवावर आधारित Beyound Expectations हा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचे पुणे येथे प्रकाशन समारंभ पुणे केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर यांचे पुढाकाराने व विश्वकर्मा प्रकाशनाचे सहकार्याने एस. एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशनचे सभागृहात दि. ३१.५.२०१६ रोजी पार पडला. सदर ग्रंथाचे प्रकाशन डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक श्री. अंकुश काकडे यांनी केले. विश्वकर्मा प्रकाशनाचे श्री. भरत अगरवाल यांनी आपले विचार मांडले. पुस्तकाचे परीक्षण प्रा. सुहास पळशीकर यांनी केले. सर्व वक्त्यांच्या विचारांचा परामर्श प्रा. राम प्रधान यांनी घेतला. त्यानंतर विश्वकर्मा प्रकाशनतर्फे आभार प्रदर्शन होवून कार्यक्रमाचा समारोप झाला.

१.२ **वारकरी सेवा** :- दरवर्षीप्रमाणे दि. ३० जून २०१६ रोजी संत श्री ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळयानिमित्त पुण्यनगरीत आलेल्या वारक-यांसाठी, उपीट, जिलेबी, बिस्कीट चहा असा अल्पोहार वाटण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याचा फायदा हजारो वारक-यांनी घेतला. त्याला जोडूनच रंगिलदास सुरतवाला ट्रस्टचे सहकार्याने ज्यांना वाचता येत असेल त्यांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. त्यासाठी अनेक डॉक्टरांचे सहाय्य घेण्यात आले व जरुरीनुसार वारक-यांना नंबरचे चष्मे व गॉगलचे वाटप करण्यात आले. तसेच गरजू वारक-यांना श्री. श्रीकांत मणियार यांनी औषधे वाटली. त्याचा फायदा काहीशे लोकांनी घेतला. हा कार्यक्रम तिरंगा भवन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरा समोर, पुणे २ येथे घेण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन श्री. अजित निंबाळकर, शांतीलाल सुरतवाला व अंकुश काकडे यांनी केले. त्यासाठी सर्वश्री जगमोहन व दिपेश सुरतवाला, गणेश चव्हाण, तापकीर, चव्हाण, सिन्नरकर, कांबळे, घोडनदीवाला, शेख, सुराणा, शमा, देशमुख, पाटील, परदेशी इत्यादी कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

१.३ **'राजीव व सोनीया यांच्या सहवासात' या पुस्तकाचे प्रकाशन** :- मा. राम प्रधान, विश्वस्त यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई यांनी आपल्या शासकीय सेवेमधील अनुभवावर आधारित 'राजीव व सोनीया यांच्या सहवावात' हा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचे पुणे केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर साहेब यांचे पुढाकाराने या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ श्री. सुशीलकुमार शिंदे माजी गृहमंत्री, भारत सरकार यांचे हस्ते आणि श्री. राजीव खांडेकर, संपादक एबीपी माझा, श्री. लक्ष्मीकांत देशमुख, माजी सनदी अधिकारी, श्रीमती विनया खापर्डीकर, राजहंस प्रकाशन यांचे प्रमुख उपस्थितीत एस. एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशनचे सभागृहात दि. १४.१०.२०१६ रोजी पार पडला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अंकुश काकडे, सचिव विभागीय केंद्र पुणे यांनी केले व श्री. शांतीलाल सुरतवाला, कोषाध्यक्ष, विभागीय केंद्र पुणे यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाचा समारोप झाला.

१.४ **दिवाळी पहाट** :- दि. ३०.१०.२०१६ रोजी पुणे केंद्राचा सालाबादप्रमाणे दिवाळी पहाट कार्यक्रम झाला. या वर्षी दिवाळी पहाट पुरस्कार, संगीत क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल श्री. श्रीधर फडके यांना श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे व प्रशांत जगताप, महापौर, पुणे यांचे हस्ते देण्यात आला. दिवाळी पहाट कार्यक्रमात श्री. श्रीधर फडके यांनी जुन्या

भावगीतांचा कार्यक्रम श्री. जयंत नगरकर व सहकारी यांचा नगारा वादन व जुगलबंदी तसेच कु. आर्य काकडे यांचा एकांकिका व सालो डान्स कार्यक्रम झाला. सदरहू कार्यक्रमास १००० ते १२०० नागरिक उपस्थित होते.

## १०.२ विभागीय केंद्र कराड :-

२.१ **वेणूताई चव्हाण पुण्यतिथी (३३) स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ३३ वी पुण्यतिथी - दि. १ जून २०१६** :- दि. १.६.२०१६ रोजी सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टमध्ये भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. संस्कृती मंच कराड प्रस्तुत कल्याणी पांडे यांची नाटयसंगीत व अभंगाची सुरेल मैफील सादर करण्यात आली. यासाठी साथसंगत तबला - विवेक भालेराव, पखवाज - अविनाश मोगिल, संवादिनी - अनंत जोशी, टाळ - रविंद्र पंडित या कलाकारांची साथ होती. विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष मा. आमदार बाळासाहेब पाटील त्याचप्रमाणे सहयाद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, कराड नगर पालिका अध्यक्ष, नगरसेवक व मा. अशोकराव गणपतराव चव्हाण (मुंबई) आवर्जून उपस्थित होते. कराड शहरात संगितातले (शास्त्रीय) अनेक जाणकार आहेत. १ जूनच्या संगीत कार्यक्रमाला सर्वजण आवर्जून उपस्थित असतात. संस्कृती मंच, कराडचे सक्रीय सहकार्य या कार्यक्रमासाठी असते. श्री. विलास ताम्हणकर व त्यांचे सर्व कुटुंबीय यांचे सहकार्य १ जूनच्या कार्यक्रमासाठी नेहमीच असते. कराडमधील नागरिकांना शास्त्रीय संगीताची मेजवानीच स्व. सौ. वेणूताईंच्या पुण्यतिथीनिमित्त प्रत्येक वर्षी १ जूनला दिली जाते. या वर्षीचा कल्याणी पांडे साळुंखे (मुंबई) यांचा संस्मरणीय कार्यक्रम झाला.

२.२ **ति. विठामाता पुण्यतिथी - दि. १८ ऑगस्ट २०१६** :- ति. विठामाता स्व. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांच्या मातोश्री स्व. ति. विठामाता यांची पुण्यतिथी १८ ऑगस्टला प्रत्येक वर्षी आवर्जून साजरी केली जाते. स्व. यशवंतरावांचे ति. विठामातांच्यावर फार मोठी श्रध्दा होती. स्व. यशवंतरावांच्या जडणघडणीत ति. विठामातांचा फार मोठा हात होता. स्व. यशवंतराव मातृभक्त होते. स्वर्गीय विठामातांच्या स्वरचित ओव्या संस्मरणीय आहेत. सौ. वेणूताईनी या ओव्या लिहून ठेवल्या आहेत. प्रत्येक वर्षी १८ ऑगस्ट हा ति. विठामातांचा स्मृतिदिन विरंगुळा व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टमध्ये साजरा केला जातो. विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. आमदार बाळासाहेब पाटील यांनी विरंगुळयात व सौ. वेणूताई स्मारकातील ति. विठामातांच्या फोटोला पुष्पहार समर्पित करुन श्रध्दांजली वाहिली. श्री. मोहनराव डकरे, सचिव व सर्व कर्मचारी वर्गानेही आपली आदरांजली वाहिली. विठामाता विद्यालयातही श्रध्दांजली वाहण्याचा भावपूर्ण कार्यक्रम झाला.

२.३ **सौ. सुप्रिया सुळे, कार्याध्यक्षा, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई सदिच्छा भेट दि. १३.९.२०१६** :- सौ. सुप्रियाताई सुळे, कार्याध्यक्षा, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी मंगळवार दि. १३.९.२०१६ रोजी दुपारी ३ वाजता श्री. दत्ता बाळसराफ आणि सातारा जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते यांच्यासह यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांच्या विरंगुळयातील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. मा. यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या जीवनातील सर्व माहिती सौ. ताईना दाखविण्यात आली. मा. यशवंतरावांच्या जीवनातील नानाविध साहित्य सौ. ताईना दाखविण्यात आले.

२.४ **मा. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांची ३२ वी पुण्यतिथी २५ नोव्हेंबर २०१६** :- मा. यशवंतरावजी चव्हाण यांची ३२ वी पुण्यतिथी २५ नोव्हेंबर २०१६ रोजी भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. 'विरंगुळा' या साहेबांच्या निवासस्थानी त्यांच्या अतिभव्य फोटोला श्री. अशोकराव गणपतराव चव्हाण (साहेबांचे पुतणे) यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मधील स्व. यशवंतराव व सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळयाला मा. आमदार बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आले. विभागीय केंद्र पुणे यांच्या वतीने स्व. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याबद्दल

यशस्वी स्पर्धकांना विरंगुळयात पत्रांद्वारे व फोनवरुन आमंत्रित करण्यात आले होते. त्यांना पुणे केंद्रामार्फत देण्यात आलेली रोख रक्कम व पुस्तकाचे अनावरण बक्षिस हे श्री. अशोकराव चव्हाण व सचिव, श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते देण्यात आले. सर्वानाच मोठे समाधान वाटले.

मा. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांच्या पुण्यतिथी दिवशीच स्व. सौ. वेणूताई स्मृति सदनात सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची वार्षिक सभा घेण्यात येते. या सभेमध्ये मा. कल्लाप्पाआण्णा आवाडे (इचलकरंजी), श्री. सुनिल पवार (सांगली), मा. विक्रमसिंह पाटणकर (पाटण), श्री. राजेश पाटील (जनता बँक, कराड), मा. नंदकुमार बटाणे (कराड शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष), मा. आमदार बाळासाहेब पाटील, चार्टर्ड अकाऊटंट पी. एल. कुलकर्णी, कराड पंचायत समितीचे अध्यक्ष देवराज पाटील, सहयाद्री सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक या सर्वांनी मा. यशवंतरावजी तथा सौ. वेणूताई यांना पुष्पहार घालून अभिवादन केले.

दुपारी ४ वाजता यशवंतरावांच्या भव्य फोटोची चित्ररथातून सौ. वेणूताई ट्रस्ट ते स्व. यशवंतरावजी समाधी स्थळ (प्रितीसंगम) मिरवणूक कराडमधील मुख्य रस्त्यावरुन काढण्यात आली. 'यशवंतरावजी चव्हाणसाहेब अमर रहे' या घोषणेने शहर दुमदुमून गेले. यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, कराड व सौ. वेणूताई कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापिका बंधूभगिनी आवर्जून उपस्थित होत्या. समाधी स्थळावर प्रतिष्ठानचे सचिव मोहनराव डकरे त्याचप्रमाणे श्री. मुकुंदरावजी कुलकर्णी (धनी) यांची भाषणे झाली. कार्यक्रमाची सांगता झाली.

२.५ **सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ९१ वी जयंती दि. २.२.२०१७ :-** स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ९१ वी जयंती दि. २.२.२०१७ रोजी विरंगुळा बंगला, विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड या ठिकाणी साजरी करण्यात आली. विरंगुळयातील स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई यांच्या फोटोला सहयाद्री व्याघ्र प्रकल्प (सातारा) च्या उपसंचालक डॉ. सौ. विनिता व्यास तसेच त्यांचे पती श्री. भारत हाडा (आय.ए.एस. अधिकारी) यांनी पुष्पहार अर्पण केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष सन्माननीय आमदार बाळासाहेब पाटील यांनीही सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टमधील स्व. सौ. वेणूताई चव्हाण व मा. यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार घातले. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट मधील अभ्यासिकेतील विद्यार्थी, विद्यार्थीनी हजर होते. अत्यंत भावपूर्ण वातावरणात स्व. सौ. वेणूताई यांच्या ९१ व्या जयंतीचा कार्यक्रम झाला.

२.६ **मा. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांचा १०४ वा जयंती सोहळा - दि. १२.३.२०१७ :-** मा. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांचा १०४ वा जयंती सोहळा दि. १२.३.२०१७ रोजी फार मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. दि. १२.३.२०१७ रोजी विरंगुळा या साहेबांच्या निवासस्थानी स्व. यशवंतरावजी चव्हाणांचे पुतणे अशोकराव गणपतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते यशवंतरावजींच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. त्यानंतर स्व. सौ. वेणूताई चव्हाण स्मारकातील स्व. यशवंतरावजी तथा स्व. सौ. वेणूताई यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्यात आले. सौ. वेणूताई स्मारकाच्या समोरुन भव्य व सजविलेल्या रथात स्व. यशवंतरावांची प्रतिमा ठेवण्यात आली. यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स आणि सौ. वेणूताई चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य तथा प्राध्यापक, प्राध्यापिका, बंधूभगिनी, कराडमधील ज्येष्ठ नागरिक यांच्यासह अतिभव्य पदयात्रा काढण्यात आली. विजय चौक, दत्त चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा ते आझाद चौक, नेहरु चौक, चाडी चौक ते कृष्णा नदीच्या पवित्र संगमावरील यशवंतरावाच्या समाधी स्थळापर्यंत भव्य पदयात्रा काढण्यात आली. पी. डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने कराड शहरातील सर्व माध्यमिक शाळेतील १२००० विद्यार्थ्यांचे समूह गान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान समोरील भव्य प्रांगणात झाले. कराड शहरातील व सातारा जिल्हयातील मान्यवर नेते व आमदार बाळासाहेब पाटील आवर्जून उपस्थित होते. समाधीवर अनेक मान्यवरांनी पुष्पचक्र, पुष्पहार व फुले अर्पण केली. विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व कर्मचारी या पदयात्रेत सामील झाले होते. सातारा जिल्हा परिषद

अध्यक्ष, पंचायत समिती कराड अध्यक्ष व राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर समाधीस्थळी आवर्जून उपस्थित होते. स्व. यशवंतरावजी चव्हाणांचा जयंती सोहळा संस्मरणीय झाला.

## १०.३. विभागीय केंद्र नागपूर :-

३.१ **चिंतनसत्र : भयमुक्त अभिव्यक्ती - दि. ५ एप्रिल २०१६ :-** केंद्राच्या वतीने मंगळवार दि. ५ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नागपूर येथे भयमुक्त अभिव्यक्ती या चिंतनसत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मा. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, श्री. नागेश चौधरी, श्रीमती लिलाताई चितळे, मा. डॉ. श्रीमती सीमा साखरे, श्री. वीरा साथीदार, श्री. उमेशबाबू चौबे, मा. डॉ. हरीश धुरट, श्री. हरीश देशमुख, श्री. विलास भोंगाडे या मान्यवरांनी आपले विचार प्रकट केले आणि चर्चा घडवून आणली. या विचारमंथनाला श्रोत्यांनी भरभरुन दाद दिली.

३.२ **खुले कविसंमेलन - दि. ७ एप्रिल, २०१६ :-** विभागीय केंद्र नागपूर व स्व. कवयित्री सौ. अपर्णा सहस्त्रबुध्दे स्मृती समिती यांच्या संयुक्त वतीने गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला सत्कार व खुल्या कविसंमेलनाचे आयोजन दि. ७ एप्रिल २०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता नागपूर येथे मा. श्री. प्रसन्न शेंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले. याप्रसंगी स्वामी विवेकानंद मेडीकल मिशन खापरी येथील निवासी डॉ. जितेश चव्हाण यांचा व श्री. मोहन परमा कोटी यांचा सत्कार मा. मेजर हेमंत जकाते यांच्या हस्ते समाजसेविका मा. इंदूताई पीसे यांचा सत्कार मा. सुलभाताई जकाते यांच्या हस्ते तर श्री. राजेश पाणूरकर यांचा सत्कार डॉ. देवीदास इंदापवार यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या कविसंमेलनाप्रसंगी उपस्थित कविंनी आपल्या उत्कृष्ट कविता सादर केल्या.

३.३ **चार पुस्तकांचे प्रकाशन - दि. ८ एप्रिल, २०१६ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सौ. मनीषा साधू लिखित 'पुरुषांच्या देशात' सौदी अरेबियावर आधारित (कादंबरी), 'सटवाई' व 'मुक्त मी' हे मराठी कवितासंग्रह व 'सावलां चाँद' हिंदी कवितासंग्रह या चार पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन शुक्रवार दि. ८ एप्रिल २०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता नागपूर येथे करण्यात आले. हा प्रकाशन सोहळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते व त्यांच्याच अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ कादंबरीकार मा. डॉ. रवींद्र शोभणे यांनी पुरुषांच्या देशात या कादंबरीवर भाष्य केले तर मा. श्री. अजय देशपांडे यांनी कवितासंग्रहावर आपले विचार प्रकट केले. श्रोत्यांनी कार्यक्रमाला भरभरुन प्रतिसाद दिला.

३.४ **दलित गीतिकाव्य - लोकार्पण समारंभ :-** विभागीय केंद्र नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूरच्या संयुक्त वतीने मराठी काव्य क्षेत्रात आाली स्वतंत्र नाममुद्रा उमटविणा-या दलित कवींच्या गीति-काव्याचा चिकित्सक अभ्यास डॉ. शालिनी तेलरांधे यांच्या 'दलित गीतिकाव्य' या ग्रंथात करण्यात आला. एका अलक्षित विषयावरील या मौलिक ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन बुधवार दि. ८ जून, २०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता नागपूर येथे करण्यात आले.

३.५ **डॉ. शशीकला वंजारी - सत्कार समारंभ - दि. १० जुलै २०१६ :- मा. डॉ. शशीकला वंजारी** यांची मुंबई एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सत्कार समारोहाचे आयोजन रविवार दि. १० जुलै २०१६ रोजी नागपूर येथे करण्यात आले. हा सत्कार सोहळा संस्कृतच्या अभ्यासक व सामाजिक क्षेत्रातील प्रसिध्द अग्रणी मा. डॉ. रुपाताई बोधी यांच्या शुभहस्ते व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. सिध्दार्थ विनायक काणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु मा. डॉ. शरद निंबाळकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

३.६ **मुक्तचर्चा - दि. ३० जुलै २०१६ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने शिक्षक आमदार श्री. नागो गाणार यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. ३० जुलै २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता किर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर सभागृह नागपूर येथे 'आजच्या शिक्षण व्यवस्थेतील अपप्रवृत्तीला जबाबदार कोण ?' या विषयावरील मुक्तचर्चेचे आयोजन करण्यात आले.

३.७ **डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार सोहळा २०१६ :-** विदर्भातील ज्येष्ठ कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा पुरस्कार यंदा 'अज्ञातवासातील कवी' म्हणून प्रसिध्द पराङ्.मुख असलेले, उत्तमोत्तम काव्यरचना करणारे ज्येष्ठ कवी ॲड सुरेश आजनकर, वरुड, जिल्हा अमरावती यांना सुलभाताईंच्या स्मृतिदिनी रविवार दि. ३१ जुलै २०१६ रोजी सायंकाळी ५ वाजता नागपूर येथे कृतज्ञतापूर्वक प्रदान करण्यात आला. हा सत्कार सोहळा विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश मा. श्री. किशोर रोही यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ कवी मा. श्री. किशोर पाठक हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्याच अध्यक्षतेखाली डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती बहुभाषिक कविसंमेलन झाले. याप्रसंगी हिंदी, उर्दू व मराठीतील मान्यवर कवी डॉ. सागर खादीवाला (हिंदी), जमील अंसारी (हिंदी), डॉ. मोहम्मद असदुल्लाह (उर्दू), तौहीदुल हक (उर्दू) मनीषा साधू (मराठी), लोकनाथ यशवंत (मराठी) सहभागी झाले.

३.८ **'आजचा सुधारक' परिसंवाद व मतभिन्नता विशेषांकाचे प्रकाशन दि. २१ ऑगस्ट २०१६ :-** विभागीय केंद्र नागपूर आणि आजचा सुधारक यांच्या संयुक्त विद्यमाने 'आजचा सुधारक' च्या मतभिन्नता विशेषांकाचे प्रकाशन व 'आजच्या भारतीय समाजात वेगळे मत मांडण्याचा अवकाश आक्रसत चालला आहे का ?' हया विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ख्यातनाम अर्थतज्ज्ञ प्रा. श्रीनिवास खांदेवाले आणि वक्ते ज्येष्ठ संपादक श्री. ल. त्र्यं. जोशी, तरुण पत्रकार श्री. जयदीप हार्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि. २१ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

३.९ **प्रकाशन समारंभ - दि. ४ सप्टेंबर २०१६ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सुप्रसिध्द कवयित्री सुचित्रा कातरकर यांच्या 'तुमबिन तुझ्याविना' व स्व. मधुकर कातरकर यांच्यावरील हिंदी मराठी हायकु संग्रह 'सांजसावळी' (काव्यसंग्रह) भाग — २ या दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन रविवार दि. ४ सप्टेंबर २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नागपूर येथे करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ समीक्षक व विचारवंत मा. डॉ. अक्षयकुमार काळे व ज्येष्ठ पत्रकार श्री. बाळासाहेब कुळकर्णी हे प्रमुख वक्ते म्हणून तसेच ज्येष्ठ साहित्यिक श्री. श्यामकांत कुळकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात स्वर साधनाचे अध्यक्ष श्री. श्याम देशपांडे व ज्येष्ठ निवेदक श्री. प्रकाश एदलाबादकर यांचा सत्कार करण्यात आला. प्रकाशनानंतर कविवर्य भा. रा. तांबे यांच्या निवडक सुमधुर गीतांवर आधारीत कार्यक्रम 'मधुघट' चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची संकल्पना सुचित्रा कातरकर, निर्मिती प्रा. पद्मजा सिन्हा, निवेदन श्री. प्रकाश एदलाबादकर यांचे होते. याप्रसंगी अश्विनी लुले, विजय देशपांडे, प्रा. पद्मजा सिन्हा, ऋचा येनूरकर, निसर्गराज आणि सुचित्रा कातरकर हे गायक कलाकार तसेच विजय देशपांडे, परिमल जोशी, विजय ढोक, स्मिता देशपांडे हे वादक कलाकार उपस्थित होते.

३.१० **सभेचे आयोजन - दि. १२ सप्टेंबर २०१६ :** नागपूर विभागाच्या वतीने केंद्राच्या कार्यक्रमासंदर्भात तसेच पुढील उपक्रमाच्या संदर्भात विचारविनीमय करण्यासाठी सोमवार दि. १२ सप्टेंबर २०१६ रोजी नागपूर येथे श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले.

३.११ **'विंदांची त्रिपदी' - दि. १६ व १७ सप्टेंबर २०१६ :** नव्या पिढीत काव्याची गोडी निर्माण व्हावी, जगण्याची उमेद आणि नवी दृष्टी मिळावी, रसिकांना मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कृत कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेतील तत्तवचिंतन, जीवनदृष्टी कळावी आणि रसगहण अधिक चांगले व्हावे या उद्देशाने विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दि. १६ व १७ सप्टेंबर २०१६ रोजी 'विंदांची त्रिपदी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विंदांच्या कवितेतील 'त्रिपदी' आनंद करंदीकर आणि सरिता आवाड यांनी वाचन-विवेचनाच्या व दृकश्राव्य माध्यमातून सादर केल्या. दि. १६ सप्टेंबर २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या

सहकार्याने अमरावती मार्गावरील विद्यापीठ परिसरातील 'ग्रामगीता भवन' येथे तसेच दि. १७ सप्टेंबर २०१६ रोजी सकाळी ९.३० वाजता कॉंग्रेसनगर मधील धनवटे महाविद्यालयातील जनसंवाद विभागाच्या वतीने सेमिनार हॉलमध्ये 'विंदांची त्रिपदी' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

३.१२ **सत्कार समारंभ - दि. २८ सप्टेंबर २०१६ :** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सेन्सॉर बोर्ड) चे सदस्य म्हणून नागपूरातील तीन व्यक्तींची निवड झाल्याबद्दल मा. सौ. माधुरी अशिरगडे, मा. सौ. प्रगती मानकर व मा. श्री. संजय भाकरे यांच्या सत्काराचा कार्यक्रम बुधवार दि. २८ सप्टेंबर २०१६ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता आयोजितक करण्यात आला. हा सत्कार समारंभ विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेच्या नागपूर शाखेचे अध्यक्ष मा. श्री. प्रफुल्ल फरकसे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे ज्येष्ठ समीक्षक मा. डॉ. अक्षयकुमार काळे उपस्थित होते.

३.१३ **स्व. भा. ल. भोळे स्मृती व्याख्यानमाला - दि. ३० सप्टेंबर २०१६ :** विभागीय केंद्र नागपूर, आधार बहुउद्देशीय संस्था, नागपूर व महात्मा गांधी स्मारक निधीच्या संयुक्त विद्यमाने 'विवेकवादी जगणे खरंच इतके कठीण आहे का ?' या विषयावर अंधश्रध्दा निर्मूलन समिती, दापोलीचे कार्यकर्ते मा. मुक्ता दाभोळकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन दि. ३० सप्टेंबर २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता नागपूर येथे करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी अध्यक्षस्थानी होते.

३.१४ **विवेकानंदांची खरी ओळख : व्याख्यान - दि. १ ऑक्टोबर २०१६ :** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दि. १ ऑक्टोबर २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नागपूर येथे 'विवेकानंदांची खरी ओळख' या विषयावर अतिशय वस्तुनिष्ठ व वास्तव मांडणी करणारे महाराष्ट्रातील विचारवंत व लेखक मा. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. गिरीश गांधी, अध्यक्ष, विभागीय केंद्र नागपूर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

३.१५ **'धुक्यात हरवली वाट' कादंबरी प्रकाशन समारंभ - दि. २ ऑक्टोबर २०१६ :** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने लेखिका मा. प्रा. विजया मारोतकर यांच्या 'धुक्यात हरवली वाट' या कादंबरीचा प्रकाशन समारंभ रविवार दि. २ ऑक्टोबर २०१६ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूर केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते व कादंबरीचा प्रकाशन समारंभ सुप्रसिध्द लेखिका मा. सुप्रियाताई अय्यर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून नागपूर नागरिक सहकारी बँक, नागपूरचे अध्यक्ष मा. श्री संजय भेंडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिध्द लेखिका मा. सौ. विजयाताई ब्राम्हणकर उपस्थित होत्या.

३.१६ **एक पहल मुस्लिम भाईयोंके लिए व्याख्यान — दि. ५ ऑक्टोबर २०१६ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दि. ५ ऑक्टोबर २०१६ रोजी नागपूर येथे 'एक पहल मुस्लिम भाईयों के लिए' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मा. सुश्री डॉ. के. बी. करीम, पूर्व निदेशक, इन्स्टिटयूट ऑफ सायन्स तथा आय.ए.एस. कोचिंग सेंटर व श्री. अब्दुल मजीद पारेख, ज्येष्ठ सामाजिक कार्यकत्र्या यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते.

३.१७ **पान, पाणी नि प्रवाह - दि. १४ ऑक्टोबर २०१६ :-** 'स्वतःला फालतू समजण्याची गोष्ट' या पहिल्याच कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेल्या श्री. अवधूत डोंगरे या तरुण पत्रकार व लेखकाची 'पान, पाणी नि प्रवाह' (प्रफुल्लता प्रकाशन, पुणे) ही नवी आगळीवेगळी कादंबरी विभागीय केंद्र नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने या कादंबरीचे प्रकाशन, कादंबरीची चिकित्सा आणि वाचकांची प्रत्यक्ष लेखकभेट असा एक कार्यक्रम दि. १४ ऑक्टोबर २०१६ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते व खेळकर या गाजलेल्या कादंबरीचे लेखक प्रा. रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ आणि सामाजिक कार्यकर्ते व लेख श्री. अमिताभ पावडे हे यांनी 'पान, पाणी नि प्रवाह' या कादंबरीची आस्वादक चिकित्सा केली व कादंबरीचे लेखक श्री. अवधूत डोंगरे

यांनी उपस्थितांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. प्रमोद मुनघाटे, सचिव, विभागीय केंद्र नागपूर यांनी भूषविले.

३.१८ **डॉ. प्रमोद शर्मा सत्कार समारंभ - दि. १६ ऑक्टोबर २०१६ :-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उर्दू विभागाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद शर्मा यांची समन्वयक कला अधिष्ठातापदी निवड झाल्याबद्दल उर्दू विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व विभागीय केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी सकाळी १० वाजता नागपूर येथे मा. डॉ. सिध्दार्थ विनायक काणे, कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या शुभहस्ते हा सत्कार समारंभ संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी तसेच हिंदी साहित्याचे ज्येष्ठ विचारवंत मा. डॉ. ओमप्रकाश मिश्रा हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.

३.१९ **पं. प्रभाकर धाकडे गुरुजी सत्कार समारंभ - दि. २५ ऑक्टोबर २०१६ :-** विभागीय केंद्र, नागपूर आणि कलावैभव, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने सूरमणी पंडित प्रभाकर धाकडे गुरुजी यांच्या ६८ व्या जन्मदिनानिमित्त दि. २५ ऑक्टोबर २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता नागपूर येथे सत्कार समारंभ व सूरमणी पं. प्रभाकर धाकडे यांचा स्वरबध्द नजराणा 'स्वरप्रवाह' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दिलीप डबीर, राष्ट्रीय कीर्तनरत्न कीर्तन कलायोगी होते. तसेच मा. डॉ. नितीन राऊत, माजी गृह राज्यमंत्री मा. डॉ. मिलींद माने, आमदार उत्तर नागपूर, श्री. समीर सराफ, प्रतिष्ठानचे विभागीय उपाध्यक्ष व मा. डॉ. प्रमोद मुनघाटे, केंद्राचे विभागीय सचिव हे उत्सव अतिथी म्हणून उपस्थित होते.

३.२० **स्व. अरुणाताई पवार - चवरे दि. २२ नोव्हेंबर २०१६ :-** विभागीय केंद्र नागपूर व अरुणोदय साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्रख्यात कवयित्री स्व. अरुणाताई पवार - चवरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नवोदितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ दि. २२ नोव्हेंबर २०१६ रोजी नागपूर येथे विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी आकांक्षा प्रकाशनच्या मा. अरुणा सबाने हया प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

३.२१ **यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार वितरण समारंभ – दि. २५ नोव्हेंबर २०१६ :-** २५ नोव्हेंबर ही यशवंतराव चव्हाण यांची ३२ वी पुण्यतिथी. या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने मागील वर्षीपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या व्यक्तीला रोख रु.१५,०००/-, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येते. २०१६ चा पुरस्कार धारणी सारख्या अतिदुर्गम भागात तेथील आदिवासींच्या विकासासाठी कार्य करणारे मा. डॉ. आशिष सातव व डॉ. सौ. कविता सातव यांना देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार सोहळा शुक्रवार दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी नागपूर येथे ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य व पालक मंत्री नागपूर ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते व ज्येष्ठ पत्रकार श्री. मधुकरराव भावे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. राजाभाऊ देशमुख होते. याप्रसंगी पुणे केंद्राच्या वतीने आयोजित 'राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील निबंध स्पर्धेतील विभागीय कार्यक्षेत्रातील शिक्षकाना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र देण्यात आले.

३.२२ **'झलकारी' दोन अंकी हिंदी नाटक – दि. १५ डिसेंबर २०१६ :-** विभागीय केंद्र, नागपूर, विदर्भ गौरव प्रतिष्ठान व राष्ट्रभाषा सभा नागपूर विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'झलकारी' या दोन अंकी हिंदी नाटकाचा शुभारंभ मा. ना. श्री. विनोद तावडे, सांस्कृतिक मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री नागपूर, रा.कॉं.पा. चे अध्यक्ष आ. श्री. सुनील तटकरे, विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे, मा. आ. श्री. हेमंत टकले यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १५ डिसेंबर २०१६ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आला. याप्रसंगी विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते.

३.२३ **सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा - दि. २५ डिसेंबर २०१६** :- विभागीय केंद्र नागपूर, शिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर विभाग व नागपूर महानगरपालिका शिक्षण विभाग रायसोनी ग्रुप व अक्षरभूषण मधुकरराव भाकरे स्मृती प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अक्षरभूषण मधुकरराव भाकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित आंतरशालेय सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा २०१६ पारितोषिक व शिक्षक जीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभ दि. २५ डिसेंबर २०१६ रोजी नागपूर येथे श्री सचिन देशपांडे (कलाकार काहे दिया परदेस), श्री. भाऊ काणे (द्रोणाचार्य पुरस्कार पुरस्कृत) यांच्या शुभहस्ते, महापौर श्री. प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. सुनील रायसोनी, अध्यक्ष रायसोनी ग्रुप, श्री. गोपाल बोहरे, शिक्षण सभापती व मा. श्री. कर्नल ए. बी. गुरुंग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या स्पर्धेतील पारितोषिक विजेते गट अ **वर्ग १ ते ४** प्रथम - श्रीया बिसेन (यशोदा मराठी प्राथमिक), द्वितीय - दीक्षिता मुटे (नवयुग), तृतीय - ईशा मोंढे (विभा गांधी प्राथमिक शाळा), प्रोत्साहनपर - आयुषी मालाधरे (यशोदा), रिया काळे (भवन्स भगवानदास), आंचल चहुके (विभाताई गांधी), सिया माकडे (हिंदू ज्ञानपीठ), स्मिता जनबंधू (श्री सत्यसाई विद्यामंदिर), **वर्ग ५ ते ७** प्रथम - प्राजक्ता मुंडे (पं. बच्छराज व्यास विद्यालय), द्वितीय - सुहानी ढोके (विश्वास प्राथमिक), तृतीय — धनश्री मोटे (जामदार शाळा), प्रोत्साहनपर - मयंत कुळकर्णी (सोमलवार निकालस), प्रिती भौमिक (दीनानाथ), जान्हवी येळणे (भगवानदास पुरोहित), वैष्णवी डोंगरे (मेजर हेमंत जकाते), तनुश्री बावीसकर (श्री सत्यसाई), **वर्ग ८ ते १०** प्रथम - हर्षल तलमले (विश्वास माध्यमिक), द्वितीय — ऐश्वर्या सारडा (स्व. दौलतराव ढवळे विद्यालय), तृतीय — पायल मरसकोल्हे (सिध्देश्वर), प्रोत्साहनपर - साक्षी बाईवार (सोमलवार, रामदास पेठ), निक्की घरडे (श्री दादासाहेब धनवटे नगर विद्यालय), आकांक्षा वैद्य (केशवनगर माध्यमिक), श्रेया चिमणकर (लोकांची शाळा), गणेश ताठे (सी.पी. ॲन्ड बेरार, रविनगर) इ. विद्यार्थ्यांचा समावेश होता.

३.२४ **'कविता में शब्द विन्यास' या विषयावर व्याख्यान - दि. ७ जानेवारी २०१७** :- विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दि. ७ जानेवारी २०१७ रोजी नागपूर येथे 'कविता में शब्द विन्यास' या विषयावरील मा. डॉ. सक्सेना यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कवितांमध्ये शब्दांचा वापर, मात्रांचे नियम, शब्दांचे वजन, उच्चारण या आधारावर मात्रांची स्थिती व लयात्मकता व इतर संबंधित बिंदूवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. सागर खादीवाला होते.

३.२५ **परिसंवाद - दि. २५ फेब्रुवारी २०१७** :- विभागीय केंद्र नागपूर व रसिकराज सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिवनमुक्ती समाधी, आत्महत्या, स्वेच्छा मृत्यू, अवयवदान, देहदान, सामाजिक योगदान' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन दि. २५ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नागपूर येथे करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी समाजसेवक व ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. उमेश चौबे होते. प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा, संत साहित्याचे अभ्यासक मा. डॉ. नारायण निकम, कर्नल सुनील देशपांडे, मा. डॉ. संध्या पवार, ज्येष्ठ कवी मा. मेजन श्री. हेमंत जकाते व प्रख्यात साहित्यिक मा. प्रा. सौ. सुलभा जकाते, डॉ. बळवंत भोयर हे उपस्थित होते. देहदान, अवयवदानातून समाजाचे नव्हे तर देशाचे भले होत असल्याचे डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी सांगितले. उमेश चौबे यांनी अंधश्रध्दा आणि विज्ञान यावर मार्गदर्शन केले. देहदानाबाबतच्या गैरसमजूती दूर होण्याची गरज असल्याचे डॉ. नारायण निकम यांनी सांगितले. डॉ. संध्या पवार, कर्नल सुनील देशपांडे, हेमंत जकाते यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. बळवंत भोयर यांनी केले. संचालन अरुणा भोंड यांनी केले. आभार डॉ. रामेश्वर पाठेकर यांनी मानले.

३.२६ **व्याखान 'यशवंतराव चव्हाण यांचा आजचा महाराष्ट्र' दि. १२ मार्च २०१७** :- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०४ व्या जयंती दिनानिमित्त 'यशवंतराव चव्हाण यांचा आजचा महाराष्ट्र' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन दि. १२ मार्च २०१७ रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले. ज्येष्ठ

पत्रकार मा. श्री मधुकरराव भावे हे प्रमुख वक्ते व अतिथी म्हणून उपस्थित होते व प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत मा. डॉ. वि. स. जोग हे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी माजी मंत्री मा. डॉ. सतीश चतुर्वेदी हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

३.२७ **काव्यग्रंथ प्रकाशन समारंभ 'योगिनींच्या स्वप्न सावल्या' दि. २७ मार्च २०१७ :-** आयुष्याचे अर्धशतक कविता-सृजनाचा काव्यमळा फुलवित राहणारे व्रतस्थ महाकवी सुधाकर गायधनी यांचे 'महावाक्य : समग्र देवदूत' या पहिल्या महाकाव्यानंतर 'योगिनींच्या स्वप्न सावल्या' हे दुसरे महाकाव्य. या काव्यग्रंथाचा प्रकाशन सोहळा विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दि. २७ मार्च २०१७ रोजी सायंकाळी ६ वाजता नागपूर येथे आयोजित करण्यात आला. या महाकाव्याचा प्रकाशन समारंभ मा. डॉ. टी. एम. करडे यांच्या शुभहस्ते व डॉ. वि. स. जोग, सोवियत देश पुरस्काराने सन्मानित साहित्यिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी मा. प्राचार्य मा. दा. गो. काळे, सुप्रसिध्द समीक्षक, शेगाव व कविवर्य संजय बोरुडे, अहमदनगर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

३.२८ **गुढीपाडवा निमित्ताने संगीत संस्था 'भक्ती-भाव' दि. २८ मार्च २०१७ :-** विभागीय केंद्र नागपूर व मो. रफी फॅन्स कल्चरल ऑर्गनायझेशन व महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी नववर्ष गुढीपाडव्यानिमित्त संगीत संध्या 'भक्ती भाव' या कार्यक्रमाचे आयोजन दि. २८ मार्च २०१७ रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले. गायक कलावंत प्रा. विलास डांगे, श्री. विनोद दुबे, वर्षा रामटेके व शीलवंत उपस्थित होते व निवेदन मो. सलीम व सैय्यद शिरीन यांनी केले. याप्रसंगी मा. डॉ. गिरीश गांधी, अध्यक्ष, विभागीय केंद्र नागपूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

३.२९ **सभेचे आयोजन दि. ३० मार्च २०१७ :-** विभागीय केंद्राकडून दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन व्हावे या संदर्भात दि. ३० मार्च २०१७ रोजी विभागीय केंद्राचे कार्यालय, नागपूर येथे दुपारी ४ वाजता विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले.

## १०.४ विभागीय केंद्र कोकण :-

४.१ **शिक्षण कट्टा कार्यक्रम :-** कोकण विभागीय केंद्राचे वतीने देवरुख येथील माध्यमिक विद्यालय ताम्हाने, तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी या शाळेमध्ये दि. ४ एप्रिल, २०१६ रोजी शिक्षण कट्टा कार्यक्रम घेण्यात आला. ताम्हाने पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री. अशोक सप्रे, शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. पाटील, श्री. सप्रे सर तसेच श्री. पाष्टे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, कोणाची संगत करावी, कोणाची करु नये, कोणाशी कसे वागावे याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या चर्चेत सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सनगरे यांनी केले. तसेच लोक विद्यालय तुळसणी, तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथेही दि. १४ एप्रिल २०१६ रोजी शिक्षणकट्टा कार्यक्रम घेण्यात आला.

४.२ **जागतिक वसुंधरा दिन :-** विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरी व रत्नागिरी काजू प्रक्रिया सहकारी संस्था, गवाणे, तालुका लांजा यांचे संयुक्त विद्यमाने २२ एप्रिल २०१६ रोजी 'जागतिक वसुंधरा दिन' कार्यक्रम संपन्न झाला. रत्नागिरी काजू प्रक्रिया सहकारी संस्थेच्या सभागृहामध्ये दि. २२ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ४ वाजता उपस्थित मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन करुन व स्व. यशवंतराव चव्हाणसाहेबांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. प्रकाश काणे यांनी केले. 'वसुंधरा दिन' का साजरा केला जातो हे सांगताना त्यांनी वसुंधरा म्हणजे पृथ्वीचे महत्व उपस्थितांना समजावून सांगितले. आज पर्यावरणाचा, वनाचा -हास होत आहे. आपणच आपल्या सृष्टीचा विकास केला पाहिजे. आपलं शरीर जगवण्या करता जसं जेवण महत्वाचं आहे तसं सृष्टी जगवण्याकरिता वसुंधरेचं संरक्षण करणं गरजेचं आहे. लांजा महाविद्यालयाचे प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विक्रांत बेर्डे यांनी 'मधमाशींचा पर्यावरणातील सहभाग' या विषयावर स्लाईड शो द्वारे माहिती दिली. प्रा. बेर्डे

हे सोसायटी फॉर इनव्हॉरमेंट अॅन्ड बायोडावर्सिटी कॉन्झर्वेशन, रत्नागिरी या संस्थेचे अध्यक्ष असून ते पाच वर्षे काम करीत आहेत. प्रा. बेर्डे यांनी मधमाशी पर्यावरणासाठी कशाप्रकारे महत्वाच्या आहेत हे सांगितले. मधमाशा या आग्याची माशी, सातेरी माशी व फुलोरा माशी अशा तीन प्रकारच्या असून त्यांच्यापासून मिळणा-या मधाचे प्रमाण, मध तयार करण्याची प्रक्रिया, त्यांचे कार्य, मधमाशींच्या पोळयांची वैशिष्टये, मधमाशीच्या विषाचा कशाप्रकारे औषधी वापर केला जातो, पोळयापासून मिळणारे मेण, त्यांचा पर्यावरणासाठी होणारा उपयोग या सर्वांची स्लाईड शो द्वारे सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे स्वतःची जमीन नसणारे शेतकरीही मधमाशींचे शेतीमधील पेटीद्वारे पालन करुन सहाय्यक व्यवसाय म्हणून मधाचे उत्पादन कसे घेऊ शकतात हे सांगितले. उपस्थितांनी आपल्या शंका विचारुन आणखी माहिती करुन घेतली. जिल्हा समिती सदस्या श्रीमती प्राची शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. पुष्पगुच्छ, श्रीफळ व 'गीतारहस्य शताब्दी गौरव' हे पुस्तक देवून मा. प्रा. डॉ. विक्रांत बेर्डे यांचे आभार मानण्यात आले.

४.३ **रायगड जिल्हा :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ वी जयंती निमित्त कोकण विभागीय केंद्र यांचे वतीने दि. ५ एप्रिल २०१६ रोजी नवीन पनवेल येथे आयोजित 'भारतीय संविधानचा मूळ गाभा रोहित वेमुला ते कन्हैया' आदी विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यानास प्रमुख व्याख्याते मा. श्री. सुरेश सावंत लाभले. सदर व्याख्यानास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. उमेश गायकवाड (मागास वर्गीय व महिला बालकल्याण समिती, कर्जत नगर परिषद) तसेच मा. घुमे (बालाजी शिक्षण संस्था संस्थापक) व सामाजिक कार्यकर्ते दपिकजी पवार, सुहास कुर्ले, माजी सरपंच संजय दिवेकर आदि मान्यवर उपथित होते. व्याख्यानाला युवकांचा चांगला प्रतिसाद लाभला. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक सहभागी होते.

४.४ **ठाणे जिल्हा — विज्ञानगंगा कार्यक्रम अहवाल :-** बदलापूर पूर्वेला असलेल्या काटदरे हॉलमध्ये विभागीय केंद्र कोकण, मराठी विज्ञान परिषद व युवाराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता 'विज्ञानगंगा' या कार्यक्रमांतर्गत मा. शुभदा वक्टे यांनी 'गुरुत्व लहरी' या सखोल विषयाचा आढावा घेतला. सौ. प्रियांका आशिष दामले, श्री. आशिष गोळे, सौ. तनुजा गोळे, श्रीमती वंदना साबळे, श्री. राम लिमये, श्री. सचिन पाटील यांची कार्यक्रमाला उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. विश्वनाथ पाटील यांनी केले. कॅ. आशिष दामले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात सर्व वयोगटातील श्रोते उपस्थित होते.

४.५ **गीत रामायण :-** विभागीय केंद्र कोकण व युवाराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ एप्रिल २०१६ रोजी यशस्वीनी भवन, बदलापूर येथे सायंकाळी ७ ते ९ या वेळेत श्री रामनवमीचे औचित्य साधून ग. दि. माडगुळकर रचित 'गीत रामायण' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम आ. प. अच्युत जोशी व त्यांच्या संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केला. सदर कार्यक्रमाचे आयोजन सौ. दर्शना दामले यांनी केले होते. पाहुण्यांचे स्वागत श्री. आनंद दामले यांनी केले. सदर कार्यक्रमाचे निमंत्रक कोकण विभागीय समितीचे सदस्य कॅ. आशिष दामले हे होते. सुमारे शंभर ते दिडशे श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा मंत्रमुग्ध होवून आस्वाद घेतला.

४.६ **पर्यावरण दिन :-** विभागीय केंद्र कोकणच्या वतीने प्रत्येक जिल्हयामध्ये दि. ५ जून पर्यावरण दिन ते १ जुलै कृषीदिन या कालावधीत २००० रोपांची लागवड करण्याचा उपक्रम होती घेण्यात आला. त्यानुसार दि. ५ जून रोजी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून चिपळूण तालुक्यातील सत्यानारायण सामुदायिक केळी प्रकल्प, पेढांबे येथे कृषिभूषण श्री. रणजितराव खानविलकर यांचे हस्ते रोप लावून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष मा. श्री. अभिजित खानविलकर, श्री. प्रकाश काणे, सौ. युगंधरा राजेशिर्के व इतर मान्यवर उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीजकडून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला विविध तालुक्यातून रोपांचे वाटप करण्याकरिता एक हजार रोपे देण्यात आली. या रोपांचे वाटप रत्नागिरी, राजापूर, लांजा, संगमेशवर, गुहागर, दापोली, खेड या तालुक्यांमधील विविध शाळांमधून करण्यात आले.




सातव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे प्रमुख पाहुणे, ज्येष्ठ हिंदी अभिनेते श्री. पंकज कपूर यांचा सत्कार करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार सोबत महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे व प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे.

नॅशनल फिल्म अर्काईव्ह पुणे यांच्या मार्फत चित्रपट महोत्सवादरम्यान आयोजित केलेल्या प्रदर्शनाची पाहणी करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, कार्यकारिणी मंडळ सदस्य मा. कल्लाप्पाण्णा आवाडे, संचालक डॉ. जब्बार पटेल.







सातव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये आयोजित केलेल्या 'स्मिता पाटील स्मृती व्याख्यान' साठी उपस्थित राहिल्याबद्दल ज्येष्ठ दिग्दर्शक व कलाकार श्री. आशुतोष गोवारीकर यांचे स्वागत करताना महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल.

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती दिनी 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१६' श्री. नंदन निलेकणी यांना प्रदान केल्यानंतरचा एक क्षण. डावीकडून कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, श्री. नंदन निलेकणी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. ►






◄ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या 'उमेद' या कार्यक्रमांतर्गत आत्महत्या शेतक-यांच्या विधवा महिलांना मार्गदर्शन करताना कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या 'उमेद' या कार्यक्रमांतर्गत आत्महत्या शेतक-यांच्या विधवा महिलांचे सांत्वन करताना कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे. ►





विभागीय केंद्र कराडच्या वतीने कराड येथे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती दिनी प्रितिसंगमावर त्यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करताना.




विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यानात व्याख्यान देताना डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर सोबत केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी.




विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती दिनी आयोजित केलेल्या व्याख्याना प्रसंगी भाषण करताना केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी सोबत वक्ते ज्येष्ठ पत्रकार श्री. मधुकर भावे.

विभागीय केंद्र लातूरच्या
वतीने आयोजित केलेल्या
व्याख्याना प्रसंगी
दिप प्रज्वलन करताना केंद्राचे ▶
अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे
सोबत केंद्राचे सचिव
श्री. हरिभाऊ जवळगे.







विभागीय केंद्र कोंकणच्या
वतीने आयोजित केलेल्या
मा. यशवंतराव चव्हाण
◀ यांच्या पुण्यतिथी प्रसंगी
व्यासपीठावर केंद्राचे अध्यक्ष
श्री. राजाभाऊ लिमये.

विभागीय केंद्र कोंकणच्या वतीने
महिला उद्योजक मेळाव्यामध्ये
सांस्कृतिक कार्यक्रम ▶
सादर करताना महिला.






◀ मा. यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारक, देवराष्ट्रे येथे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी भजन सादर करताना ग्रामस्थ.




मा. यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारक, देवराष्ट्रे येथे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती दिनी ▶ मा. चव्हाणसाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना मान्यवर.



◀ विभागीय केंद्र कराडमधील मा. यशवंतराव चव्हाण यांच्या कागद पत्रांची पाहणी करताना कार्याध्यक्षा, सौ. सुप्रिया सुळे, सोबत केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे, कार्यक्रम व्यवस्थापक श्री. दत्ता बाळसराफ.

'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार सोहळा २०१६' मध्ये 'युवा क्रिडा पुरस्कार' संतोष नारायण गर्जे यांना वितरण करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष श्री. सुनील तटकरे. ▶







◀ 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार सोहळा २०१७' मध्ये 'युवा क्रिडा पुरस्कार' श्री. दत्तु बबन भोकनळ यांना वितरण करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष श्री. सुनील तटकरे.

यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार सोहळा २०१७' मध्ये 'युवा सामाजिक पुरस्कार' श्रीमती हेतलता महेंद्र तिवारी यांना वितरण करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष श्री. सुनील तटकरे. ▶






◀ विज्ञानगंगा अंतर्गत 'टेक्नोव्हिजन २०३५' चे व्याख्यान देताना ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर सोबत सरचिटणीस मा. श्री. शरद काळे मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह श्री. अं. पा. देशपांडे.




विज्ञानगंगा अंतर्गत 'लाईटर साईड ऑफ ग्रॅव्हिटी' या विषयाच्या व्याख्यानाची प्रास्तावना करताना मा. सरचिटणीस श्री. शरद काळे सोबत व्याख्याते व ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर, मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह श्री. अं. पा. देशपांडे. ▶




◀ विज्ञानगंगा अंतर्गत 'चालू जागतिक घडामोडी' या विषयावर व्याख्याना प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार श्री. कुमार केतकर सोबत सरचिटणीस मा. श्री. शरद काळे.

सृजन कार्यक्रमात
मुलांचा सत्कार करताना
कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे.






सृजन कार्यक्रमात
मुलांच्या समवेत
कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे.

अपंग हक्क अभियाना अंतर्गत
'स्टारकी हेल्थ फाऊंडेशन'
यांच्या संयुक्त विद्यमाने
अपंगांसाठी आयोजित केलेल्या
कार्यक्रमाप्रसंगी स्टारकी व
प्रतिष्ठानचे पदाधिकारी व
कार्यकर्ते.






◀ जिल्हा केंद्र अहमदनगर यांच्या वतीने मानव अधिकार दिनानिमित्त कायदेविषयक शिबीर आयोजित करण्यात आले. त्याप्रसंगी केंद्राचे सचिव श्री. प्रशांत गडाख व मान्यवर.

जिल्हा केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानाप्रसंगी व्याख्याते प्रा. शाम आगळे सोबत केंद्राचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया, सचिव डॉ. नरेंद्र काळे. ▶







◀ जिल्हा केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक दिनाच्या कार्यक्रमानिमित्त बोलताना केंद्राचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया सोबत सचिव डॉ. नरेंद्र काळे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्यात प्रमुख पाहुणे डॉ. जब्बार पटेल यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना सरचिटणीस मा. श्री. शरद काळे. ▶





◀ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्यात कर्तबगार ज्येष्ठ नागरिक म्हणून सन्मान केलेल्या सन्मानार्थी बरोबर डॉ. जब्बार पटेल.

'ज्येष्ठ नागरिक संघटना' गोरेगाव पश्चिम यांचा सत्कार करताना डॉ. जब्बार पटेल व ज्येष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी. ▶






◀ जिल्हा केंद्र ठाणे यांच्या उद्‌घाटना प्रसंगी भाषण करताना मा. सरचिटणीस श्री. शरद काळे सोबत केंद्राचे अध्यक्ष श्री. मुरलीधर नाले, माजी खासदार श्री. संजीव नाईक, व सचिव श्री. अमोल नाले.

जिल्हा केंद्र ठाणे व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘यशवंत व्याख्यानमाला' आयोजित प्रसंगी प्रथम व्याख्यान देताना पद्‌मविभूषण ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर. ▶







◀ महाराष्ट्र महिला व्यासपीठ मार्फत 'आठवणींच्या जलाशयावर' या गीतसंचाचे प्रकाशनाप्रसंगी ज्येष्ठ संगीतकार श्री. अशोक पत्की, यांचा सत्कार करताना महाराष्ट्र महिला व्यासपीठ च्या संयोजिका, सौ. रेखा नार्वेकर.



सन २०१६ चे
'वाय. व्ही चंद्रचुड पारितोषिक'
श्रीमती नेहा भंडारी यांना
देताना पद्मविभूषण
ज्येष्ठ शास्त्रज्ञ
डॉ. अनिल काकोडकर.




यशवंतराव चव्हाण
माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीची
सन २०१६ ची बॅच.




अपंग हक्क विभागामार्फत
'अपंग हक्क व्यक्ती
अधिनियम २०१६' च्या
कार्यक्रमाप्रसंगी मान्यवर.

४.७ **कृषी दिन :-** विभागीय केंद्र कोकण व सांदिपनी गुरुकुल, संगमेश्वर यांचे संयुक्त विद्यमाने १ जुलै 'कृषी दिन' कार्यक्रम सांदिपनी गुरुकूल येथे संपन्न झाला. यावेळी कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हा समिती सदस्य श्री कृ. आ. पाटील, श्रीमती प्राची शिंदे, श्री. अविनाश काळे, हेल्प अकॅडेमीचे अध्यक्ष श्री. युयुत्सू आर्ते, सांदिपनी गुरुकूलचे अधिक्षक श्री. कारखानीस इ. मान्यवर उपस्थित होते. जिल्हा समिती सदस्य श्री. कृ. आ. पाटील यांनी उपस्थितांना कृषी दिनाची माहिती सांगून भारत हा कृषीप्रधान देश असून सुवर्णभूमी आहे. राष्ट्र नवनिर्माण व्हावयाचे असेल तर वृक्षाची कास धरुन वृक्षलागवड करा असा संदेश त्यांनी दिला. कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरु तथा कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी कृषीदिनाचे महत्व सांगून शिवण, वड, साग या रुंद पानांच्या झाडांची लागवड करावी असे सांगून याविषयी माहिती दिली. पालघर व सिंधुदुर्ग जिल्हयातील कोकण विभागीय समिती सदस्यांनी आपापल्या जिल्हयात अनेक ठिकाणी वृक्षलागवडीचे कार्यक्रम घेतले. सिंधुदुर्ग जिल्हयातील माणगाव खो-यातील आठ विद्यालयांमधून १००० साग रोपांचे वाटप करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय समितीचे कोषाध्यक्ष मा. श्री. एम. के. गावडे यांनी माणगांव खो-यातील विद्यालयांमधून ही रोपे वितरीत केली. ही रोपे वितरीत करण्याकरिता प्रा. प्रमोद धुरी, ॲड. श्री. किशोर शिरोडकर, सौ. प्रज्ञा परब, अजित परब, रामचंद्र घोगळे आदींनी सहकार्य केले. बिबवणे हायस्कूल, साळगांव, माणगाव, बेनगाव, वाडोस, हिर्लोक, हळदीचे नेरुर, वसोली या विद्यालयांमधून १ जुलै रोजी रोपे लावण्यात आली. विनामोबदला सागवानची रोपे दिल्याबद्दल विद्यालयातील संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले.

४.८ **योग चिकित्सा शिबीर :-** विभागीय केंद्र कोकण आणि युवाराज प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ ते २१ जून २०१६ या कालावधीत यशस्विनी भवन येथे बदलापूरच्या नागरिकांच्या स्वस्थ आरोग्यासाठी 'स्वस्थ भारत अभियान' अंतर्गत 'योग चिकित्सा शिबीर' याचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रशिक्षक श्री. कंबर सिंग यांनी कंबरदुखी, मानदुखी, गुडघादुखी व सांधेदुखी या चिकित्सांचे प्रात्यक्षिकासह उत्तम मार्गदर्शन केले. हे शिबीर सकाळी ७ ते ९ या वेळेत घेण्यात आले. कॅ. आशिष दामले यांनी आयोजित केलेल्या या शिबीरामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

४.९ **ज्येष्ठ नागरिक दिन :-** विभागीय केंद्र कोकण व रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघ, रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर 'ज्येष्ठ नागरिक दिना' निमित्त भारत शिक्षण मंडळ, रत्नागिरीचे कॅ. सुभाषचंद्र ठाकूर सभागृहामध्ये दि. १ ऑक्टोबर २०१६ रोजी ज्येष्ठांसाठी सायंकाळी ४ वाजता आनंद मेळावा घेण्यात आला. या आनंद मेळाव्यापूर्वी ज्येष्ठ नागरिकांची पुरुष व महिला अशा दोन गटामध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे वतीने भारत शिक्षण मंडळाचे क्रीडांगणावर चालण्याची स्पर्धा घेण्यात आली. चालण्याच्या स्पर्धेला ज्येष्ठांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या स्पर्धेमध्ये पुरुष गटातून दोन व महिला गटातून एक क्रमांक काढण्यात आला. रोख रक्कम व 'गीतारहस्य शताब्दी गौरव' हे पुस्तक देऊन विजयी स्पर्धकांना गौरविण्यात आले. पुरुष गट प्रथम श्री. अजित सावंत, द्वितीय श्री. साईनाथ दानवे, महिला गट प्रथम श्रीमती सुलक्षणा सावंत.

आनंद मेळाव्याची सुरुवात शतकवीर श्री. महादेव वांदरकर गुरुजी, श्री. राजाभाऊ लिमये, अध्यक्ष कोकण विभागीय समिती, डॉ. श्रीरंग कद्रेकर, अध्यक्ष रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघ व इतर मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. ज्येष्ठ नागरिकांसाठी संगीताचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. सौ. वैजयंती पाटील, जायंटस् ग्रुपचे श्री. संजय पाटणकर व श्री प्रवीण डोंगरे यांनी किशोर कुमार, रफी यांची जुनी गाणी सादर करुन ज्येष्ठांच्या तारुण्यातील स्मृती जाग्या केल्या आणि टाळयांच्या गजराने आनंद मेळावा साजरा केल्याचे सांगून ज्येष्ठांनी कुटुंबात रहाताना आपले जीवन संतुष्ट मनाने सदा वावरावे व मुला बाळांना आनंदात मार्गदर्शन करावे म्हणजे वृध्दाश्रमाचा विचारही करावा लागणार नाही असे सुचवत या आनंद मेळाव्यात सहभाग घेतल्याबद्दल विभागीय समिती अध्यक्ष

राजाभाऊ लिमये यांनी आभार मानले. ज्या ज्येष्ठ नागरिकांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत व ज्यांच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा ज्येष्ठ नागरिकांचा रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघाचे वतीने भेटवस्तू देवून सत्कार

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

४.२४ **जागतिक महिला दिन कार्यक्रम दापोली :-** दापोली येथील आर.आर. वैद्य इंग्लिश मेडियम स्कूल येथे कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व रत्नागिरी जिल्हा महिला पतसंस्था दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिन' कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी परिसरातील विविध क्षेत्रातील उच्च पदस्थ व कर्तृत्ववान महिलांचा सत्कार आणि कॅशलेस व्यवहाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शुभारंभी सरस्वती व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तहसिलदार कविता जाधव, अ. नि. समिती अध्यक्षा ॲड. मुक्ता दाभोळकर, स्नेहज्योती संस्थेच्या आशाताई कामत आदी मान्यवर कर्तृत्ववान महिलांना शाल, श्रीफळ व गुच्छ देऊन गौरविण्यात आले. तहसिलदार कविता जाधव मनोगतात म्हणाल्या अहोरात्र कुटुंब व समाजाच्या प्रगतीसाठी झटणा-या स्त्रीयांचा उचित आदर करणे महत्वाचे आहे. शासन, समाज व कायद्याने स्त्रीला संरक्षण व सन्मान दिला आहे. स्त्रियांना स्वकर्तृत्वासाठी शहरा इतक्याच ग्रामीण भागातही संधी आहेत. अध्यक्षीय समारोपात ॲड. मुक्ता दाभोळकर म्हणाल्या स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी विचार मंथन, प्रबोधन होण्याची गरज आहे. आजपर्यंत मुलं होण व नवरा असणं यावर स्त्रियांचे समाजातले स्थान ठरत असे. आता स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा अधिक विचार केला जातो. स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रबंधक यांनी महिलांना कॅशलेस व्यवहारासंबंधी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. आर. व्ही. बेलोसे एज्युकेशन फाऊंडेशन सभापती श्रीमती जानकीताई बेलोसे यांनी प्रास्तविकात कर्तृत्ववान महिलांचे कौतुक केले. श्री. विश्वंभर कमळकर यांनी आभार मानले.

४.२५ **महिला दिन कार्यक्रम संगमेश्वर :-** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दि. ८ मार्च २०१७ रोजी दादासाहेब सरफरे विद्यालय, बुरंबी, तालुका संगमेश्वर येथे 'महिला सबलीकरण' या विषयावर प्रा. डॉ. वर्षा फाटक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रा. वर्षा फाटक यांनी महिला सबलीकरणात महात्मा ज्योजिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे योगदान, महिलांची सद्यस्थिती व महिलांसमोरील आव्हाने या विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

४.२६ **मा. यशवंतराव चव्हाण जयंती कार्यक्रम :-** कोकण विभागीय केंद्राचे वतीने मा. यशवंतराव चव्हाण १०४ वी जयंती कोकण विभागीय केंद्राचे कार्यालय टिळक आळी, रत्नागिरी येथे दि. १८ मार्च २०१७ रोजी संपन्न झाली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून देवरुख येथील मा. प्रा. सुरेश जोशी यांची उपस्थिती लाभली. मा. चव्हाणसाहेबांचे जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ दि. १८ मार्च रोजी उपस्थित मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देण्यात आले.

<u>**वक्तृत्व स्पर्धा**</u> : प्रथम क्रमांक शुभम पाटील, द्वितीय क्रमांक विभागून आशा पाटील व ऋषीकेश वैद्य, तृतीय क्रमांक शेफाली चव्हाण.

<u>**निबंध स्पर्धा**</u> : प्रथम क्रमांक ऋतुजा जितेंद्र धामने, द्वितीय क्रमांक सुकन्या कडू, तृतीय क्रमांक ऋषीकेश शिंदे.

रायगड, तोरणा, राजगड या शिवाजी महाराजांच्या गडांनी वेढा दिलेला अजोड अवघड सुळका 'लिंगाणा' उंची ३००० फूट सर केल्याबद्दल रत्नागिरीतील जिद्द माऊंटेनिअर्सचे त्यांच्या विशेष कार्याची दखल घेण्यासाठी माऊंटनिअर्सचे अध्यक्ष श्री. धीरज पाटकर व त्यांचे सहकारी यांना या कार्यक्रमाचे वेळी आमंत्रित करण्यात आले होते. त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्प देवून अभिनंदन करण्यात आले. आपण इतिहास विसरतो कारण आपण तो लिहून ठेवीत नाही. आपण विविध स्थळे, व्यक्ती, गावे यांच्यातील महत्वाच्या घटनांच्या नोंदी लिहून ठेवीत नाही. त्यामुळे तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचत नाही असे विचार यशवंतराव चव्हाणांनी व्यक्त केले होते. यावरुन त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते असे मत ज्येष्ठ साहित्यिक व माजी प्रा. डॉ. सुरेश जोशी यांनी व्यक्त केले. इतिहास लिहून ठेवण्याची जबाबदारी शिक्षण संस्थांची आहे असे मतही त्यांनी यावेळी अध्यक्षस्थानावरुन बोलताना व्यक्त केले. लोकनेता कसा असावा याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे यशवंतराव चव्हाण. त्यांच्या जीवनातील विविध पैलूचे दर्शन वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा विजेता शुभम पाटील यांने मांडले. कोकण विभागीय अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी वक्तृत्व व निबंध

स्पर्धेतील विजेत्यांचे त्याचप्रमाणे जिद्द माऊंटेनिअरींर्सच्या सर्व सदस्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील यांनी केले तर आभार श्री. विनायक हातखंबकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. चंद्रमोहन देसाई यांनी केले.

## १०.५ विभागीय केंद्र नाशिक :-

५.१ **'चित्रपट चावडी' 'प्लॅटफॉर्म' दि. ७.१०.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक जिया जानके (चीन) यांचा 'प्लॅटफॉर्म' हा चायनीज भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सन २००० मध्ये प्रदिर्शत झालेल्या या रंगीत चित्रपटाचा कालावधी १५४ मिनिटांचा होता.

५.२ **'वाचन प्रेरणा दिन' नूतन विद्यालय, सैय्यद पिंप्री दि. १५.१०.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित नूतन माध्यमिक विद्यालय, सैय्यद पिंप्री येथे ग्रंथ दिंडी व ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. संस्थेच्या वतीने शाळेस ग्रंथपेटी भेट देण्यात आली. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पालक व संस्थेचे कार्यकर्ते हजर होते.

५.३ **'वाचन प्रेरणा दिन' अभिनव बाल मंदिर, नाशिक दि. १५.१०.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मविप्र संस्थेचे नाशिक येथील अभिनव बालविकास मंदिर शाळेत ग्रंथ प्रदर्शन भरवून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये प्रा. विजयकुमार पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानातून डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जीवन गाथा व वाचनाचे महत्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक बाळबोध व मोठया व्यक्तीस विचार करावयास भाग पाडणा-या प्रश्नांना त्यांनी समर्पक उदाहरणांसह उत्तरे दिली. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी प्रवीण आहिरे, मविप्रचे शिक्षणाधिकारी सी. डी. शिंदे व विश्वास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हरी कुलकर्णी यांनी उपस्थित राहून ग्रंथप्रदर्शनाच्या निमित्ताने मार्गदर्शन केले.

५.४ **'चित्रपट चावडी' 'टोकिओ स्टोरी' दि. २१.१०.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक येसुजीरो ओझू (जपान) यांचा 'टोकिओ स्टोरी' हा जपानी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सन १९५३ मध्ये प्रदर्शित झालेल्या या कृष्णधवल चित्रपटाचा कालावधी १३६ मिनिटांचा होता.

५.५ **'ग्रंथ तुमच्या दारी - बालविभाग' दि. २५.१०.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. रुचा मालपाणी, इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर यांच्या सहकार्याने संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध १६ शाळांना ग्रंथ तुमच्या दारी-बालविभाग या योनजे अंतर्गत ग्रंथपेटया भेट देण्यात आल्या. इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर यांनी 'ए हॅपी स्कुल प्रोजेक्ट २०१६-२०१७' अंतर्गत समगनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा दत्तक घेतल्या आहेत. सदर शाळेमध्ये ग्रंथालय नसल्याने आपल्या संस्थेच्या ग्रंथ तुमच्या दारी-बालविभाग योजनेतून इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर यांच्या सहकार्याने संगमनेर तालुक्यातील एकूण १६ शाळेना ग्रंथपेटया देण्यात आल्या.

५.६ **'कॅम्पस मैत्र कारवा' दि. ११.११.२०१६ :-** मैत्र कारवा २०१६ च्या युवक मेळाव्यानंतर जास्तीत जास्त युवांना प्रबोधनाद्वारे संबोधित करायचे असेल तर त्यांना एका ठिकाणी बोलविण्यापेक्षा आपणच त्यांच्यापर्यंत पोहचणे आवश्यक आहे हे लक्षात आल्याने विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस मैत्र कारवा या नावाने नवीनच आलेल्या स्वयंसेवकांना प्रशिक्षक म्हणून तयार करणेसाठी प्रशिक्षण घेण्याचे ठरले. युवक मेळाव्याच्या निमित्ताने आलेल्या या १५ स्वयंसेवकांना प्रशिक्षित करुन त्यांच्याद्वारे विविध कॉलेजच्या कॅम्पसमध्ये युवांच्या विविध प्रश्नांवर व प्रबोधनावर या स्वयंसेवकांतर्फे प्रशिक्षण आयोजित करण्याचे ठरले. याकरिता विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, विश्वास बँक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सारस्वत बँक यांचे संयुक्त विद्यमाने दि. ११.११.२०१६ रोजी सदर प्रशिक्षण क्लब हाऊस, ठाकूर रेसिडेन्सी, सावरकर नगर, नाशिक येथे संपन्न झाले. या प्रशिक्षणास सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

५.७ **'चित्रपट चावडी' 'ऑटम आफ्टरनून' दि. ११.११.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक येसुजीरो ओझू (जपान) यांचा 'ऑटम आफ्टरनून' हा जपानी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सन १९६२ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी ११२ मिनिटांचा होता.

५.८ **'पितृसत्ता विरोधी पुरुष' चर्चासत्र दि. १२ व १३.११.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने या कालावधीत प्रसिध्द जेंडर प्रशिक्षण श्री. आनंद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली 'पितृसत्ता विरोध पुरुष' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेत प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासक अरुण ठाकूर यांनी पितृसत्ता व धर्म या विषयाची मांडणी केली. चर्चेत धर्मांची संकल्पना, तिचा प्रवास व सद्यस्थिती, धर्मातील कर्मकांडे त्यातून बाहेर पडण्याचे मार्ग इ. विषयांचा सखोल अभ्यास केला. या चर्चेत विविध सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते तसेच युवांनी एकत्र येऊन सामाजिक विषमता ही पितृसत्तेमुळे आली आहे असे मत मांडले. सदर चर्चेचे समन्वयन संस्थेच्या अनिता पगारे यांनी केले.

५.९ **'चित्रपट चावडी' 'फ्लोटींग वीडस्' दि. १८.११.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक येसुजीरो ओझू (जपान) यांचा 'फ्लोटींग वीडस्' हा जपानी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सन १९५९ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १२० मिनिटांचा होता.

५.१० **'सामाजिक लिंगभाव आणि समानता' चर्चासत्र दि. १९.११.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने मोतीवाला बी.एड. कॉलेज, गंगापूर रोड, नाशिक येथे बी.एड. च्या विद्यार्थ्यांसाठी 'सामाजिक लिंगभाव आणि समानता' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना विविध खेळाच्या माध्यमातून जेंडरची संकल्पना समजावून सांगण्यात आली. ज्यामुळे परिवर्तनाला मदत होऊ शकेल. विद्यार्थ्यांना शिबीराचा विषय मांडण्याची पध्दत व खेळाचा वापर खूपच आवडला. विद्यार्थ्यांसह कॉलेजच्या प्राचार्यासमवेत सर्व शिक्षकांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संस्थेच्या अनिता पगारे व सहकारी यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले.

५.११ **'कॅम्पस मैत्र कारवा प्रशिक्षण' दि. २१.११.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक,

विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने सुखदेव माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, इंदिरा नगर, नाशिक येथे संस्थेच्या अनिता पगारे व टिप यांनी 'जेंडर व इक्वॅलिटी' या विषयावर प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणात स्वयंसेवक व विद्यार्थी यांच्यात एकरुपता यावी यासाठी आईस ब्रेकींगचा खेळ घेण्यात आला. तसेच पुनर्जन्म घ्यायची संधी मिळाले तर कोणता जन्म घ्याल ? स्वतःचे नाव काय ठेवाल ? अशा विविध प्रकारे विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. या प्रशिक्षणास ३०० विद्यार्थी उपस्थित होते. सामाजिक लिंगभाव व स्त्री पुरुष समानता या विषयावर प्रशिक्षण संपन्न झाले.

५.१२ **'किशोरवयीन मुलींची बैठक' दि. २३.११.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनिर्णय सामाजिक संस्था, पेठ रोड, नाशिक येथे किशोरवयीन मुली व महिला यांच्याकरीता 'मासिक पाळी व मुलींचे आरोग्य' या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टिम यांनी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणात किशोरवयात शरीरात होणारे बदल व मासिक पाळी म्हणजे काय ? का येते ? कशी येते ? व त्यासंदर्भातील सामाजिक समज-गैरसमज आणि त्याबाबत घ्यावयाची काळजी इत्यादी विषयांचे प्रबोधन करण्यात आले.या प्रशिक्षणात उपस्थित मुलींनी प्रशिक्षकांना याबाबत विविध प्रश्न विचारुन मनातील शंकाचे निवारण करुन घेतले. फुलेनगर, पेठ रोड, पंचवटी येथील वस्तीतील ४० मुली व महिला उपस्थित होत्या.

५.१३ **'जग बदलणारे जीनियस' या विषयावरील व्याख्यान, मार्गदर्शक - अच्युत गोडबोले व डॉ. दीपा देशमुख दि. २४.११.२०१६ :-** महाराष्ट्राचे थोर शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या ३२व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने ख्यामनाम साहित्यिक अच्युत गोडबोले व लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. दीपा देशमख यांचे 'जग बदलणारे जीनियस' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी श्री. गोडबोले म्हणाले की, मी स्वतःला कायम विद्यार्थी समजतो व त्याच भावनेने लेखन करतो. कुतुहल व माणुसकी विसरु नये. हल्लीचे अनेक शिक्षक विद्यार्थ्यांऐवजी परीक्षार्थी घडवतात. का ? या प्रश्नाने संशोधनाला चालना मिळते म्हणून विद्यार्थ्यांनी आपले कुतुहल, जिज्ञासा कायम ठेवली पाहिजे. मार्कापेक्षा विषयावर प्रेम करावे. लहानपणापासून घरात बुजुर्ग गायकांच्या मैफली झाल्या. साहित्यिक, शास्त्रज्ञांचा सहवास घडला. त्यामुळे गणित, विज्ञाना इतकेच साहित्य, संगीत, चित्रकला यावरही प्रेम जडले. विविध विषयांचे कायम आकर्षण राहिले. आय.आय.टी.च्या ग्रुपमुळे विपुल लेखन केले. गुणवत्तेचा, उत्कृष्टतेचा ध्यास घेतला. मोठे ध्येय बाळगून प्रचंड वाचन केले. जीनियस या प्रकल्पातील पुस्तके लिहिताना सहलेखिका दीपा देशपमुख यांनी खूप मोलाचे सहकार्य केले असेही श्री. गोडबोले म्हणाले. तसेच मुलांची जिज्ञासा मारु नका, त्यांना प्रश्न विचारु द्या, असा सल्लाही श्री. गोडबोले यांनी शिक्षक आणि पालकांना दिला. केवळ परीक्षेसाठी मुलांनी अभ्यास करु नये, तर सर्व क्षेत्रांतील ज्ञान मिळवावे असेही ते म्हणाले.

याप्रसंगी 'जीनियस' पुस्तकाच्या सहलेखिका डॉ. दीपा देशमुख म्हणाल्या की, जीनियस पुस्तक प्रकल्प पूर्ण करताना माझे वैयक्तिक आयुष्य बदलून गेले. जगात इतके थोर माणसं होऊन गेली हे कळल्याने मी भारावून गेले. ही माणसे आपल्याला 'चला उठा कामाला लागा' असा संदेश देतात. जग गाजवणारे शास्त्रज्ञ, संशोधक हळवे असू शकतात. कारण ते अत्यंत संवेदनशील माणूस असतात. येत्या दोन महिन्यात आमचे पाश्चिमात्य संगीतावरील 'सिंफनी' हे पुस्तक दोन भागांमध्ये प्रकाशित होईल. जग बदललेले जीनियस ही पुस्तक मालिका तसेच तंत्रज्ञानावर आधारीत १२ पुस्तकांची शृंखला प्रकाशित होईल असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. अत्युत गोडबोले यांचा परिचय सचिव डॉ. मनोज शिंपी यांनी करुन दिला तर

सन्मान सदस्य कविता कर्डक यांनी केला. डॉ. दीपा देशमुख यांचा परिचय कोषाध्यक्ष विनायक रानडे यांनी केला तर सन्मान सदस्य ॲड. नितीन ठाकरे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदस्य डॉ. सुधीर संकलेचा यांनी केले. कार्यक्रमास विनायकदादा पाटील, भीष्मराज बाम, डॉ. कैलास कमोद, आर्किटेक्ट संजय पाटील, मेघा साखेडकर, हंसराज पाटील, डॉ. मनोज चोपडा, विजय बु-हाडे, प्रा. निशा पाटील, सचिन जोशी तसेच नाशिककर मोठया संख्येने उपस्थित होते.

५.१४ **'कॅम्पस मैत्र कारवा' दि. ८.१२.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने एस. बी. कॉलेज, शहापूर येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जेंडर इक्वॅलिटी या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टिम यांनी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणास कॉलेजचे शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

५.१५ **'चित्रपट चावडी' 'रॅबिट प्रुफ फेन्स' दि. ९.१२.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक फिलीप नॉईस यांचा 'रॅबिट प्रुफ फेन्स' हा चित्रपट दाखविण्यात आला.

५.१६ **नॉनव्हेज महोत्सव दि. ९.१२.२०१६ ते ११.१२.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वास ठाकूर यांच्या संकल्पनेतून ९.१२.२०१६ ते ११.१२.२०१६ या कालावधीत नॉनव्हेज महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नॉनव्हेज पदार्थातील चटकदारपणा आणि ते बनवण्याच्या पध्दतीतील वेगळेपणाचा आनंद नॉनव्हेज महोत्सवात खवय्यांनी अनुभवला. नॉनव्हेज पदार्थांची एक स्वतंत्र खाद्य संस्कृती आहे आणि त्यातील अनोखा मेळ महाराष्ट्रातील विविध ठिकाणी अजूनही टिकून आहे, त्याची प्रचिती महोत्सवात आली. नॉनव्हेज पदार्थातील चटकदारपणा व खास तयार केलेल्या मसाल्यांचा वापर ही खासियत येथे अनुभवास आली. तीस हजारांहून अधिक खवय्यांनी महोत्सवाला प्रतिसाद दिला.

५.१७ **'ग्रंथ तुमच्या दारी - बालविभाग' दि. २४.१२.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने व श्री. सचिन देशमुख यांचे सहकार्याने आधारतिर्थ आश्रम (महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुला-मुलींचे) मु. तुपादेवी, पो. अंजेनेरी, ता. त्र्यंबकेश्वर येथील आश्रमास ग्रंथपेटी भेट देण्यात आली.

५.१८ **'चित्रपट चावडी' 'द क्वॉइट अमेरिकन' दि. १६.१२.२०१६ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक फिलीप नॉईस यांचा 'द क्वॉइट अमेरिकन' हा चित्रपट दाखविण्यात आला.

५.१९ **नववर्षाच्या पूर्वसंध्येला गझलनवाज भीमराव पांचाळे यांची मैफल - दि. ३१.१२.२०१६ :-** 'अंदाज आरशाचा वाटे, खरा असावा | प्रत्येक माणसाचा तो चेहरा असावा' असा माणूसकीचा गहिरा रंग आणि सुरांची बरसात घेऊन जगण्यातील माणूसपणाच्या मूल्यांचा शोध घेत काळजाला भिडणा-या एकाहून एक सरस मराठी हिंदी गझलांनी रसिकांना अनोखा आनंद दिला. निमित्त होते विश्वास संकल्प आनंदाचा उपक्रमांतर्गत नववर्षाच्या पूर्वसंध्येला नव्या संकल्पांची नवी मैत्री, नवी ओळख, आनंदाची जाणीव असलेल्या नवीन वर्षाच सुरुवात ही थोडयाशा आगळयावेगळया पध्दतीने व्हावी, याकरीताच नववर्षाच्या पूर्वसंध्योला काही चांगले संकल्प घेऊन नवीन वर्ष आपण सर्वच एका वेगळया

प्रकारे साजरा करावा या संकल्पनेतून विश्वास ग्रुप तर्फे गझल सम्राट भीमराव पांचाळे यांच्या गझल गायनाच्या अनोख्या मैफिलीचे आयोजन रोटरी क्लब ऑफ नाशिक स्मार्ट सिटी यांच्या माध्यमातून विश्सास लॉन्स येथे करण्यात आले होते. विश्वास को.ऑप. बँकचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम झाला असून कार्यक्रमाचे संयोजक विनायक रानडे होते. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ नाशिक स्मार्ट सिटी, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, श्री पद्मावती कॅटरर्स, झेलम मसाले, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, विभागीय केंद्र नाशिक, सारस्वत बँक, विश्वास लॉन्स यांचेबरोबर टकले ज्वेलर्स, फ्रावशी ॲकेडमी, श्री श्री साईबाबा हार्ट इन्स्टिटयूट ॲन्ड रिसर्च सेंटर, संकलेचा कन्स्ट्रक्शन, एसडब्ल्यूएस फायनान्शियल सोल्यूशन्स प्रा. लि. यांचे सहकार्य लाभले. मैफलीचे बहारदार सूत्रसंचालन श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

५.२० **'कॅम्पस मैत्र कारवा' दि. ९.१.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने जे.एम.सी.टी. कॉलेज, नाशिक येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जेंडर इक्वॅलिटी या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टीम यांनी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांचे गट करुन विविध खेळाच्या माध्यमातून जेंडरची संकल्पना समजावून सांगण्यात आली.

५.२१ **'कॅम्पस मैत्र कारवा' दि. १०.१.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने कवीवर्य टिळक वाचनालय, त्र्यंबक नाका, नाशिक येथे जेंडर इक्वॅलिटी या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टिम यांनी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणामध्ये दिशा केणी यांनी ट्रान्स जेंडर म्हणजे काय, त्याचे विविध प्रकार, त्यांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, लैंगिक अत्याचार या विषयावर बोलतांना सांगितले की, ट्रान्स जेंडर हा गावातील सगळयात शेवटाचा/खालचा समाज म्हणून समजला जातो. त्यांना गावामध्ये कोणत्याही शुभ कार्यात सहभागी होता येत नाही व गावाच्या वेशीवर त्यांचे निवासस्थान असते अशा अनेक व्यथा हया समाजात जगतांना त्यांना भोगाव्या लागतात. ट्रान्स जेंडरचे जीवन तसेच त्यांच्याविषयी समाजात समजले जाणारे गैरसमज यांचे निवारण त्यांनी करुन दिले. या कार्यशाळेस एम.एस.डब्ल्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांबरोबरच इतरांनीही मोठया संख्येने सहभाग नोंदविला.

५.२२ **'चित्रपट चावडी' 'डेड काल्म' दि. १३.१.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक फिलीप नॉईस यांचा 'डेड काल्म' हा चित्रपट दाखविण्यात आला.

५.२३ **'ग्रंथ तुमच्या दारी - बालविभाग' दि. २४.१.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने व रोटरी क्लब ऑफ अंबड, नाशिक यांचे सहकार्याने इगतपुरी तालुक्यातील नांदगाव या ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या जिल्हा परिषद शाळेला ग्रंथ तुमच्या दारी - बालविभाग योजने अंतर्गत ग्रंथपेटी उपलब्ध करुन देण्यात आली. या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अंबड, नाशिकचे श्री. डी.एस. देशमुख, श्री. सुभाष गायकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री. महेश गायकवाड ग्रंथ तुमच्या दारी - बालविभाग योजनेचे समन्वयक श्री. विनायक रानडे हे उपस्थित होते.

५.२४ **मिसळ - सरमिसळ महोत्सव - दि. २६.१.२०१७ ते २९.१.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने मिसळ - सरमिसळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विविध

प्रकारच्या २५ हून अधिक मिसळींचा अस्सलपणा आणि नाविन्यपूर्ण चवींचा आस्वाद घेत मिसळ - सरमिसळ महोत्सवात ३० हजाराहून अधिक खवय्यानी ख-या अर्थाने मिसळींचा आस्वाद घेतला.

५.२५ **'चित्रपट चावडी' 'द नाईफ इन द वॉटर' दि. २७.१.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक रोमन पोलॅनस्की यांचा 'द नाईफ इन द वॉटर' हा चित्रपट दाखविण्यात आला.

५.२६ **'चित्रपट चावडी' 'व्हॅन गॉग - ब्रश विथ जिनिअस' दि. २७.१.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द दिग्दर्शक फ्रॅन्काईस बरट्रेंड यांचा 'व्हॅन गॉग-जिनिअस' हा चित्रपट दाखविण्यात आला.

५.२७ **नाशिक 'रन फॉर पीस' मॅरेथॉन २०१७ : दि. १२.२.२०१७ :-** पोलीस आयुक्तालय, नाशिक तर्फे आयोजित नाशिक २१ रन फॉर पीस-२०१७ या मॅरेथॉन स्पर्धेत विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिकच्या अधिकारी व कर्मचा-यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. दि. १२.२.२०१७ रोजी गोल्फ क्लब येथून मॅरेथॉनला सुरुवात झाली. तेथून मायको सर्कल-एबीबी सर्कल-हुंदाई शो रुम-गोल्फ क्लब येथे समारोप झाला. विश्वास को. ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचा-यांनी रन फॉर पीसचा संदेश दिला. श्री. विश्वास ठाकूर यांनी स्वतः मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला. सदर स्पर्धेसाठी विभागी केंद्र नाशिक, विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यानी ही यात सहभाग नोंदविला. बँकींगबरोबर सातत्याने सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रात विश्वास को. ऑप. बँक सहभाग घेत असते व योगदान देत असते याच जाणिवेतून रन फॉर पीस-२०१७ मधून शांतता व आरोग्यपर जनजागृतीचा संदेश बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाने दिला.

५.२८ **'चित्रपट चावडी' 'द फिफ्थ सील' दि. ३.३.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द हंगेरीयन दिग्दर्शक झोल्टन फ्रॅब्री यांचा 'द फिफ्थ सील' हा चित्रपट दाखविण्यात आला.

५.२९ **जागतिक महिला दिन : दि. ८.३.२०१७ :-** महिलांनी कर्तृत्वाने यशाचे नवे शिखर सर केले असून ख-या अर्थाने सक्षमीकरणाची सुरुवात प्रत्यक्षात आणली आहे. अडचणीतून मार्ग काढून संकटावर मात करण्याची जिद्द महिलांमध्ये उपजतच असते त्यातूनच देशविकासाचे स्वप्न प्रत्यक्षात येत आहे असे प्रतिपादन विश्वास को. ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सदर कार्यक्रम विश्वास क्लब हाऊस येथे संपन्न झाला. ते पुढे म्हणाले की, महिलांमध्ये व्यवस्थापन कौशल्य असते. त्यातून कार्य सिध्दीस नेत असतात. सकारात्मक मानसिकता आणि उत्तुंग ध्येय घेण्याची क्षमता महिलांमध्ये असल्याने ती ख-या अर्थाने सबल आहे. महिलांना आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याच गरजही त्यांनी प्रतिपादित केली. सुप्रसिध्द समुपदेशक जयश्री बु-हाडे यांनी 'नारी ते नारायणी' या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की महिलांनी कुटुंबाबरोबरच व्यक्तिमत्व विकासावर व आनंदी जगण्यावर लक्ष देण्याची गरज आहे. यावेळी बु-हाडे यांनी विविध खेळांच्या मनोरंजनाच्या माध्यमातून महिलांशी संवाद साधला. रोज नवनवीन पुस्तकांचे वाचन व व्यायाम ही सुखी जीवनाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले.

५.३० **'आपली बदलती संस्कृती' या विषयावर डॉ. अनिल अवचट यांचे व्याख्यान : दि. ११.३.२०१७ :-** समाजात आजकल आत्मसंतुष्टपणा आला असून जगण्यात पोकळपणा निर्माण झाला आहे. यातूनच अप्पलपोटी संस्कृती जन्माला

आलेली आहे. संस्कृतीवर तंत्रज्ञानाचे आक्रमण आले असून त्यामुळे माणसामाणसांतला संवाद हरवला आहे. एकंदर संवेदनाच नष्ट होण्यावर याचा परिणाम झाला आहे. त्याला रोखण्यासाठी माणुसपणाचं नातं बळकट करण्याची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिध्द लेखक व सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांनी 'आपली बदलती संस्कृती' या विषयावर बोलताना केले. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०४ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला सदर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले व डॉ. अनिल अवचट यांचा परिचय सचिव डॉ. मनोज शिंपी यांनी केला, तर सन्मान डॉ. सुधीर संकलेचा यांनी केला. या प्रसंगी केंद्राचे अध्यक्ष विनायकदादा पाटील, कोषाध्यक्ष विनायक रानडे, सदस्य डॉ. कैलास कमोद, गुरुमित बग्गा तसेच अरुण ठाकूर, प्रमोद पुराणिक, मिलींद धटींगण, धनंजय गोवर्धने, रविंद्र मालुंजकर, स्वप्नील तोरणे आदी मान्यवर उपस्थित होते.

५.३१ **'चित्रपट चावडी' 'द बॉईज ऑफ द पॉल स्ट्रीट' दि. १७.३.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द हंगेरीयन दिग्दर्शक झोल्टन फ्रॅब्री यांचा 'द बॉईज ऑफ द पॉल स्ट्रीट' हा चित्रपट दाखविण्यात आला.

५.३२ **मथुरा व वृंदावन येथील पारंपारिक होळी उत्सव व स्केचेसचे प्रदर्शन : दि. २२.३.२०१७ ते २३.३.२०१७ :-** आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कला क्षेत्रातही कौशल्य प्राप्त करता येते त्यासाठी परंपरेचे जतन आणि नव्याचा शोध घेण्याची धडपड कलावंतामध्ये असण्याची गरज आहे. कलेच्या निर्मितीतून स्वतःला आनंद तर मिळतोच पण त्यातून समाजाला विचारही देता येतो. छायाचित्र व स्केचेस प्रदर्शनातून हाच संदेश देण्याचा प्रयत्न युवा छायाचित्रकारांनी केला असे प्रतिपादन विश्वास को. ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. मथुरा व वृंदावन येथील पारंपारिक होळी उत्सव व स्केचेसच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सदर प्रदर्शन विश्वास को. ऑप. बँक लि., सावरकर नगर, गंगापूर रोड, नाशिक येथे संपन्न झाले. ते पुढे म्हणाले की, नाशिकच्या अनेक कलावंतांमध्ये गुणवत्ता दडलेली आहे. त्यांचा शोध घेऊन त्यांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे म्हणजेच त्यांच्यातल्या कलावंताला नवे अवकाश प्राप्त करुन देणे होय. अनंत गुजराथी, अमित लव्हारे, निखिल देशमुख, अमोल शिंदे हया छायाचित्रकारांचे व आशिष देवपूरकर यांचे निवडक स्केचेस या प्रदर्शनात होते. तसेच अनंत गुजराथी यांच्या मथुरा व वृंदावन येथील पारंपारिक होळी उत्सवाच्या वैशिष्टयपूर्ण छायाचित्रांबरोबरच पोट्रेट फोटोग्राफी, लॅन्डस्केप फोटोग्राफी, मॅक्रो (सूक्ष्म) फोटोग्राफीचा यात समावेश होता. सदर प्रदर्शनास नाशिककर कलाप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

५.३३ **'चित्रपट चावडी' 'लॅन्डस्केप इन द मिस्ट' दि. २२.३.२०१७ :-** विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को. ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिध्द ग्रीस दिग्दर्शक थिओ ॲन्जेलोपुओलॉस यांचा 'लॅन्डस्केप इन द मिस्ट' हा चित्रपट दाखविण्यात आला.

## १०.६ विभागीय केंद्र औरंगाबाद :-

६.१ **चित्रपट चावडी : आझाद लघुपट - दि. १७.६.२०१६ :-** विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणा-या चित्रपट चावडी या उपक्रमात या महिन्यात किशोर हंबीरराव लोंढे यांनी दिग्दर्शित केलेला देशातील धार्मिक प्रश्न समंजसपणे मांडणारा 'आझाद' हा लघुपट दाखविण्यात आला. लघुपटाची पटकथा पुणे येथील मैनुद्दीन यांनी लिहिली आहे. यावेळी सुप्रसिध्द अभिनेते सिध्दार्थ जाधव हे चावडीच्या प्रेक्षकांशी संवाद साधला. यावेळी अपर्णा कक्कड, रेखा शेळके, सुबोध जाधव, उमेश राऊत, दिपक जाधव, सत्यजीत शोभा श्रीराम, त्रिशूल कुलकर्णी, मंगेश निरंतर, राजेंद्र वाळके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

६.२ **दि. २८ जून २०१६ - 'पाणीबाणी' या संपादित काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा :-** राज्यातील सुमारे पन्नासहून अधिक कवींच्या पाण्यावा आधारित कवितांचा समावेश - राज्यात पडलेल्या भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने 'पाणी' या विषयावर राज्यातील विविध मराठी कवींनी लिहिलेल्या निवडक कवितांचा 'पाणीबाणी' या नावाचा काव्यसंग्रह तयार करण्यात आला आहे. सदर काव्यसंग्रहाचे संपादन प्रसिध्द कवी प्रभाकर साळेगावकर (माजलगाव) यांनी केले आहे. दि. २८ जून २०१६ रोजी सायंकाळी ५ वाजता पैठक गेट येथील मराठवाडा साहित्य परिषदेच्या गो. ना. नांदापुरकर सभागृहात या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. रं. बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसिध्द कवी दासू वैद्य या काव्यसंग्रहाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, बीड केंद्राच्या कार्याध्यक्षा डॉ. दिपाताई क्षीरसागर, ज्येष्ठ पत्रकार अतुल कुलकर्णी, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, सुहास तेंडुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या काव्यसंग्रहामध्ये राज्यातील ५० हून अधिक कवींच्या कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

६.३ **दि. २३ जुलै २०१६ — चित्रपट चावडीत जगप्रसिध्द नाइल नदीवर आधारित 'जन्नत-ए-नाइल' लघुपटाचे प्रदर्शन :-** लघुपटाच्या दिग्दर्शिका - पत्रकार आरती कुलकर्णी यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणा-या चित्रपट चावडी या उपक्रमात या महिन्यात पत्रकार आरती कुलकर्णी यांनी दिग्दर्शित केलेला 'जन्नत-ए-नाइल' हा लघुपट दाखविण्यात आला. यावेळी आरती कुलकर्णी यांनी चावडीच्या प्रेक्षकांशी संवाद साधला. शोध पत्रकारीता करणा-या आरती कुलकर्णी यांचा 'जन्नत-ए-नाइल' हा लघुपट इजिप्तमधील प्रसिध्द नाइल नदीवर आधारीत आहे. लघुपटात नाइल पदीचे पर्यावरणीय व सांस्कृतिक महत्व विषद करण्यात आले आहे. त्यासोबत इजिप्तशी असलेले या पदीचे नाते अत्यंत सुंदर पध्दतीने दाखविण्यात आले आहे. लघुपटाचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रिकरण करण्यात आलेले आहे. या लघुपटाला वसुंधरा आंतरराष्ट्रीय पर्यावरण फिल्म फेस्टीव्हल, महाराष्ट्र पर्यावरण विभागाचे उत्कृष्ट फिल्मसाठी पुरस्कार मिळाला आहे. जे.एन.ई.सी. महाविद्यालय, एम.जी.एम. च्या आइन्स्टाइन सभागृहामध्ये हा चित्रपट दाखविण्यात आला. यावेळी नीलेश राऊत, अपर्णा कक्कड, रेखा शेळके, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव, दिपक जाधव, त्रिशूल कुलकर्णी, श्रीकांत देशपांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

६.४ **'उमेद' - आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिला सहायता उपक्रम — जालना वितरण कार्यक्रम दि. २४ जुलै २०१६ :-** मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिलांच्या पुनर्वसनासाठी विभागीय केंद्र औरंगाबाद व यशस्विनी सामाजिक अभियानाच्या माध्यमातून 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम जालना येथे राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या संयोजनाकरिता विभागीय केंद्र औरंगाबाद तर्फे सहकार्य करण्यात आले. मराठवाडयातील ८ जिल्हयातील दोनशे विधवा महिलांची यात निवड करण्यात आली असून या चाळीशीच्या आतील महिला आहेत. या महिलांना पुढील एक वर्षात आर्थिक दृष्टया स्वावलंबी करण्यात येणार आहे. त्यांना लघुव्यवसायाकरिता मदत करणार असून प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष मदत या त्रिसुत्रीच्या माध्यमातून त्यांना सक्षम करण्यात येणार आहे. तसेच या महिलांचे हेल्थकार्डही तयार करण्यात आले असून एमजीएम रुग्णालयात पुढील तीन वर्ष कोणतेही उपचार, शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे.तसेच त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची देखील जबाबदारी घेण्यात आली आहे. जालना जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आली असून या अंतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम संपन्न झाला. श्री. राजेश टोपे यांच्या हस्ते महिलांना पिठाची गिरणी, शिलाई मशीन, शेळया आदी व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर उपक्रमाचा हा पहिला टप्पा आहे. माजी आ. चंद्रकांत दानवे, राजेश राऊत, उपक्रम समन्वयक नीलेश राऊत, आशा भिसे, विजय कान्हेकर हे यावेळी उपस्थित होते.

६.५ **बीड वितरण कार्यक्रम - दि. २१ जुलै २०१६ :-** मराठवाडयात आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिलांच्या पुनर्वसनासाठी विभागीय केंद्र औरंगाबाद व यशस्विनी सामाजिक अभियानाच्या माध्यमातून 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम पाटोदा, जिल्हा बीड येथे राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या संयोजनाकरिता विभागीय केंद्र औरंगाबाद तर्फे सहकार्य करण्यात आले. बीड जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आली. सकाळी ११ वाजता रेणुका माता मंदिर, पाटोदा येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी माजी आ. उषाताई दराडे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जयदत्त धस, जिल्हा परिषद सभापती महेंद्र गर्जे, उपक्रमाचे समन्वयक आशा भिसे, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, डॉ. नरेंद्र काळे, मेहबूब शेख, तात्यासाहेब घुले, भाऊसाहेब भवर, बळीराम पोटे, रोहिदास गाडेकर, नाय्युम पठाण, राजू जाधव, शरद बामदळे, वसीम शेख, बालाजी जाधव, सोमनाथ कोरले, सुभाष अडगाळे, जब्बार पठाण, बंडू तवार, आबा ढेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात अठरा विधवा महिलांना शेळया, सात महिलांना पिठाच्या गिरणीचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या सर्व महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देखील देण्यात आले.

६.६ **परभणी वितरण कार्यक्रम - दि. ६ ऑगस्ट २०१६ :-** मराठवाडयात आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिलांच्या पुनर्वसनासाठी विभागीय केंद्र औरंगाबाद व यशस्विनी सामाजिक अभियानाच्या माध्यमातून 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम परभणी येथे राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या संयोजनाकरिता विभागीय केंद्र औरंगाबाद तर्फे सहकार्य करण्यात आले. परभणी जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम परभणी येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. रामराव वडकुते हे होते. या उपक्रमांतर्गत परभणी जिल्हयातील आठ महिलांना पिठाची गिरणी, सात महिलांना शेळया , दोन महिलांना शेवई मशीन आणि एका महिलेला शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले.

६.७ **औरंगाबाद वितरण कार्यक्रम - दि. ७ ऑगस्ट २०१६ :-** मराठवाडयात आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिलांच्या पुनर्वसनासाठी विभागीय केंद्र औरंगाबाद व यशस्विनी सामाजिक अभियानाच्या माध्यमातून 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम औरंगाबाद येथे राबविण्यात आला. औरंगाबाद जिल्हयातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या संयोजनाकरिता विभागीय केंद्र औरंगाबाद तर्फे सहकार्य करण्यात आले. यावेळी आ. भाऊसाहेब पाटील चिकटगावकर आणि आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत औरंगाबाद जिल्हयातील आठ महिलांना पिठाची गिरणी, आठ महिलांना शेळया , दोन महिलांना पिको फॉल आणि दोन महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले.

६.८ **स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली' चे आयोजन - दि. १५ ऑगस्ट २०१६ :-** नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत होण्यासाठी 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली' चे आयोजन करण्यात येते. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच रविवार दि. १४ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ७ वाजता सदर रॅली आयोजित करण्यात आले होते. रॅलीचा मार्ग हा क्रांती चौक ते पैठण गेट असा होता. पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या हस्ते मशाल पेटवून सदर रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. रॅलीचे हे सलग ननवे वर्ष होते. यामध्ये औरंगाबाद शहरातील महाविद्यालयीन युवक - युवती, स्थानिक संस्था, संघटना, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, प्रशासकीय अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिक यांचा समावेश मोठया प्रमाणावर होता.

६.९ **विभागीय केंद्र औरंगाबादच्या दशकपूर्ती सोहळयाचे मा. खा. शरदचंद्रजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन - दि. २७ ऑगस्ट २०१६ :-** विभागीय केंद्र औरंगाबादच्या स्थापनेला यंदा दहा वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने दशकपूर्ती सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळयाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. खा. शरदचंद्रजी पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या सोहळयाच्या निमित्ताने मराठवाडयाच्या विकासात भरीव

योगदान देणा-या दहा मान्यवरांचा सत्कार यावेळी मा. खा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते करण्यात आला. सदरील सोहळा हा दि. २७ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ५ वाजता तापडीया नाटयमंदिर येथे संपन्न झाला. या सोहळयाला मा. आ. राजेश टोपे, मा. आ. भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, मा. अंकुशराव कदम, मा. आ. सतीश चव्हाण, मा. आ. विक्रम काळे, श्री. दत्ता बाळसराफ आर्दीची प्रमुख उपस्थिती होती.

'स्फूर्तिदायी' या कार्यक्रमात मा. खा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते मराठवाडयातील आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या दहा ज्येष्ठ मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यात पद्मश्री फातेमा झकेरिया, ज्येष्ठ जलतज्ज्ञ माधवराव चितळे, ज्येष्ठ रंगकर्मी त्र्यंबक महाजन, प्रा. इनिकर बोरीकर, ज्येष्ठ विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे, ज्येष्ठ समाजसेवक द्वारकादास लोहिया, ज्येष्ठ पत्रकार नागनाथ फटाले, ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ विजयअण्णा बोराडे, ज्येष्ठ इतिहास व पर्यटनतज्ज्ञ डॉ. दुलारी कुरेशी, डॉ. आर. बी. भागवत यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी औरंगाबाद विभागीय केंद्राचे दहा वर्षाच्या प्रवासावर आधारीत पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला विधान परिषद विरोधी पक्षनेते मा. धनंजय मुंडे, आ. सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. राजेश टोपे, भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी कागलीवाल यांनी प्रास्ताविक केले. नीलेश राऊत यांनी सुत्रसंचालन केले तर सचिन मुळे यांनी आभार मानले.

गेल्या दहा वर्षाच्या प्रवासात विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले गेले. औरंगाबाद विभागीय केंद्र ही मराठवाडयाची 'चावडी' व्हावी हे उद्दिष्ट राबविताना अनेक संस्था, संघटना, विचारवंत, रंगकर्मी, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सर्वसामान्य नागरिक, युवक-युवतींना औरंगाबाद विभागीय केंद्राशी जोडून घेण्यात आले. या सर्वांच्या कृतीशील सहभागामुळेच औरंगाबाद विभागीय केंद्राला नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबविता आले. यात प्रामुख्याने व्हिजन करीअर फेअर, जागर हा जाणिवांचा अभियान, चित्रपट चावडी, उस्ताद बिस्मिल्ला खाँ संगीत महोत्सव, युवा स्वातंत्र्यज्योत रॅली, शिक्षणकट्टा, लोकसंवाद, युवती मेळावा, राज्यस्तरीय युवा पुरस्कार, अभिसरण, तंबाखूविरोधी अभियान आदी सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे. दशकपूर्ती वर्षाप्रसंगी आयोजित या विशेष कार्यक्रमासाठी नागरीकांनी मोठया संख्येने उपस्थिती नोंदविली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष - नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष - सचिन मुळे, सचिव - मुकुंद भोगले, नीलेश राऊत, विजय कान्हेकर, सुबोध जाधव, सुहास तेंडुलकर, डॉ. अपर्णा कक्कड, डॉ. रेखा शेळके यांनी मार्गदर्शन केले तर रेणूका कड, मंगेश निरंतर, गणेश घुले, डॉ. संदीप शिसोदे, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार, दिपक जाधव, मयुर देशपांडे, श्रीराम पोतदार, त्रिशूल कुलकर्णी, प्रविण देशमुख, राजेंद्र वाळके आदींनी परिश्रम घेतले.

६.१० **दशकपूर्ती सोहळयाच्या निमित्ताने भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान शहनाई संगीत महोत्सवाचे आयोजन – दि. २८ व २९ ऑगस्ट २०१६** :- विभागीय केंद्र औरंगाबाद दशकपूर्वी सोहळयाच्या निमित्ताने भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान शहनाई संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले होते. महोत्सवाचे यंदाचे चौथे वर्ष आहे. २०१६ हे वर्ष उस्ताद बिस्मिल्ला खान यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. दि. २८ व २९ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता तापडिया नाटयमंदिर, निराला बाजार, औरंगाबाद येथे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दि. २८ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता कु. सावनी शिरीष गोगटे हिचे गायन आयोजित करण्यात आलेले होते. यानंतर सोलापूर येथील प्रसिध्द सुन्द्रीवादक भिमाण्णा जाधव व यशवंत जाधव यांचे सुन्द्रीवादन आयोजित करण्यात आले होते. सुन्द्री हा सनईतील उपप्रकार असून त्याचे पहिल्यांदाच औरंगाबादेत सादरीकरण करण्यात आले. यानंतर प्रसिध्द गायक सचिन नेवपुरकर यांच्या गायनाने महोत्सवाच्या पहिल्या दिवसाचा समारोप झाला. महोत्सवाच्या दुस-या दिवशी दि. २९ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता शहरातील युवा कलावंत बासरीवादक

निरंजन भालेराव व तबलावादक संतोष लोमटे यांनी जुगलबंदी सादर केली. त्यांना विनायक संकपाळ यांनी पखवाज वरती साथसंगत केली. यानंतर प्रसिध्द सनईवादक कल्याण अपार व हार्मोनियमवादक संतोष घंटे यांनी जुगलबंदी सादर केली. महोत्सवाचा समारोप प्रसिध्द सितारवादक पद्मश्री उस्ताद शाहीद परवेज यांचे शिष्य उस्ताद शाकेर खान, पुणे यांच्या सितारवादनाने झाला. त्यांना तबल्यावर महेश साळुंके व संजय अपार तसेच हार्मोनियमवर गजानन केचे यांनी साथसंगत केली. हा दोन दिवसीय संगीत महोत्सव सर्व रसिकांनी मोठया प्रमाणावर गर्दी केली होती.

६.११ **चित्रपट चावडी उपक्रमांतर्गत 'उदाहरणार्थ नेमाडे' चित्रपटाचे प्रदर्शन - दि. १७ सप्टेंबर २०१६ :-** विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने चित्रपट चावडी या मासिक उपक्रमात दि. १७ सप्टेंबर २०१६ रोजी 'उदाहरणार्थ नेमाडे' हा चित्रपट एम.जी.एम. परिसरातील रुख्मिणी सभागृहात दाखविण्यात आला. 'उदाहरणार्थ नेमाडे' हा मराठी चित्रपट आपल्या खास शैलीद्वारे रसिकांना खिळवून ठेवणारे ज्ञानपीठ विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या जीवनाविषयी रसिकांना कमालीचे कुतूहल असल्याने या चित्रपटासाठी रसिकांची मोठी गर्दी झाली होती. अक्षय इंडीकर दिग्दर्शित 'उदाहरणार्थ नेमाडे' या चित्रपटाच्या निमित्ताने रसिकांना डॉ. नेमाडे यांचा जीवन प्रवासच अनुभवता आला. शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने होणारे स्थलांतर, भेटलेली, अनुभवलेली माणसे, देशी परंपरा यासह डॉ. नेमाडे यांच्या जगण्यातील जिवंतपणा यात पकडण्यात आला. गंभीर प्रश्नांना त्यांनी साधेपणाने दिलेले उत्तर, मिश्किलपणा, आपल्या विधानावरील ठामपणा रसिकांचे लक्ष वेधून घेतो. यावेळी रसिकांनी त्यांच्या संवादावर टाळयांचा पाऊस पाडला. चित्रपट संपल्यानंतर दिग्दर्शक अक्षय इंडीकर यांनी रसिकांसोबत संवाद साधत डॉ. नेमाडे यांच्या जीवनावरील विविध पैलू उलगडून दाखविले. रसिकांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

६.१२ **यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन - दि. २५ नोव्हेंबर २०१६ :-** विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ३२ व्या पुण्यतिथीनिमित्त एमजीएमच्या आईन्स्टाईन सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्रतापराव बोराडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सातारा जिल्हयातील देवराष्ट्र या छोटया खेडयातून सुरु झालेला यशवंतराव चव्हाणांचा जीवनपट त्यांनी व्याख्यानात उलगडून सांगितला. हिमालयाच्या मदतीला सहयाद्री कसा धावला हे सांगताना त्यांनी अनेक दाखले दिले. विरोधकांना आपलसं केलं. देशाच्या विकासात कधीही राजकारण आणलं नाही. सातत्याने सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून ध्येयधोरणे आखली. त्यामुळेच ते ख-या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत. सामान्य कुटूंबात जन्म होऊन उपपंतप्रधान यासह केंद्रीय संरक्षणमंत्री, गृहमंत्री अशा अनेक महत्वाच्या जबाबदा-या पेलणा-या यशवंतराव चव्हाणांचे आयुष्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन प्रतापराव बोराडे यांनी यावेळी केले. यावेळी मंचावर प्राचार्या डॉ. रेखा शेळके, प्रा. डॉ. आशा देशपांडे, केंद्राचे श्री. सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश बारोटे यांनी केले तर आभार सुहास तेंडुलकर यांनी मानले.

६.१३ **चित्रपट चावडी मासिक उपक्रमात 'वन ट्वेंटी सेव्हन अवर' चित्रपटाचे प्रदर्शन - दि. १० डिसेंबर २०१६ :-** विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट चावडी या मासिक उपक्रमात सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक डॅनी बोयल यांचा २०१० साली प्रदर्शित झालेला 'वन ट्वेंटी सेव्हन अवर' हा चित्रपट दि. १० डिसेंबर २०१६ रोजी सायंकाळी ७ वाजता एम.जी.एम. च्या आईन्स्टाइन सभागृहात दाखविण्यात आला. चित्रपटाची कथा ही साहसी गिर्यारोहक अरॉन रॅलस्टोन यांच्या भोवती फिरते. हायकिंग करताना तो त्यांच्या हायकर मित्रांसोबत एका अंडरग्राऊंड तलावाचा शोध लावतात. त्यात यथेच्छ पोहल्यानंतर पर्वत चढाई करताना दुर्घटना घडून तो दोन दगडांच्या फटीत अडकतो. कुठलीच मदत मिळण्याची आशा नसताना हिम्मत न हरता मोठया शिताफिने तो या संकटावर मात करुन तेथून स्वतःची सुखरुप सुटका करुन घेतो. हे करत असताना त्याला येणा-या

अडचणींच्या एकशे वीस तासांचे अत्यंत वास्तववादी चित्रण यात केले आहे.

६.१४ **ना. धों. महानोर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सत्कार सोहळा व कवीसंमेलनाचे आयोजन - दि. ९ जानेवारी २०१७** :- विभागीय केंद्र औरंगाबाद आणि महात्मा गांधी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री ना. धों. महानोर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त कवी संमेलनाचे आयोजन दि. ९ जानेवारी २०१७ रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रसिध्द समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या हस्ते श्री. ना. धों. महानोर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मा. सौ. सुलोचना महानोर यांचा पैठणी देऊन शशिकला बोराडे, आशा भांड, जयश्री गोडसे, प्राचार्य रेखा शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी एमजीएमचे सचिव मा. अंकुशराव कदम, विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रतापराव बोराडे, बाबा भांड, भाऊसाहेब राजळे, रा. रं. बोराडे, नीलेश राऊत, सुबोध जाधव उपस्थित होते.

प्रारंभी कवीसंमेलनात कवी लक्ष्मीकांत तांबोळी, इंद्रजित भालेराव, रवी कोरडे, सुचेता खल्लाळ आणि प्रा. दासू वैद्य यांनी सहभाग घेतला. यावेळी कवींनी नावीन्यपूर्ण कवितांचे सादरीकरण्र करीत रसिकांना खिळवून ठेवले. गंभीर विचार करायला लावणा-या कविता समोर ठेवतानाच काही रचनांवर हशा आणि टाळयाही मिळविल्या. प्रा. तांबोळी यांनी बावन्न दरवाजांत वसलेल्या 'शहर-ए-औरंगाबाद' ची कविता सादर केली. 'दयाळा एवढे द्यावे' असे म्हणत त्यांनी मानवी प्राक्त न कथन केले. प्रा. इंद्रजित भालेराव यांनी आपल्या 'जन्म' कवितेतून मातीचे महत्त्व सांगितले. या कवितेला रसिकांचा भरभरुन प्रतिसाद मिळाला. मायलेकीचे नाते उलगडणा-या कवितेचे भालेराव यांनी गायन केले. प्रा. दासू वैद्य यांच्या 'ऐकत राहतो', 'संदर्भग्रंथ' आणि 'मॉल' या कवितांनी रंगत आणली. प्रा. रवी कोरडे यांच्या 'एक दुरडी फिरत राहिली कृतज्ञतेने' या कवितेने सर्वांनाच भावुक केले. विठ्ठलाला खडे बोल सुनावणारी कविता सुचेता खल्लाळ यांनी सादर केली. महानोर यांच्या गीतांचे यावेळी कविता वतनी, विश्वनाथ दाशरथे यांनी सादरीकरण केले. 'श्रावणाचं ऊन मला सोसेना' हे गीत कविता वतीन यांनी तर 'सूर्यदेवा नितनेमने उमवावे' हे गीत श्री. दाशरथे यांनी सादर केले. या गीतांना प्रल्हाद शेळके यांनी बासरीवर साथसंगत केली. कविसंमेलन आणि महानोर यांच्या गीतांचे सादरीकरण असलेली ही मैफल चांगलीच रंगतदार ठरली. सूत्रसंचालन श्रीकांत उमरीकर यांनी केले. सुरुवातीला अजिंक्य गुठे व विजय शिंपी निर्मित महानोर यांच्यावरील लघुपट दाखवण्यात आला. यावेळी साहित्यरसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

६.१५ **चित्रपट चावडी उपक्रमांतर्गत 'वेस्ट इज वेस्ट' चित्रपट - दि. २६ जानेवारी २०१७** :- विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणा-या चित्रपट चावडी या उपक्रमांत दि. २६ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी ६.३० वाजता एम.जी.एम. च्या सभागृहामध्ये सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक अँडी डेमोनी यांचा २०१० साली प्रदर्शित झालेला इंग्रजी चित्रपट 'वेस्ट इज वेस्ट' हा दाखविण्यात आला. या सिनेमाचे प्रोडयुसर लेसली वूडवीन तर लेखक अयुब खान-दीन हे होते. हा ब्रिटीश कॉमेडी चित्रपट असून या चित्रपटामध्ये अकीब खान, ओमपुरी, लिंडा बसेट, रॉबर्ट पंघ, राज बन्साली या कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. २०१० साली प्रदर्शित झालेला 'वेस्ट इज वेस्ट' हा इंग्रजी सिनेमा आहे. त्यापूर्वी पाच वर्ष आधी प्रदर्शित झालेला 'इस्ट इज इस्ट' या सिनेमाचा दुसरा भाग असून, या सिनेमामध्ये जॉर्ज खानच्या भूमिकेत ओमपुरी आहेत. जॉर्ज हा एक पाकिस्तानी मुस्लिम असून तो इंग्लंड मध्ये राहतो. त्याची बायको ब्रिटीश असते तर त्याची सात मुले ही ब्रिटीशमध्ये जन्माला आलेली आणि स्वतःला ब्रिटीश समजणारी असतात. पाकिस्तानी संस्कारातील जॉर्ज, त्याची ब्रिटीश बायको व त्याची ब्रिटीश वातावरणात वाढलेली, स्वतःला ब्रिटीश समजणारी सात मुले यांच्यातील जनरेशन गॅप विनोदी अंगाने दाखविणारा हा एक सिनेमा आहे.

६.१६ **दिग्दर्शक संदीप सावंत यांच्या उपस्थितीत 'नदी वाहते' या चित्रपटाचे परभणी येथे प्रदर्शन - दि. १८ फेब्रुवारी २०१७** :- मराठी चित्रपट सृष्टीत मैलाचा दगड ठरलेल्या 'श्वास' या लोकप्रिय चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप सावंत यांची आगामी कलाकृती असलेल्या 'नदी वाहते' या मराठी चित्रपटाच्या प्रदर्शनपूर्व विशेष खेळाचे आयोजन विभागीय केंद्र औरंगाबाद दि. १८ फेब्रुवारी २०१७ रोजी नूतन महिला महाविद्यालय, परभणी येथे आयोजन करण्यात आले होते. सदरील प्रदर्शनास शहरातील चित्रपट रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

६.१७ **दिग्दर्शक संदीप सावंत यांच्या उपस्थितीत 'नदी वाहते' या चित्रपटाचे प्रदर्शन :-** मराठी चित्रपट सृष्टीत मैलाचा दगड ठरलेल्या 'श्वास' या लोकप्रिय चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप सावंत यांची आगामी कलाकृती असलेल्या 'नदी वाहते' या मराठी चित्रपटाच्या प्रदर्शनपूर्व विशेष खेळाचे आयोजन विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी औरंगाबाद येथे आयोजन करण्यात आले होते. सदरील प्रदर्शनास शहरातील चित्रपट रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

६.१८ **चित्रपट चावडी उपक्रमांतर्गत डॉ. मोहन आगाशे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'अस्तू' या चित्रपटाचे प्रदर्शन - दि. २६ फेब्रुवारी २०१७ :-** एम.जी.एम. नर्सिंग महाविद्यालय, शांती नर्सिंग होम व विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट चावडी या मासिक उपक्रमात ज्येष्ठ कलावंत डॉ. मोहन आगाशे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'अस्तू' चित्रपटाचे प्रदर्शन दि. २६ फेब्रुवारी २०१७ रोजी औरंगाबाद येथे करण्यात आले. आजवर अनेक आंतरराष्ट्रीय महोत्सव, राष्ट्रीय पुरस्कारांसह तब्बल २७ पुरस्कारांवर आपली मोहोर उमटविणारा 'अस्तू' चित्रपटाचे कथानक हे एका निवृत्त संस्कृत प्राध्यापक जे स्मृतीभ्रंश या आजाराने त्रस्त असतात अशा व्यक्ती - विषयावरती आधारलेला आहे. संस्कृत पंडीत असलेल्या चक्रपाणी शास्त्री यांना उतारवयात स्मृतीभ्रंश विकार होतो. वर्तमानाचा हात सोडून ते दुस-याच गोष्टीत रमू लागतात. त्यातून मग सुरु होते ती त्या व्यक्तीला सांभाळ करणा-या कुटूंबाची कुचंबणा. वडील आणि मुलीचे असणारे अनोखे नाते हे या चित्रपटात उत्तमरित्या मांडण्यात आले आहे. चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, अभिनेत्री अमृता सुभाष, इरावती हर्षे, देविका दफ्तरदार आणि मिलींद सोमण आदी कलाकारांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. चित्रपटाचे लेख सुमित्रा भावे आणि दिग्दर्शन सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर यांनी केले असून, संगीत दिग्दर्शन धनंजय खरवंदिकर आणि साकेत कानेटकर यांनी केले आहे. सर्वोत्कृष्ट पटकथा लेखनासाठी सुमित्रा भावे यांना तर माहुताच्या बायकोची भूमिका अतिशय सुंदरपणे साकारलेल्या अभिनेत्री अमृता सुभाष हिला राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. गौरिका फिल्मच्या शीला राव व डॉ. मोहन आगाशे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. कथेतील आशयघनता हे मराठी चित्रपटाचे वैशिष्ट 'अस्तू' चित्रपटामुळे पुन्हा एकदा अधोरेखित होते.

चित्रपटानंतर डॉ. मोहन आगाशे यांनी प्रेक्षकांसोबत चित्रपटाविषयी संवाद साधला. चित्रपटाच्या माध्यमातून अनेक प्रश्न मांडले व सोडविले जातात. हे माध्यम सजगतेने वापरायचे आहे, त्यातून प्रेक्षकांना मोठया प्रमाणावर माहिती मिळत असते असे प्रतिपादन यावेळी ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी केले. ते पुढे म्हणाले की, 'अस्तू' चित्रपट बघितल्यामुळे अनेक प्रश्न कळतात. मद्रासमध्ये मानसिक आजारासंदर्भात झालेल्या सर्वेक्षणात सत्तर टक्के लोकांना चित्रपटामुळे आजार कळल्याचे समोर आले आहे. चित्रपटातून प्रेक्षकांना नकळत खूप माहिती मिळते. स्मृतिभ्रंश हा आजार कसा असतो हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. वैद्यकीय शिक्षणात मेंदूच्या कुठल्या भागात काय आजार होते एवढे शिकवले जाते. मात्र हा आजार पुस्तकापेक्षा भावनेने रुग्णांनी समजून घेण्याचा आहे. रुग्णाचे रिपोर्ट कार्ड पाहण्यापेक्षा त्यांचा जगण्याला महत्त्व देणे गरजेचे आहे. वयाच्या पस्तीशीपर्यंत सर्व गोष्टी मिळविण्यासाठी सर्वांची धडपड सुरु असते. यात आपण जगणे विरुन जातो. त्या त्या वयातील आयुष्य आपण जगले पाहिजे.

भूतकाळापेक्षा भविष्यकाळाला महत्त्व देत आयुष्य जगावे. त्यामुळेच कोणत्या ना कोणत्या कलेशी आपले नाते जोडत ती पूर्ण करावेत. आपल्या सोशल इमोशन खूप स्ट्राँग झाल्या आहेत. त्यामुळे आपण खूप हळवे होऊन त्याकडे बघतो. प्रसंगी मदतीसाठीही तयार होतो. मात्र हीच गोष्ट आपल्या वडिलांसोबत असेल तर आपल्याला ती गिल्टी वाटते. या गोष्टीचाही विचार व्हायला हवा असेही डॉ. आगाशे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की 'अस्तू' या सिनेमाचा कच्चा आराखडा तयार झाल्यानंतर आम्ही त्याची एडिटींग करीत असतांना चित्रपटाचा निर्माता आला. चित्रपटासाठी आता माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगितले. त्यामुळे हा चित्रपट तयार होईल की नाही अशी स्थिती निर्माण झाली. मात्र विषय मला खूप भावल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर बचत करुन ठेवलेले पैसे यासाठी लावले आणि मी 'अस्तू' चा दुसरा निर्माता झालो. वितरक न मिळाल्यामुळे प्रदर्शन होऊ शकले नाही. त्यामुळे विविध ठिकाणी जाऊन हा चित्रपट आम्ही दाखवीत आहोत. हा चित्रपट सर्वच वैद्यकीय महाविद्यालयात दाखविण्यात यावा असे आवाहनही यावेळी डॉ. आगाशे यांनी केले.

६.१९ **विशेष परिसंवाद 'पाच राज्यांच्या निवडणूक निकालांचा अन्वयार्थ' - दि. १२ मार्च २०१७ :-** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त केंद्रातर्फे एमजीएम च्या आईन्स्टाईन सभागृहात दि. १२ मार्च २०१७ रोजी 'पाच राज्यांतील निवडणूक निकालांचा अन्वयार्थ' यावर परिसंवाद घेतण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक प्रा. जयदेव डोळे, प्रवीण बर्दापूरकर, पत्रकार अमेय तिरोडकर, एमजीएमचे विश्वस्त प्राचार्य प्रतापराव बोराडे, प्राचार्या डॉ. रेखा शेळके, प्रतिष्ठानच्या सदस्या रेणुका कड, सुबोध जाधव, सुहास तेंडुलकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यशवंतरावांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर श्रीकांत देशपांडे यांनी संवादकाच्या भूमिकेतून तज्ज्ञांना बोलते केले.

उत्तर प्रदेशातील निकानींनी बहुसंख्याकवादाचा धोका वाढल्याचा सूर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद आयोजित परिसंवादात राजकीय विश्लेषकांनी काढला. सूक्ष्म प्रचारतंत्र आणि घटनाबाहय सत्ताकेंद्राच्या मदतीने निवडणूक जिंकण्याचे तंत्र भाजपने विकसित केले असून, व्हॉट्सअप, ट्विटर, फेसबुक आणि टीव्हीशी सतत कनेक्टेड असलेल्या १४ टक्के तरुणांसमोर मोदी यशस्वीपणे कनेक्ट होतात हे या यशाचे गमक असल्याचे ते म्हणाले. प्रवीण बर्दापूरकर यांनी उत्तर प्रदेशच्या निवडणुकांचा आढावा घेत परिसंवादास सुरुवात केली. ते म्हणाले, 'उत्तर प्रदेशात हिंदू मुस्लीम तेढ, ब्राम्हण, दलित आणि यादव यांच्याभोवती सर्व राजकारण केंद्रीत असते. छोटया जातींची मते मिळविण्यासाठी भाजपने बसपातून मौर्यांना फोडले, कुर्मी, लोथ, मल्लाव, गुर्रियोज, कुंभार अशा दोन ते तीन टक्के बळाच्या जातींची मोळी बांधली.'

यशवंतरावांच्या विकासविषयक उद्‌गारांचे श्रोत्यांना स्मरण करुन देत प्रा. जयदेव डोळे यांनी आपले विष्लेषण केले. ते म्हणाले, 'संघाचा अजेंडा पूर्ण ताकदीने राबविण्याची सुरवात उत्तर प्रदेशापासून झाली आहे. एकाही मुस्लीम उमेदवाराला तिकीट न देता आपण १०० टक्के हिंदू पक्ष म्हणून उदयास येत आहोत, हा संदेश भाजपने दिला आहे. अखिलेश यादवने महिला, युवक यांना केंद्रस्थानी ठेवून विकासाचे राजकारण करण्याचा, पक्षातील गुंडगिरी दूर करण्याचा प्रयत्न केला, हे कुणी सांगत नाही. भाजपने पैसा, गुंडगिरी, जात या सगळयांचा वापर केला. सत्ता आल्यानंतर भाजप राममंदीर उभारेल की नाही, हा मुद्दा नाही. राज्यसभेत बहुमत आल्यानंतर संविधानातील तरतुदींना सुरुंग लावण्याचा प्रयत्न होण्याची भीती आहे. भाजपेतर विचारांची ताकद गोळा करुन पुढच्या सर्व निवडणुकांमध्ये उभे राहावे लागेल' असे सांगत प्रा. डोळे यांनी यशवंतरावांच्याच पुस्तकातील परिच्छेदाने भाषणाचा समारोप केला. तर 'उत्तर प्रदेशात भाजपने बिगर यादव ओबीसी आणि बिगर जाटव दलित यांची मोट बांधली आणि यश मिळविले. २०१४ चा परफॉर्मन्स पुन्हा दाखविणे अवघड काम आहे,' असे निरीक्षण पत्रकार अमेय तिरोडकर यांनी वर्तविले.

पंजाबात आम आदमी पक्षाने खलिस्तान समर्थकांनी तिकिटे दिल्याचे अहवाल आहेत. त्यामुळे तिथे आप हरणे आवश्यक होते, असेही श्री. तिरोडकर म्हणाले. श्रीकांत देशपांडे यांनी तिन्ही वक्त्यांच्या विश्लेषणातील मुद्दांना स्पर्ध करत आपली निरीक्षणे मांडली. सुहास तेंडुलकर यांनी आभार मानले. यावेळी मोठया संख्येने श्रोते उपस्थित होते.

## १०.७. विभागीय केंद्र लातूर :-

७.१ **महात्मा फुले जयंती - ११.४.२०१६ :-** महात्मा ज्योतिबा फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहराच्या मेन रोडवरील पुर्णाकृती पुतळयास विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. खा. डॉ. जनार्दन वाघमारे, कोषाध्यक्ष डॉ. आर. एल. कावळे, ज्येष्ठ संचालक ॲड. मनोहरराव गोमारे, अरविंद कांबळे, विवेक सौताडेकर इ. मान्यवर उपस्थित होते.

७.२ **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती - दि. १४.४.२०१६ :-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आंबेडकर पार्कमधील त्यांच्या पुर्णाकृती पुतळयास वरील मान्यवरांच्या उपस्थित अभिवादन.

७.३ **महावीर जयंती - दि. १६.४.२०१६ :-** जैन तत्वाचे उपासक महावीर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन व लातूर शहरातील जैन बांधवास हार्दिक शुभेच्छा.

७.४ **कामगार दिन व महाराष्ट्र दिन - दि. १.५.२०१६ :-** जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिन यानिमित्ताने नियोजित लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांच्या संघटनेतील कामगारांबरोबर तसेच या संघटनेच्या कामगार नेत्याबरोबर यशवंतराव चव्हाण व आजचा महाराष्ट्र या विषयावर चर्चा संवाद.

७.५ **रेल्वे कर्मचा-यांचे स्वागत व सत्कार - दि. ५.५.२०१६ :-** दुष्काळातील लातूरचा जीव घेणा-या पाणी प्रश्नावर रेल्वे कर्मचा-यांचे स्वागत व सत्कार विभागीय केंद्राच्या वतीने १२ एप्रिल २०१६ पासून ३४२ किलोमिटर अंतरावरुन लातूरच्या जनतेची तहान भागविण्याकरिता ५० वाघिणीने भरलेले पाणी आणणारे जलराणी उर्फ वॉटर एक्सप्रेसचे चालक श्री. पी. डी. तलवादे व त्यांचे सहाय्यक धनराज पगारे तसेच या कामी त्यांना सहकार्य करणारे सर्व सहकारी लातूर रेल्वे स्टेशनचे प्रमुख एस. टी. घाडगे, एल. बी. ताकभाते, बी. के. तिवारी, बापू ढगे, अजहर शेख इत्यादींचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार लातूर शहरवासियांना व परिसरातील जनतेला मनोमन आवडला.

७.६ **गौत्तम बुध्द जयंती - दि. २१.५.२०१६ :-** जगाला शांतीचा संदेश देणारे गौत्तम बुध्द यांना त्यांच्या जयंतीनिमित्त गौत्तम बुध्द गार्डनमधील भव्य अशा गौत्तम बुध्दांच्या पुतळयाला विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करुन तेथे उपस्थित असलेल्या सर्व बौध्द बंधूभगिनींशी चर्चा व संवाद साधण्यात आला.

७.७ **साने गुरुजी पुण्यतिथी कार्यक्रम - दि. ११.६.२०१६ :-** महान तपस्वी व शिक्षण क्षेत्राला ज्यांचा सार्थ स्वाभिमान वाटावा असे परमपुज्य पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

७.८ **राजमाता जिजाऊ स्मृतिदिन - दि. १७.६.२०१६ :-** राजा शिवछत्रपती यांना जन्म देणा-या राजमाता जिजाऊ यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

७.९ **राजर्षी शाहू महाराज जयंती - दि. २६.६.२०१६ :-** राजर्षी शाहू महाराज यांना त्यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने राजर्षी शाहू चौकातील शाहू महाराजांच्या पुतळयाला अभिवादन करण्यात आले.

७.१० **राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त व्याख्यान - दि. २९.६.२०१६ :-** राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहरातील प्रसिध्द विचारवंत प्रा. डॉ. अशोक नारनवरे यांच्या व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. राजर्षी शाहू महाराजांचे लोकशाहीवादी पुरोगामी व्यक्तित्त्व या विषयावर डॉ. नारनवरे यांनी सभागृहाला मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांनी राजर्षी शाहू महाराजांचे जीवन कथन केले.

७.११ **गरीबांच्या शिक्षणाचे हक्क परिसंवाद - दि. ३०.६.२०१६ :-** विभागीय केंद्र लातूर आणि अखिल भारतीय अध्यापक सभा पुणे जिल्हा शाखा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने गरीबांच्या शिक्षणाचे हक्क या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून थोर समाजवादी नेते भाई वैद्य (पुणे) यांनी परिसंवादात लातूरकरांना मोलाचे मार्गदर्शन केले. माजी आमदार विशाखाताई ठाकरे, दिनकर गोरेकर, ॲड. मनोहरराव गोमारे इत्यादींनी मोलाचे मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अ. भा.. अ. स., लातूर जिल्हा शाखेचे अध्यक्ष हरिभाऊ जवळगे, प्राचार्य शिवाजीराव माडे, रामकुमार रायवाडीकर इत्यादीने मोलाचे परिश्रम घेतले.

७.१२ **अपंग हक्क विकास उपक्रम - दि. १०.७.२०१६ :-** या विषयावर लातूर शहराच्या एमआयडीसी मध्ये कार्यरत असलेल्या श्री. तुकाराम बनसोडे यांच्या अपंग शाळेत भव्य कार्यक्रम घेण्यात आला. श्री. तुकाराम बनसोडे हे स्वतः अपंग म्हणजे यांना दोन्ही पाय नाहीत असे हे अपंग हे आपला अपंगत्व बाजूला ठेवून या माणसाने अपंगाची शाळा चालू केली.

७.१३ **दि. १८.७.२०१६ :-** अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

७.१४ **दि. १.८.२०१६ :-** लोकमान्य टिळक यांचा स्मृतिदिन तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दोन्हीही नेत्याच्या कार्याबद्दल चर्चा.

७.१५ **दि. ९.८.२०१६ :-** भारतीय स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ म्हणून हजारो भारतीयांनी दिलेल्या बलिदानाचा हा क्रांतीदिन म्हणून साजरा केला जातो.

७.१६ **दि. १२.८.२०१६ :-** उस्मानाबाद येथे एडस कारणे व उपाय या विषयावर चर्चासत्र प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सचिन बसवे, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य ए. एम. रजवी, याप्रसंगी प्रमुख पाहुणे बसवे म्हणाले की, लोकांनी आपल्या मनावर नियंत्रण ठेवून आपले चारित्र्य कसे चांगले राहील याकडे लक्ष द्यावे. एडस हा असाध्य रोग असून १०० टक्के इलाज होईल असे औषध नाही. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले.

७.१७ **दि. १५.८.२०१६ :-** भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंगी ध्वजास अभिवादन व प्रचारफेरीत विभागीय केंद्राचा सहभाग.

७.१८ **दि. १८.८.२०१६ :-** भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधन हा सर्व जातीपंथातील बंधूभगिनींना नैतिकतेचा धडा शिकवणारा मौलिक सण असून या दिवशी सख्ख्या बहिणभावाबरोबरच इतर जातीपंथातील मानलेल्या बहिण भावाला राखी बांधली जाते.

७.१९ **वाहतूक सुरक्षा अभियान :-** दि. २८ ऑगस्ट २०१६ रोजी वरील कार्यक्रम विभागीय केंद्राचे ज्येष्ठ संचालक ॲड. मनोहरराव गोमारे व विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाने ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या लातूर एज्युकेशन संस्थेतर्फे चालू असलेल्या संत ज्ञानेश्वर ज्युनिअर कॉलेजच्या मुला-मुलींच्या मदतीने राजर्षी शाहू चौक, लातूर येथे वाहतूक सुरक्षा अभियान घेण्यात आले.

७.२० **शिक्षक दिन :-** दि. ५ सप्टेंबर २०१६ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती स्व. राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम विभागीय केंद्राच्या वतीने घेण्यात येवून काही आदर्श अध्यापक अध्यापिकेचे विभागीय केंद्राच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात येवून त्यांचे विचार ऐकण्यात आले. याप्रसंगी प्रा. एस. बी. कुलकर्णी यांचे मार्गदर्शनपर भाषण सर्वांना ऐकायला मिळाले.

७.२१ **दि. १० सप्टेंबर २०१६ :-** उस्मानाबाद येथे यशवंतराव चव्हाण साहित्य सम्राट व राजकारणी या विषयावर चर्चासत्र, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. व्ही. एन. जमाले, अध्यक्ष प्रा. डॉ. सचिन बसवे.

७.२२ **दि. १७ सप्टेंबर २०१६ :-** मराठवाडा मुक्ती संग्राम दिन याच दिवशी जागर उपक्रम हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा मुक्तीसंग्रामातील लढवय्ये गोविंदराव

लांडगे हे होते. या कार्यक्रमाचा विषय मराठवाडा मुक्तीसंग्रामाची आजच्या तरुणांना जाणीव होणे निकडीची आहे.

७.२३ **तंबाखुमुक्त अभियान :-** दि. २६ सप्टेंबर २०१६ रोजी निलंगा येथे तंबाखुमुक्त अभियान घेण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राच्या लातूर तालुक्यातील निलंगा संपर्क प्रमुख प्राचार्य व्ही. एल. एरंडे हे होते. या कार्यक्रमासाठी तरुणांची संख्या मोठया प्रमाणात पाहायला मिळाली.

७.२४ **शरदाचे चांदणे :-** दि. ३० सप्टेंबर २०१६ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी किल्लारी भागात ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या भूकंपाची आठवण करुन देण्यासाठी यशवंत तुमच्या दारी या उपक्रमांतर्गत भूकंपग्रस्त भागात दि. ३०.९.२०१६ रोजी जाऊन हा भूकंप झाल्यानंतर त्यावेळचे मुख्यमंत्री लोकनेते मा. श्री. शरदचंद्रजी पवार यांनी भूकंपग्रस्त भागातील जनतेला कशा पध्दतीने मदत केली याची जाणीव आजच्या तरुणांना करुन देण्यात आली.

७.२५ **दि. २ ऑक्टोबर २०१६ :-** महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा आयोजित करण्यात आला. प्रथम महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस उपस्थित पाहुणे व विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर विचारवंत, विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून लातूर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोकराव कुकडे तसेच लातूर शहरातील प्रख्यात ज्येष्ठ विधिज्ञ हरिश्चंद्र रेड्डी, श्री. सि. ना. आलूरे गुरुजी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक कुकडे यांचे ज्येष्ठ बंधू भगिनींना मोलाचे मार्गदर्शन झाले. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षासह सर्वच ज्येष्ठांनी आपले विचार मांडत असतांना ज्येष्ठांनी वयोवृध्द बंधूनी आहे त्या परिस्थितीत समाधान मानून जीवन जगावे असा सूर सर्व मान्यवरांच्या तोंडून ऐकावयास मिळाला. डॉ. अशोक कुकडे म्हणाले, ज्येष्ठांनी विचाराबरोबरच आपले दैनंदिन जीवनात खूप विचारपूर्वक जीवन जगणे अगत्याचे आहे. हे वय म्हणजे लहान मुलासारखे असते. याप्रसंगी विभागीय केंद्राच्या वतीने लातूर शहरामध्ये सर्व जातीपंथासाठी काम करणा-या काही ज्येष्ठ बंधू भगिनींचा सत्कार विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे व मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. सर्वांचे आभार ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

७.२६ **संत तुकडोजी महाराज स्मृतिदिन - दि. १३ ऑक्टोबर २०१६ :-** विभागीय केंद्राच्या वतीने शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर विभागीय केंद्राचे संचालक तथा या शिवाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे तर प्रमुख पाहुणे प्रसिध्द विचारवंत, विभागीय केंद्राचे नांदेड जिल्हा संघट प्रा. उत्तम सूर्यवंशी हे होते. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी संत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामीण साहित्याबद्दल आपले विचार मांडले. प्रा. उत्तम सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार मानले.

७.२७ **इस्लामचे खरे स्वरुप - दि. २१ ऑक्टोबर २०१६ :-** विभागीय केंद्राच्या वतीने इस्लामचे खरे स्वरुप या विषयावर व्यापक विचारमंथन व चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष जनार्दन वाघमारे तर प्रमुख पाहुणे सोलापूरचे प्रसिध्द विचारवंत, साहित्यिक प्रा. फकरुद्दीन बेनूर यांची उपस्थिती होती तर दुसरे पाहुणे मराठवाडयातील प्रसिध्द विचारवंत डॉ. सूर्यनारायण रणसुभे व श्रीमती तस्मिन पटेल यांनी उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. डॉ. फकरुद्दीन बेनूर यांनी इस्लाम धर्माच्या जवळ जाण्यासाठी कुण्या इतर मध्यस्थीची गरज नाही. इस्लाम धर्मात माणूसकी आहे. त्या माणूसकीचे पालन व्हावे असे अध्यक्षासह सर्वच मान्यवरांच्या तोंडून ऐकावयास मिळाले.

७.२८ **आजच्या शेतक-याच्या आत्महत्त्या का कशा ? - दि. १३ नोव्हेंबर २०१६ :-** विभागीय केंद्र लातूर व अखिल भारतीय अध्यापक सभा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आजच्या शेतक-याच्या आत्महत्त्या का कशा ? याबद्दल चर्चासत्र आयोजित

करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार हे होते. या कार्यक्रमात महाराष्ट्राचे थोर विचारवंत, प्रसिध्द विचारशलाका या त्रैमासिक पत्रिकेचे लेखक डॉ. नागोराव कुंभार यांची महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेच्या अध्यक्षस्थानी निवड झाल्याबद्दल त्यांचा या कार्यक्रमा अगोदर यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास ॲड मनोहरराव गोमारे, माधवराव पाटील, ॲड. टी. एन. भालेराव यांची उपस्थिती होती. याप्रसंगी वरील सभेचे लातूर जिल्हा अध्यक्ष तथा विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे आपल्या प्रास्ताविकेत म्हणाले की, आज तत्ववेते विचारवंत यांनी ग्रामीण भागातील गाववाडी वस्तीवर जावून शेतकरी शेतमजूर यांना आपल्या विद्वतेच्या ज्योतीचा प्रकाश देवून आज होत असलेल्या हजारो शेतक-यांच्या आत्महत्त्या कशा थांबतील ? या राज्यातील व देशातील गरीब मुलामुलींचे शिक्षण कसे होईल ? या देशातील गरीबी कशी दूर होईल ? याकडेच आपले लक्ष किमान डॉ. नागोराव कुंभार यांनी द्यावे. कारण भूक लागल्यानंतर पोटात आग कशी पडते याची जाणीव डॉ. कुंभार यांना जरुर आहे. त्यांनी आपले जीवन प्रतिकूल परिस्थितीवर मात करुनच घडविले.

वक्ते म्हणून डॉ. नागोराव कुंभार यांनी सद्यस्थितीबद्दल चिंता व्यक्त करुन वैचारिक व सत्याच्या मार्गाने जाणा-या माणसाने त्यांच्या मनातील चिंतन शब्दांकित करणे गरजेचे आहे. भारताला यापुढे संविधान मार्गाने विकासाची वाटचाल करावी लागेल. इतर सर्व जाती, वर्ण, धर्माला मर्यादित ठेवून मानवता प्रस्थापित करण्याचे ध्येय साकार करण्यासाठी प्रयत्न करुनच श्री जवळगे यांनी ग्रामीण जनतेचे बिकट प्रश्न मांडले. त्याकडे सर्वच बुध्दीजीवी वर्गांनी लक्ष देवून त्यांच्या आजच्या बिकट परिस्थितीची उकल करणे गरजेचे आहे असे आपल्या भाषणातून डॉ. नागोराव कुंभार यांनी सांगितले. याप्रसंगी ॲड. मनोहरराव गोमारे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य शिवाजी माडे यांनी केले तर शेवटी सर्वांचे आभार सभेचे जिल्हा चिटणीस रामकुमार रायवाडीकर यांनी मानले.

७.२९ **दि. १४ नोव्हेंबर २०१६ :-** भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेस केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करुन केंद्राच्या शेजारी असलेल्या बालवाडीच्या मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. केद्राच्या वतीने वरील तारखेस गुरुनानक जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

७.३० **दि. १५ नोव्हेंबर २०१६ :-** दि. २५.११.२०१६ रोजी स्व. चव्हाण साहेबांच्या ३२ व्या पुण्यतिथी दिनानिमित्त पूर्व तयारीची बैठक बोलावण्यात आली.

७.३१ **इंदिरा गांधी जयंती - दि. १९ नोव्हेंबर २०१६ :-** महिला आणि युवतीच्या कल्याणासाठी कायदे. प्रमुख वक्ते डॉ. डी. एच. चौधरी, अध्यक्ष प्राध्यापिका चंद्रिका परमार, हैद्राबाद. युवा पुरस्कार – जगाच्या मानाने भारतात महिलांकरिता चांगले कायदे झाले आहेत. घटनेचे संरक्षण महिलांना आहे. आज महिला सर्व क्षेत्रात मोठया दिमतीने मिळालेले आपले कार्य पार पाडीत आहेत. आता कोणतेच क्षेत्र महिलाविना राहिले नाही असे मौलिक विचार डी. एस. चौधरी यांनी मांडले.

७.३२ **दि. २५ नोव्हेंबर २०१६ :-** लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचा ३२ वा स्मृतिदिन. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावाचे योगदान या विषयावर विचारमंथन व जनजागर प्रमुख वक्ते डॉ. सर्जेराव निमसे, प्रमुख उपस्थिती पंडित विद्यासागर, कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरिभाऊ जवळगे यांनी केले. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी आभार मानले.

७.३३ **दि. २६ नोव्हेंबर २०१६ :-** संविधान स्वीकृती दिन विभागीय केंद्र लातूरच्या वतीने उस्मानाबाद येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे उस्मानाबाद जिल्हा प्रमुख डॉ. रमेशराव दापके हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उस्मानाबाद येथील ॲड. पंडितराव जाधव व ॲड. ग़्यानंद बिराजदार यांची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी दोन्ही पाहुण्यांनी भारतीय संविधानाबद्दल सविस्तर विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले.

७.३४ **दि. २८ नोव्हेंबर २०१६ :-** नांदेड येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आजच्या शिक्षणातील सर्वसामान्य गरीब मुलामुलींच्या शिक्षणाबद्दलचे हाल या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. उत्तम सूर्यवंशी, प्रा. अमोल काळे, प्रा. एस. पी. मद्देवाड यांनी या चर्चासत्रात आपला सहभाग नोंदवला.

७.३५ **दि. ३ डिसेंबर २०१६ :-** जागतिक अपंग दिनानिमित्त लातूर येथील अपंग शाळेतील अपंगांना विभागीय केंद्राच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.

७.३६ **दि. ६ डिसेंबर २०१६ :-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिमेस विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

७.३७ **दि. १२ डिसेंबर २०१६ :-** भारताचे माजी कृषिमंत्री तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार यांचा ७६ वा वाढदिवस साजरा करण्यात आला.

७.३८ **दि. २४ डिसेंबर २०१६ :-** साने गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

७.३९ **दि. ३१ डिसेंबर २०१६ :-** २०१६ या वर्षाला निरोप व २०१७ या वर्षाचे स्वागत लातूर येथील अंधश्रध्दा निर्मूलन समिती व विभागीय केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला. लातूर शहरातून रॅली काढण्यात आली. याप्रसंगी आम्ही सेवक या सदराखाली घोषणा देण्यात आल्या.

७.४० **तंबाखु मुक्त फेरी - दि. १ जानेवारी २०१७ :-** बाबासाहेब परांजपे फाऊंडेशन लातूर येथे तंबाखुमुक्त फेरी व दारु, गांजा, मटका अशा वाईट सवयी बंद करा म्हणून फेरी काढण्यात आली. त्याबद्दल चर्चासत्र आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. बी. आर. पाटील हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य शिवाजी माडे हे होते.

७.४१ **दि. ३ जानेवारी २०१७ :-** सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अभिवादन.

७.४२ **दि. ८ जानेवारी २०१७ (उस्मानाबाद) :-** नोटाबंदी आणि काळा पैसा प्रमुख वक्ते प्रा. अर्जून जाधव, प्रमुख उपस्थिती दत्तात्रय साळुंके, कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेशराव दापके, हरिभाऊ जवळगे, केंद्र सरकारने नोटीबंदी करुन सर्वच क्षेत्रात गोंधळ सुरु झाला असून या देशाचे स्थिर वातावरण अस्थिर झाले आहे.

७.४३ **दि. ११ जानेवारी २०१७ :-** भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या स्मृतिदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात येवून त्यांच्या जीवनावर केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी लिहिलेल्या निवडणूकीचे तुफान या नाटकाचा प्रयोग विद्यावर्धिनी विद्यालय, हिंगोली येथे साजरा करण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले.

७.४४ **दि. १२ जानेवारी २०१७ :-** राजमाता जिजाऊ व थोर विचारवंत स्वामी विवेकानंद या दोन्हीही महामानवांच्या प्रतिमेस विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

७.४५ **दि. २५ जानेवारी २०१७ :-** विभागीय केंद्राच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई या मध्यवर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष आम्हा सर्वांचे आवडते नेते, भारताचे माजी कृषिमंत्री मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार यांना भारत सरकार तर्फे सर्वोच्च असा पद्‌मविभूषण हा पुरस्कार मिळाल्याबद्दल मोठया थाटात आनंद साजरा करण्यात आला व केंद्राच्या वतीने त्यांना सोबतचे अभिनंदन पत्र पाठविण्यात आले.

७.४६ **दि. २६ जानेवारी २०१७ :-** भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने तिरंग्यास विनम्र अभिवादन करण्यात आले.

७.४७ **निबंध स्पर्धा - दि. ३० जानेवारी २०१७ :-** महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये यशवंतरावांचे योगदान. या निबंध स्पर्धेतील स्पर्धकांची बक्षिसे १३ मार्च रोजी होणा-या यशवंतरावांच्या जयंतीनिमित्त कवी संमेलनात वाटप करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

७.४८ **दि. ३० जानेवारी २०१७ :-** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

७.४९ **हिंगोलीत शिक्षण कट्टा :-** दि. ८ फेब्रुवारी २०१७ शिक्षण विषयक नवीन कायदे. अध्यक्ष प्राचार्य डॉ. जयंत भोयार, प्रमुख वक्ते माणिकराव टाकळघवाणकर. याप्रसंगी प्राचार्य भोयार यांनी विद्यापीठातील शिक्षण गरीबाच्या घरी जाणे गरजेचे आहे. दिवसेंदिवस गरीबाच्या शिक्षणाची अवहेलना होत आहे.

७.५० **दि. १० फेब्रुवारी २०१७ :-** १२ मार्च यशवंतरावांच्या जयंतीनिमित्त होणा-या कार्यक्रमाची पूर्व तयारी व नांदेड येथे १३ मार्च यशवंतरावांच्या जयंतीनिमित्त होणा-या कवी संमेलनाची पूर्व तयारीनिमित्त बैठक घेण्यात आली.

७.५१ **दि. ८ मार्च २०१७ :-** जागतिक महिला दिनानिमित्त विभागीय केंद्राच्या कार्याध्यक्षा सौ. आशाताई भिसे यांनी त्यांच्या बचतगटाच्या महिलांबरोबर संवाद साधला.

७.५२ **यशवंतराव चव्हाण यांची १०४ वी जयंती - दि. १२ मार्च २०१७ :-** अगदी सकाळी यशवंतराव चव्हाण यांच्या महानगरपालिकेसमोरील पुर्णाकृती पुतळयास अभिवादन करण्यात आले तर सायंकाळी ५.३० वाजता व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष जनार्दन वाघमारे हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रसिध्द लेखक नामांकित पत्रकार उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमाचा विषय यशवंतराव आणि आजचा महाराष्ट्र हा होता. आसाराम लोमटे यांनी मौलिक विचार मांडले.

७.५३ **दि. १३ मार्च २०१७ :-** नांदेड येथे गोपाळकृष्ण सभागृह येथे यशवंतराव चव्हाण यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त अनेक नामांकीत कवींनी आपली उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष फ. मु. शिंदे होते.

७.५४ **दि. २३ मार्च २०१७ :-** जागतिक हवामान दिन यानिमित्ताने विभागीय केंद्राच्या वतीने चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

७.५५ **दि. २८ मार्च २०१७ :-** शेतीकट्टा या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रमेश दापके हे होते. या कार्यक्रमात अनेक शेतीतज्ञांनी आपली उपस्थिती लावली होती. याप्रसंगी अनेकांनी आज होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या याबद्दल आपले विचार मांडले.

## १०.८ विभागीय केंद्र अमरावती :-

## १०.९ विभागीय केंद्र अहमदनगर :-

९.१ **आदर्श गावाकडे वाटचाल चर्चासत्र - दिनांक २१.४.२०१६ :-** आदर्श गावाकडे वाटचाल महात्मा फुले विद्यापीठ, राहुरी येथे तज्ञ मार्गदर्शक योगेश म्हस्के (सरपंच, आदर्शगाव गोगलगाव) डॉ. आनंद सोळंकी, डॉ. हरि मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श गावाकडे वाटचाल या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

९.२ **मोफत वाचनालय - दिनांक २७.५.२०१६ :-** गाव तेथे यशवंत वाचनालय दि. २७.५.२०१६ रोजी ज्ञानेश्वरीचे उगमस्थान नेवासा येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिर प्रांगणामध्ये श्री. रामदासजी फुटाणे श्री. यशवंतराव गडाख पाटील, मा. आ. पांडुरंग अभंग, आ. शंकरराव गडाख, ह.भ.प. शिवाजी महाराज देशमुख, सौ. बेबीताई गायकवाड यांच्या उपस्थितीत नेवासा तालुक्यात ५१ गावामध्ये मोफत सार्वजनिक वाचनालय सुरु करण्याचा संकल्प करण्यात आला व त्या सर्व वाचनालयास यशवंत चव्हाण प्रतिष्ठान, अहमदनगर शाखेच्या वतीने २०० ग्रंथांची भेट देण्यात आली. प्रसंगी वाचनामुळे निर्णय क्षेमतेत वाढ होत असे रामदास फुटाणे यांनी सांगितले तर वाहवत चाललेल्या पिढीला संस्कृतीच वाचवील असे श्री. यशवंतराव गडाख पाटील यांनी आपली भावना व्यक्त केली. कार्यक्रमास तालुक्यातील विविध गावातील हजारो वाचक उपस्थित होते.

९.३ **गांडूळ खत उत्पादन व शेतीसाठी वापर मार्गदर्शन - दि. ३१.५.२०१६** :- गांडूळ खत उत्पादन व शेतीसाठी वापर दि. ३१.५.२०१६ रोजी कारेगाव, ता. श्रीरामपूर येथे तज्ज्ञ मार्गदर्शक मा. कैलास ऊंडे, मा. मनिष पंढुरे यांच्या उपस्थितीत गांडुळ खत उत्पादन व त्याचे शेतीसाठीचे होणारे फायदे या विषयावर योग्य ते मार्गदर्शन उपस्थित शेतकरी वर्गास करण्यात आले.

९.४ **कोपरगाव मुख्य रस्त्याचा लोकार्पण साहेळा - दि. ५.६.२०१६** :- दि. ५.६.२०१६ रोजी कोपरगाव मुख्य रस्त्याचा लोकार्पण सोहळा कै. यशवंतराव चव्हाण समता मार्ग, अहमदनगर जिल्हयातील कोपरगाव शहराच्या वैभवात भर घालण्यासाठी केंद्राचे खजीनदार ओमप्रकाश तथा काका कोयटे यांनी कोपरगाव शहरामध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी तथा अध्यक्ष श्री. यशवंतराव गडाख -पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. अध्यक्षीय भाषणात श्री. यशवंतराव गडाख यांनी कोपरगावला अच्छे दिन येण्यास सुरुवात झाल्याचे सुतोवाच केले. या कार्यक्रमास आ. सौ. स्नेहलता कोल्हे, श्री आशुतोषजी काळे, श्री. राजेश परजणे, श्री. प्रशांत गडाख, श्री. रविंद्र पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

९.५ **एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापक** :- दि. ३०.७.२०१६ रोजी तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. डॉ. अनिल दुर्गुडे यांच्या उपस्थितीत नांदुर्खी, ता. राहाता येथे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयावर सखोल चर्चा घडवून आणण्यात आली. प्रसंगी परिसरातील शेतकरी बांधव व कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

९.६ **नेत्रदान जनजागृती अभियान** :- दि. २५.८.२०१६ रोजी परिसरातील सर्व विद्यालयामध्ये, समाजामध्ये नेत्रदान चळवळ रुजविण्यासाठी व नेत्रदानाविषयी जनजागृती वाढविण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीचे आयोजन करुन नेत्रदान चळवळ वाढविण्याविषयी मार्गदर्शन केले.

९.७ **मुरघास उत्पादन तंत्रज्ञान** :- दि. ३०.८.२०१६ रोजी कृषिभूषण मा. ज्ञानेश्वर (माऊली) पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बक्तरपूर, ता. शेगाव येथे मुरघास उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. प्रसंगी माऊली पवार यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना मुरघास उत्पादन तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले.

९.८ **सुत्रकृमी नियंत्रण व डाळिंब पिकातील किड व्यवस्थापन** :- दि. २९.९.२०१६ रोजी डॉ. नानासाहेब म्हसे व डॉ. अशोक वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली ओ.डी.सी.सी. बँक सभागृह संगमनेर येथे शेतकरी कृषी मेळाव्यामध्ये उपस्थित शेतक-यांना मार्गदर्शन केले. प्रसंगी आमदार डॉ. सुधीर तांबे उपस्थित होते.

९.९ **ग्रंथ भेट सोहळा** :- दि. २६.९.२०१६ रोजी सोनई परिसरातील प्राथमिक शिक्षकांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अंतर्गत गांव तेथे वाचनालय या उपक्रमास साडे सहाशे पुस्तकांची ग्रंथ भेट केंद्राचे सचिव प्रशांत गडाख यांचेकडे सुपूर्द केली. परिसरातील या प्राथमिक शिक्षकांनी वाचनालयाच्या या उपक्रमास दिलेली पुस्तकांची भेट निश्चितच अनुकरणीय असून त्यांच्या या उप्रक्रमाने वाचनालय चळवळीला निश्चितच बळ मिळेल असे उद्‌गार सचिव प्रशांत गडाख यांनी काढले. या कार्यक्रमास परिसरातील शिक्षक बंधू-भगिनी व अनेक वाचकांची उपस्थिती होती.

९.१० **पंचसुत्री ज्वारी उत्पादन तंत्रज्ञान व हरभरा उत्पादन तंत्रज्ञान** :- दि. १३.१०.२०१६ रोजी डॉ. शरद गडाख व डॉ. रामभाऊ पेरणे यांच्या उपस्थितीत आदीनाथनगर, पाथर्डी येथे ज्वारी उत्पादनाचे तंत्रज्ञानाबाबत उपस्थित शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले.

९.११ **उन्हाळी कांदा उत्पादन व साठवण तंत्रज्ञान** :- दि. १५.१०.२०१६ रोजी श्री एस. डी. मगर महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांनी उपस्थित शेतक-यांना देऊळगाव गलांडे, ता. श्रीगोंदा येथे झालेल्या शेती कट्टयात उन्हाळी कांदा उत्पादन व साठवण तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले.

९.१२ **मा. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी दि. २५.११.२०१६** :- मा. यशवंतराव चव्हाण यांची ३२ वी पुण्यतिथी कार्यक्रम दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी जिल्हा केंद्र अहमदनगरच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांची ३२ वी

पुण्यतिथी कार्यक्रम नेवासा तालुक्यातील ५१ यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयात साहेबांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. तसेच स्व. चव्हाणसाहेबांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच प्रा. भाऊसाहेब सावंत (ग्रामीण साहित्यिक) व डॉ. अशोक शिंदे यांनी आपल्या व्याख्यानातून स्व. चव्हाण साहेबांच्या जीवनातील तसेच महाराष्ट्र व राष्ट्र उभारणीतील कार्य तसेच सहकार चळवळीतील काम आदी बाबी विस्तृतपणे समजावून सांगितल्या. यशवंत सार्वजनिक वाचनालयातील पुण्यतिथी कार्यक्रमात स्थानिक बचत गटातील महिला, तरुण, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व चान प्रेमी आदी सहभागी झाले होते. तसेच मुळा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील स्व. यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या अर्धाकृती पुतळयास मा. नाना साहेब पा. तुवर, चेअरमन, मा. भाऊसाहेब पा. मोटे, उपाध्यक्ष यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, सर्व अधिकारी तसेच शेतकरी सभासद उपस्थित होते. याप्रसंगी कवी एस. बी. शेटे यांनी स्व. चव्हाणसाहेबांच्या मुळा कारखाना कार्यस्थळावरील भेटीचा उजाळा दिला. तसेच चव्हाणसाहेबांचे सहकार चळवळ उभी करण्याचे योगदान विषद केले. तसेच सोनई येथील कौतुकी नदी पात्र येथील ज्येष्ठ नागरिक मंचचे सदस्य यांनी स्व. चव्हाणसाहेब स्वतः पाहिले तसेच अनुभवले अशा ७५ ते ८० वर्ष वयोगटातील सेवा निवृत्त शिक्षक, वकील, प्राध्यापक, शेतकरी यांनी चव्हाणसाहेबांच्या पुण्यातिथी निमित्ताने प्रतिमेस अभिवादन करुन स्व. चव्हाणसाहेबांच्या आठवणीस उजाळा दिला. याप्रसंगी १०० ते १२० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. तसेच मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई व यश ग्रुपच्या अहमदनगर, औरंगाबाद येथे तसेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई येथे स्व. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी निमित्ताने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा येथे पुण्यतिथी कार्यक्रम साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. भाऊसाहेब सावंत हे उपस्थित होते. तसेच मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनईचे १५ माध्यमिक विद्यालये, ७ प्राथमिक मराठी व इंग्रजी शाळा, २ वरिष्ठ महाविद्यालय, ९ व्यवसायिक महाविद्यालय, ५ उच्च माध्यमिक विद्यालये व ९ इंग्लिश मेडियम स्कूल तसेच मुळा पब्लिक स्कुल या ठिकाणी स्व. चव्हाणसाहेबांच्या ३२ व्या पुण्यतिथी निमित्ताने रांगोळी स्पर्धा, बालचित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आदींचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ फार्मशी, अहमदनगरच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय, वडगाव गुप्ता वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वांजोळी या ठिकाणी दंत रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या प्रसंगी २७१ विद्यार्थ्यांची मौखिक आरोग्य तपासणी करण्यात आली व सर्व विद्यार्थ्यांना टुथपेस्ट व ब्रशचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी वांजोळी गावचे सरपंच ताब्या साहेब शिरसाठ, उप सरपंच ब्रदीनाथ खंडागळे, मुख्याध्यापिका श्रीमती लवांडे, डॉ. निखिल बोंबले, डॉ. निलेश साळुंके यांनी विद्यार्थ्यांना मौसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. या प्रकारे स्व. यशवंतराव चव्हाणसाहेब यांची ३२ वी पुण्यतिथी विविध कार्यक्रम व उपक्रमांनी साजरी करण्यात आली. तसेच यशवंत प्रतिष्ठान संचालित आदर्श गाव मोरया चिंचोरा येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, निबंध स्पर्धा, आदर्श नागरिक भरत गर्जे यांचे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी मनोगतात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, उत्कृष्ट प्रशासक, यशस्वी संसद पटू, उत्तम वक्ते व लेखक आणि जन सामान्यात ज्याची मूळे रुजली आहेत असे नेते स्व. यशवंतराव चव्हाणसाहेब यांचे जीवन चरित्र उलगडले. स्व. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी निमित्ता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वांजोळी येथे स्व. यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय, अहमदनगर व जिल्हा केंद्र अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दंत रोग निदान शिबीर व टूथपेस्ट वाटप करण्यात आले.

९.१३ **जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त मोफत कायदेविषयक शिबीर, दि. १०.१२.२०१६** :- दि. १०.१२.२०१६ रोजी जिल्हा केंद्र अहमदनगर व जिल्हा विधी सेवा समिती तसेच नेवासा तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १०.१२.२०१६ रोजी जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त महावद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच शेतक-यांना मोफत कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विद्यार्थी, शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

९.१४ **विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर** :- दि. १४.१२.२०१६ ते २५.१२.२०१६ या कालावधीत जिल्हा केंद्र अहमदनगर च कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई यांच्या वतीने विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीराचे लोहोगाव, ता. नेवासा येथे ग्रामविकासासाठी आयोजन केले होते.

९.१५ **केंद्रामार्फत नव्याने ११ यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयाची स्थापना** :- दि. २७.१२.२०१६ रोजी जिल्हा केंद्र अहमदनगरचे सचिव श्री. प्रशांत पाटील-गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आलेल्या ५१ सार्वजनिक वाचनालयांना श्री. प्रशांत पाटील गडाख यांच्याकडून ५१ हजार रुपयांची पुस्तके वाढदिवसानिमित्त भेट. तसेच श्री. प्रशांत पाटील गडाख मित्र मंडळ यांच्याकडून ५१ हजार रुपयांची पुस्तके वाचनालयास भेट. तसेच नव्याने ११ यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयाची स्थापना केली. आज अखेर यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयांची संख्या एकूण ६२ इतकी आहे.

९.१६ **आधुनिक शेती तंत्र कार्यशाळा** :- दि. २७.१२.२०१६ रोजी राहुरी येथे आधुनिक शेती तंत्र कार्यशाळेचे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे आयोजन करण्यात आले. अनुभवी मार्गदर्शक डॉ. व्ही. डी. देशमुख उपस्थित होते. तसेच शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

९.१७ **प्रक्रिया उद्योग उपक्रमाचे आयोजन** :- दि. ३०.१२.२०१६ राहाता, जिल्हा अहमदनगर येथे प्रक्रिया उद्योग या उपक्रमाचे आयोजन डॉ. हरी मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यात प्रामुख्याने आवळा कॅन्डी, मनुके, पापड, लोणचे आदी प्रक्रिया उद्योगांविषयी माहिती देण्यात आली. याप्रसंगी महिला शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

९.१८ **स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ साहेब भोसले जयंती कार्यक्रम** :- स्वामी विवेकानंद जयंती (राष्ट्रीय युवा दिन) व राजमाता जिजाऊ साहेब भोसले जयंती दि. १२.१.२०१७ रोजी विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने सोनई महाविद्यालय व नेवासा महाविद्यालय येथे अनुक्रमे डॉ. शंकर लावरे सर तसेच डॉ. गोरक्षनाथ कल्हापुरे सर आदींची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती, यात बहुसंख्येने विद्यार्थी / विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

९.१९ **दुग्ध व मुरघास तंत्रज्ञान या शेती कट्टयाचे आयोजन** :- दि. १९.१.२०१७ रोजी कर्जत व जामखेड तालुक्यात संयुक्तरित्या दुग्ध व मुरघास तंत्रज्ञान या शेती कट्टयाचे मु. टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जिल्हा अहमदनगर या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. एस. एस. जाधव, कनिष्ठ संशोधन सहाय्यक, महात्मा कृषी विद्यापीठ, राहुरी व ज्ञानेश्वर पवार कृषीभूषण प्रगतशील शेतकरी मु. पो. पुनतगाव, ता. नेवासा आदी उपस्थित होते. या कार्यशाळेत दुग्ध उत्पादन तंत्रज्ञान, गायांच्या विविध जाती, चारा व्यवस्थापन, वासरांचे संगोपन, मुरघास प्रक्रिया प्रत्यक्ष मुरघास निर्मिती प्रात्यक्षिक उपस्थित शेतक-यांना करुन दाखविण्यात आले व शेतक-यांच्या विविध शंकाचे निरसन करण्यात आले. या प्रसंगी कर्जत व जामखेड तालुक्यातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

९.२० **प्रजासत्ताक दिनाचे आयोजन** :- दि. २६.१.२०१७ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा केंद्र अहमदनगरच्या वतीने ध्वजारोहन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

९.२१ **शिवजयंती कार्यक्रम** :- दि. १९.२.२०१७ रोजी जिल्हा केंद्र अहमदनगरच्या वतीने शिवजयंती महोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनईच्या सर्व प्राथमिक (मराठी व इंग्रजी माध्यम) सर्व माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ विद्यालये, सर्व वरिष्ठ व व्यावसायिक महाविद्यालय या सर्व शाखांमध्ये शिवजयंती मोठया

उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच याप्रसंगी विविध पोवाडे, कथाकथन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आदींचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयांना प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रांवर आधारित विविध नामवंत पुस्तके भेट म्हणून देण्यात आली. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. मा. खा. यशवंतराव गडाख, अध्यक्ष, जिल्हा केंद्र अहमदनगर यांच्या प्रेरणेने व खा. सौ. सुप्रिया सुळे व मा. प्रशांत भाऊ गडाख पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतराव चव्हाण साहेब यांचे जीवन चरित्र राजकारण व समाजकारण यासाठी केलेले काम वाचन संस्कृती तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम केंद्राच्या वतीने अविरतपणे सुरु आहे.

१२.२२ **धुलिवंदननिमित्त कार्यक्रम** :- दि. १३.३.२०१७ रोजी धुलिवंदननिमित्त पाण्याची नासाडी टाळून पर्यावरण स्नेही रंगाचा वापर करुन कृत्रिम रंगामुळे होणारे प्रदूषण व तोटे यावर आधारित व्याख्यान जिल्हा केंद्र अहमदनगर येथे आयोजित करण्यात आले होते.

१२.२३ **मा. यशवंतराव चव्हाण जयंती** :- दि. १२.३.२०१७ रोजी मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांची १०५ वी जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालये, कृषी महाविद्यालय सोनई, यशवंत स्पर्धा परीक्षा केंद्र, यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय वडगांव गुप्ता अहमदनगर या सर्व शाखेमध्ये विभागीय केंद्र अहमदनगरच्या वतीने विविध उपक्रमांच्या माध्यमांतून जयंती साजरी करण्यात आली. यात प्रामुख्याने वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदींचे आयोजन करुन स्व. यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करुन जयंती साजरी करण्यात आली.

दि. १२ मार्च २०१७ स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांची १०५ वी जयंती निमित्ताने यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय वडगाव गुप्ता अहमदनगरमधील रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत विद्यार्थी डॉक्टरांनी सहभागी होऊन 'पाणी हेच जीवन' या विषयावर रेखाटलेल्या नाविन्यपूर्ण रांगोळया तयार केल्या.

## १०.१० विभागीय केंद्र अंबाजोगाई, बीड :-

१०.१ **यशवंतराव चव्हाण यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान** : केंद्र अंबाजोगाईच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त प्रा. शाम आगळे यांचे 'यशवंतराव यांची जडणघडण व कार्य कर्तृत्व' या विषयावर शनिवार दि. १२ मार्च २०१६ रोजी न. प.च्या कै. विलासराव देशमुख सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा वृत्तांत सोबत जोडला आहे.

१०.२ दुष्काळाच्या निमित्ताने करण्यात आलेल्या कार्याची वेगळी माहिती यापूर्वीच दिली आहे.

१०.३ **युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचे आयोजन** : केंद्र अंबाजोगाई व नवमहाराष्ट्र युवा अभियानांतर्गत युवकांमध्ये राष्ट्रभक्ती जागविण्याच्या उद्देशाने रविवार दि. १४ ऑगस्ट २०१६ रोजी सायं. ७ वाजता युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली काढण्यात आली. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. द्वारकादास लोहिया, उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसिलदार शरद झाडके, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गंदम, नंदकिशोर मुंदडा, प्रा. एस. के. जोगदंड, प्रा. नानासाहेब गाठाळ, अक्षय मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद अंबाजोगाईपासून मशाल पेटवून या रॅलीचा प्रारंभ झाला. मंडीबाजार, शिवाजी चौक मार्गे नगरपरिषदेच्या प्रांगणात रॅली दाखल झाली व राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप झाला. डॉ. नरेंद्र काळे, ॲड जयसिंग लोमटे यांनी या रॅलीचे आयोजन केले होते.

१०.४ **जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन व गांधी जयंती** : जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन व गांधी जयंतीच्या निमित्ताने केंद्र अंबाजोगाई व मानवलोक अंबाजोगाईच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित करण्यात आला. गरजु ज्येष्ठ

नागरिकांना चालण्यासाठी आधार म्हणून उपयुक्त काठी देण्यात आली. त्यावेळी अस्थिरोग तज्ञ डॉ. प्रदिप शेंडगे यांनी उतारवयातील गुडघेदुखी व इतर हाडांच्या आजारासंबंधी मार्गदर्शन केले. सचिव तथा दंतरोग तज्ञ डॉ. नरेंद्र काळे यांनी वृध्दांच्या दंत व मुखरोगा विषयी मार्गदर्शन केले. केंद्र अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांविषयी माहिती दिली. यावेळी मानवलोकचे कार्यवाह श्री. अनिकेत लोहिया, ज्येष्ठ नागरिक संघाचे डॉ. ए‍ी. एस. थोरात, रोटरी क्लब (सिनिअर सिटीझन) चे अध्यक्ष श्री. पुंडलिक पवार, माजी मुख्याध्यापक मा. कदम सर उपस्थित होते.

१०.५ **यशवंतराव चव्हाण स्मृतीदिन** : दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीदिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व केंद्र अंबाजोगाईच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक श्री. इंद्रजित भालेराव यांचे व्याख्यान आयोतजत केले आहे.

१०.६ **बालसाहित्य संमेलन बीड** : दि. ९ व १० मार्च रोजी बीड जिल्हा स्तरीय पहिले मराठी बालसाहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनाच्या पूर्वसंध्येला सायंकाळी ५ वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

१०.७ **दि. ९ व १० मार्च २०१७ दरम्यान झालेले बालसाहित्य संमेलन बीड** : अंबाजोगाई येथे दि. १४ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय बैठकीमध्ये बीड येथे पहिले मराठी बालसाहित्य संमेलन घेण्याचा ठराव एकमुखाने संमत करण्यात आला. यावेळी केंद्राचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया, कार्याध्यक्ष डॉ. दीपाताई क्षीरसागर, सचिव नरेंद्र काळे, कोषाध्यक्ष अभिजीत जोंधळे, अमर हबीब आदींसह प्रतिष्ठानच्या पदाधिका-यांची प्रमुख उपस्थिती होती. संमेलनाध्यक्ष म्हणून भाई महावीर जोंधळे तर स्वागताध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. डॉ. नरेंद्र काळे, श्री. दगडू लोमटे यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, संमेलनाच्या स्वागताध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, पत्रकार सुनील क्षीरसागर, संजय मालानी आदींच्या हस्ते सायं. ५ वाजता ग्रंथदिंडीचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथ दिंडी माळीवेस - धोंडीपुरा - कारंजा रोड - शिवाजी पुतळा ते नाटयगृह या मार्गे निघाली. माळीवेस चौकातून निघालेल्या ग्रंथदिंडीमध्ये शहरातील अनेक शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या वेगवेगळया प्राण्यांच्या आणि पशुपक्षांच्या वेशभूषा, ग्रंथ डोक्यावर घेवून शिस्तीत निघालेले विद्यार्थी, आधुनिक काळातील बालकांच्या कार्टून वेशभूषा, ग्रंथपालखी, लेझीम पथक, एन.सी.सी. चे स्वयंमसेवक, वचन संस्कृतीचे महत्व पटवून देणारे फलक घेवून असलेले विद्यार्थी, लहानमुलांची गाणी, झाडे लावा झाडे जगवा अशा प्रकारचे समाज स्वास्थ्यास सहायभूत होणारे फलक, वारक-यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी आदी बाबींमुळे दिंडीने संपूर्ण शहरातील वातावरण भारुन टाकले. माळीवेस - धोंडीपुरा — कारंजा - राजुरीवेस - शिवाजी चौक मार्गे निघालेली दिंडी सानेगुरुजी साहित्य नगरी, यशवंतराव चव्हाण नाटयगृह बीड येथे जाऊन विसर्जित झाली. रात्री ७ शालेय विद्यार्थ्यांच्या संगीत रजनीचा कार्यक्रम झाला. यामध्ये दिव्यांग व अपंग शालेय विद्यार्थ्यांनाही कला सादर करण्याची संधी मिळाली.

पहिले जिल्हा स्तरीय मराठी बालसाहित्य संमेलन घेण्यात आले. त्या अनुषंगाने दि. ६ मार्च २०१७ रोजी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात प्रथमतः सौ. के.एस.के.एच. मेडिकल कॉलेजमध्ये चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी १. माझा आवडता प्राणी, २. माझे घर, ३. माझी शाळा हे विषय तर सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी **मराठी भाषेतील पुस्तकांवरील मुखपृष्ठ** हा विषय देण्यात आला होता. यात शहरातील १८ शाळांमधील ४९० तर ग्रामीण भागातील १२ शाळांमधील ११० विद्यार्थ्यांनी अशा एकूण ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यावेळी कागदी पुष्परचना स्पर्धा देखील घेण्यात आली. यात शहरातील १५ शाळेतील विद्यार्थी व ग्रामीण भागातून १० शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. लहान गटातून २६ व मोठया गटातून ५४ असे एकूण ९० स्पर्धक सहभागी झाले होते. आकर्षक अशा पुष्परचना पाहण्यात आल्या. यावेळी हस्तकला स्पर्धाही घेण्यात आली. या स्पर्धेत शहरातील १२ शाळांमधील एकूण ४१ विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील

१० शाळांमधील एकूण ५८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विविध प्रकारच्या हस्तकलेच्या वस्तू नाविण्यपूर्ण रितीने बनविल्या होत्या. कथाकथन व कविता यांचे वाचन घेण्यात आले. उत्कृष्ठ सादरीकरण करणा-या विद्यार्थ्यांना बालसाहित्य संमेलनात संधी देण्यात आली. यात एकूण शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या १२५ कविता आणि ७० कथा होत्या.

यशवंतराव चव्हाण नाटयगृहाच्या आवारात बालसाहित्याच्या ग्रंथ प्रदर्शनाचे स्टॉल उभारण्ययात येणार असून स्पर्धेमध्ये निवड झालेल्या हस्तकला, कागदी फुलरचना आदींचेही स्टॉल लावण्यात येणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या निवडक हस्तलिखीत कथा, कविता आदी संमेलनाच्या स्मरणिकेत प्रकाशित करण्यात येतील. सदरील स्मरणिका हस्तलिखीत स्वरुपाची असेल. छोटया कवींचे कवी संमेलन पार पडले. कु. प्राजक्ता सोनवणे, कु. वैभवी चाटे कु. अश्विनी गव्हाणे, कु. प्रिया खोसे, अर्जुन यादव, कु. नेहा लवराळे, कु. मयुरी नागरगोजे, कु. क्रांती भालेराव, कु. पुनम ओव्हळ, कु. शिवाजीराजे कदम, कु. सोहम झवेरी, कु. प्रांजली बनकर, कु. राजप्रिया पाटील, कु. वैष्णवी कांबळे यांनी विविध विषयावरील कविता सादर केल्या. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन कु. प्राजक्ता सोनवणे व वैभवी चाटे यांनी केले. बालकथाकारांच्या कथा यात वैष्णव कांबळे, अर्चना शिंदे, साक्षी मराठे, सुहानी भादेकर, राजेश दगडखैर, अतुल धांडे, प्रियंका लांडगे, साक्षी बहीर, वैष्णवी बहीर, अश्विनी बहीर, राहिन प्रतिक्षा यांनी आपल्या शैलीत कथा सादर केल्या. नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी खांडेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. **निमंत्रीत लेखकांचे कथाकथन** - यात मुकुंद तेलीचेर, मधुकर बैरागी, स्मिता कोठाळकर, विठ्ठल जाधव यांनी आपल्या कथा सादर केल्या. **निमंत्रीत कवींचे कवीसंमेलन** - यात प्रभाकर साळेगावकर, गणपत व्यास, सय्यद अल्लाउद्दीन, अनिल होळकर, वसंत बिवरे, निशा चौसाळकर, नागनाथ बडे यांनी बालकविता सादर केल्या. डॉ. दीपा क्षीरसागर यांनी सुहासिनी इर्लेकर यांच्या दोन कविता सादर केल्या. दिवसभर विविध कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळाली. यानंतर सायंकाळी पहिल्या मराठी बालसाहित्य संमेलनाचा समारोप अंबाजोगाई केंद्राचे कोषाध्यक्ष अभिजीत जोंधळे, सचिव नरेंद काळे, स्वागताध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**गट - अ पहिली ते सहावी चित्रकला स्पर्धा निकाल**

**गट - ब सातवी ते दहावी चित्रकला स्पर्धा निकाल**

**गट - अ पहिली ते सातवी (छोटा गट) कागदी पुष्परचना स्पर्धा निकाल**

**गट - ब आठवी ते दहावी (मोठा गट)**

**गट - अ पहिली ते सातवी हस्तकला स्पर्धा निकाल**

**गट -ब आठवी ते दहावी हस्तकला स्पर्धा निकाल**

## १०.११ विभागीय केंद्र ठाणे :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे केंद्र दि. १.४.२०१६ पासून अस्तित्वात आले. उद्‌घाटनाचा कार्यक्रम श्री. शरद काळे, सरचिटणीस, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या हस्ते पार पडला. त्यानंतर काव्यसंमेलन झाले. ठाणे केंद्राने यशस्वीरितीने राबविलेले उपक्रम पुढीलप्रमाणे :

११.१ दिनांक २९ जुलै २०१६ रोजी ज्येष्ठ नाटककार श्री. अशोक समेळ यांची ज्येष्ठ कवी श्री. अशोक बागवे यांनी खुमासदार मुलाखत घेतली. यावेळी श्री. अशोक समेळांनी नटसम्राटमधील एक उच्चांकाचा प्रवेश करुन दाखवला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुभाष शेंडे यांची मुलाखत प्रा. नीतिन आरेकरांनी घेतली.

११.२ १५ ऑगस्टच्या मुहूर्तावर ठाणे जिल्हा मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांना यशवंतराव चव्हाण साहेबांच्याबद्दल व त्यांच्या कार्याचा परिचय ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. मनिष जोशी आणि प्रा. नीतिन आरेकरसरांनी आपल्या

व्याख्यानातून करुन दिला.

११.३ ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त दिनांक ३० सप्टेंबरच्या सायंकाळी मा. श्री. जी. बी. पिंगुळकर यांच्या अध्यक्षतेखाली ठाण्यातील विविध क्षेत्रातील ६ ज्येष्ठसामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर डॉ. सौ. मृदुला दाढे - जोशी यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

११.४ यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. २५ नोव्हेंबर रोजी मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठाच्या दिक्षांत सभागृहात 'यशवंत व्याख्यानमाला' या उपक्रमाची सुरुवात झाली. या उपक्रमाची सुरुवात प्रसिध्द शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. श्री.अनिल काकोडकर यांच्या 'मुलभूत विज्ञानाच्या संशोधनाच्या नव्या दिशा' या व्याख्यानाने झाली. मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीतील असलेल्या महाविद्यालयातील सुमारे ५५० ते ६०० विद्यार्थ्यांना या व्याख्यानाचा लाभ मिळाला. यावेळी पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, अरुण साधू, पु. द. कोडोलीकर संपादित अनघा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'यशवंतराव चव्हाण : जडण घडण' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

११.५ दि. १७ फेब्रुवारी २०१७ रोजी 'विचारकुंकू' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याच्या निवृत्त पहिल्या स्त्री राज्य निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण यांची खुमासदार मुलाखत प्रा. अनुया धारप व कु. पूजा प्रधान यांनी घेतली. या प्रदीर्घ मुलाखतीमुळे कहिला वर्गाला श्रीमती नीला सत्यनारायण यांचा प्रदीर्घ शासकीय अनुभवाची तसेच त्यांच्या साहित्यातील योगदानाची आणि त्यांच्या विविध उपक्रमांची माहिती मिळाली. मुलाखतीनंतर सौ. माधवी घारपुरे यांच्या कथाकथनाचा कार्यक्रम रंगला.

## १०.१२ विभागीय केंद्र सोलापूर :-

१२.१ **सोलापूर केंद्र उद्घाटन दि. ९.११.२०१६ :** सोलापूर विभागीय केंद्राचा शुभारंभ ९ ऑक्टोबर २०१६ रोजी सामाजिक व राजकीय विषयाचे अभ्यासक श्री. उल्हास पवार यांचे शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान या विषयावर श्री. उल्हास पवार यांचे व्याख्यान संपन्न झाले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष गो. मा. पवार, आमदार दिलीप सोपल, युनुसभाई शेख, धर्मण्णा सादूल, राजशेखर शिवदारे, दत्ता गायकवाड यांचेसह मान्यवर उपस्थित होते. सदरचा कार्यक्रम वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात संपन्न झाला.

१२.२ **आरोग्य तपासणी शिबीर दि. २४.११.२०१६ :** २४ नोव्हेंबर २०१६ रोजी विभागीय केंद्र सोलापूर व संत धामाजी महाविद्यालय मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींच्या आरोग्याची तपासणी व तारुण्याच्या उंबरठयावर या विषयावर डॉ. सुदेश जोशी यांनी मार्गदर्शन केले. यासाठी डॉ. संदेश कांदे आणि बालाजी लॅबोरेटरी यांचे सहकार्य लाभले.

१२.३ **इलेक्ट्रॉनिक मिडीया व प्रिंट मिडीया मार्गदर्शन दि. १३.१२.२०१६ :** १३ डिसेंबर २०१६ रोजी विभागीय केंद्र सोलापूर व सोलापूर विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ पत्रकार निळू दामले यांनी इलेक्ट्रॉनिक मिडीया व प्रिंट मिडीया यातील वास्तव आणि आव्हाने या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु. डॉ. मालदार पत्रकारिता विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

१२.४ **मा. यशवंतराव चव्हाण जयंती दि. १२.३.२०१६ :** १२ मार्च २०१७ रोजी यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गो. मा. पवार, श्री युनुसभाई शेख यांच्या शुभहस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळयास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची विक्रिसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| | | किंमत रुपये |
| १) | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग -१<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| २) | वाय बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधिमंडळ - भाग -२<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३) | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट - वाय बी. चव्हाण - खंड १ ते ४<br>संपादक : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ४) | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १०.०० |
| ५) | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६) | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७) | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ८) | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन -<br>संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९) | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह<br>संपादन : दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०) | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११) | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| १२) | विमुक्तायन : महाराष्ट्रतील विमुक्त जमाती :<br>चिकित्सक अभ्यास संशोधन / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३) | महिलांसंबधीचे धोरण : स्वयंसिध्दतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४) | यशवंतराव चव्हाण - चरित्र-लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५) | शब्दाचे सामर्थ्य - संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६) | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे<br>संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
